सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक २१५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### बिहार निवडणूक : दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांवर मंगळवारी मतदान



पाटणा, १० नोव्हेंबर : बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यात राज्यातील २० जिल्ह्यांतील १२२ विधानसभा जागांवर मंगळवारी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी एकूण ४५,३३९ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. त्यापैकी ४,१०९ केंद्रांना संवेदनशील घोषित करण्यात आले आहे, तर ४,००३ केंद्रांना अतिसंवेदनशील म्हणून ओळखण्यात आले आहे. या केंद्रांवर मतदान संध्याकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे. राज्यातील कटोरिया, बेलहर, चैनपूर, चेनारी, गोह, नवीनगर, कुटुंबा, औरंगाबाद, रफीगंज, गुरुआ, शेरघाटी, इमामगंज, बाराचट्टी (३६ केंद्रे), बोधगया (२०० केंद्रे), रजौली, गोविंदपूर, सिकंदरा, जमुई, झाझा आणि चकाई या विधानसभा क्षेत्रांतील केंद्रांवर दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल.तर बोधगयातील १०६ केंद्रांवर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होईल. या सर्व केंद्रांवर पुरेशा संख्येने सुरक्षा दल तैनात ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.दुसऱ्या टप्प्यात १३०२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यापैकी ११६५ पुरुष, १३६ महिला आणि एक थर्ड जेंडर उमेदवार आहे.

### भारताचा विदित गुजराती फिडे बुद्धिबळ विश्वचषकातून बाहेर



पणजी, १० नोव्हेंबर-भारतीय ग्रँडमास्टर विदित गुजराती टाय-ब्रेक गेमच्या दुसऱ्या सेटमध्ये अमेरिकेच्या सॅम शँकलँडकडून २.५-३.५ असा पराभव पत्करून बुद्धिबळ विश्वचषकातून बाहेर पडला.आणखी एक भारतीय खेळाडू एस.एल. नारायणन यालाही टाय-ब्रेक गेमच्या पहिल्या सेटमध्ये चीनच्या यांगी यूकडून पराभव स्वीकारावा लागला. व्ही. कार्तिकने रोमानियाच्या डीक बोगदान-डॅनियलला १.५-०.५ असा पराभव सहन करत चौथ्या फेरीत प्रवेश केला. कार्तिक आता प्री-क्वार्टरफायनलपासून फक्त एक विजय दूर आहे. विदित गुजराती हा स्पर्धेच्या पहिल्या तीन फेरीत बाहेर पडणारा तिसरा प्रमुख भारतीय बुद्धिबळपटू आहे. त्याच्या आधी विश्वविजेता डी. गुकेश आणि अरविंद चिथंबरम होते. गुकेशचा जर्मनीच्या फ्रेडरिक स्वानने पराभव केला, तर चिथंबरमचा दुसऱ्या फेरीत कार्तिकने पराभव केला.चार भारतीय बुद्धिबळपटू चौथ्या फेरीत पोहोचले आहेत.

### जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश: दोन डॉक्टरांसह सात अटकेत




श्रीनगर, १० नोव्हेंबर -जम्मू-काश्मीर पोलिसांनी आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सक्रिय असलेल्या एका मोठ्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केल्याचा दावा केला आहे. पोलिसांच्या मते हे रॅकेट प्रतिबंधित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद (जेईएम) आणि अंसार गझवत-उल-हिंदशी संबंधित होते. या कारवाईतून अनेक प्रमुख दहशतवादी आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा, दारुगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. चौकशीत असे उघड झाले आहे की या मॉड्यूलमध्ये शिक्षित व मध्यमवर्गीय लोकही गुंतलेले होते. यात व्यावसायिक, विद्यार्थी आणि परदेशी हँडलर्सशी संपर्कात असलेले लोक यांचा समावेश आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी श्रीनगर, अनंतनाग, गांदरबल आणि शोपियांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे मारले. तसेच हरियाणातील फरीदाबादमध्ये आणि उत्तर प्रदेशातील सहारानपुरमध्ये स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने कारवाई करण्यात आली. या ताब्यात शोधमोहीमीत दहशतवादाशी संबंधित कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, शस्त्रे, गोळ्यांचा साठा आणि आयईडी तयार करण्यासाठी लागणारी साहित्य मिळून आले.

# हरियाणा : आतापर्यंत २९०० किलो स्फोटके जप्त

फरीदाबाद, १० नोव्हेंबर : दिल्लीच्या शेजारील फरीदाबादमध्ये आयईडी तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या २९०० किलो स्फोटकांच्या जप्तीने संपूर्ण देश हादरून गेला आहे. जम्मू-कश्मीर पोलिसांनी २ काश्मिरी डॉक्टरांच्या अटकेचा खुलासा करताना हे आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादी मॉड्यूल असल्याचे सांगितले आहे.

पोलिसांनी उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून अनंतनागचा रहिवासी डॉ. आदिल अहमद राथर आणि हरियाणातील फरीदाबादहून डॉ. मुजम्मिल अहमद गनई यांना अटक केली आहे. तसेच, एका महिला डॉक्टरची भूमिकाही या प्रकरणात समोर येत आहे. जम्मू-कश्मीर पोलिसांच्या पहिल्या निवेदनानुसार, आजपर्यंत २ डॉक्टरांसह एकूण ७ जणांना अटक करण्यात आली आहे.

यामध्ये आरिफ निसार डार उर्फ साहिल (नौगाम, श्रीनगर), यासिर-उल-अशरफ (श्रीनगर), मकसूद अहमद डार उर्फ शाहिद (नौगाम, श्रीनगर), मौलवी इरफान अहमद (शोपियां), ज़मीर अहमद अहंगर उर्फ मुतलाशा (वाकुरा, गांदरबल), डॉ. मुजम्मिल अहमद गनई उर्फ मुसैब (कोइल, पुलवामा), डॉ. आदिल, (वानपोरा, कुलगाम) यांचा समावेश आहे. अटकेत घेतलेले आरोपी जैश-ए-मोहम्मद आणि अंसार गझवत-उल-हिंद या प्रतिबंधीत दहशतवादी संघटनांशी संबंधित असल्याचे उघड झाले आहे. एकीकडे जम्मू-कश्मीर पोलिसांनी अनंतनागसह विविध भागांत शोधमोहीम सुरू केली असून, दुसरीकडे हरियाणा पोलिसांनीही चौकशीचा व्याप वाढवला आहे.

दहशतवादी मॉड्यूलचे स्वरूप



जम्मू-कश्मीर पोलिसांच्या माहितीनुसार, हा कट्टरपंथी व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांचा समावेश असलेला आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय दहशतवादी नेटवर्क आहे. पकडलेल्या आरोपींचा पाकिस्तान व इतर देशांतील परदेशी मार्गदर्शकांशी संपर्क असल्याचे निष्पन्न झाले आहे. चौकशीत पोलिसांना संशयास्पद दस्तऐवज, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि आयईडी बनवण्यासाठी लागणारे रासायनिक पदार्थ मिळाले आहेत. आरोपींकडून एक चिनी स्टार पिस्तूल, एक बेरेटा पिस्तूल, एक एके-५६ रायफल, आणि एक एके क्रिंकोव्ह रायफल (सर्व शस्त्रांमध्ये गोळ्या असलेल्या) जप्त करण्यात आल्या. फरीदाबादमध्ये सापडलेली २९०० किलो आयईडी तयार करण्याची सामग्रीमध्ये स्फोटक पदार्थ, रसायने, अभिकर्मक, ज्वलनशील द्रव्ये, इलेक्ट्रॉनिक सर्किट, बॅटऱ्या, तारा, रिमोट कंट्रोल, टाइमर आणि धातूच्या पत्र्याचा समावेश आहे.

### महिला डॉक्टरच्या भूमिकेचा तपास

फरीदाबादमधील अल-फलाह विद्यापीठात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरची संभाव्य भूमिकाही पोलिस तपासत आहेत. तिच्या कारमध्ये एक असॉल्ट रायफल सापडली असून ती सध्या चौकशीसाठी जम्मू-कश्मीरमध्ये आहे. विद्यापीठाच्या परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे, जेणेकरून पुराव्यांशी छेडछाड होऊ नये.उघड झाले आहे की सहाय्यक प्राध्यापक डॉ. मुजम्मिल यांनी स्फोटक आणि शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी विद्यापीठाजवळ स्वतंत्र खोली भाड्याने घेतली होती. फरीदाबादचे पोलिस आयुक्त सतींद्र कुमार गुप्ता यांनी याची पुष्टी केली आहे.

डॉ. मुजम्मिल यांच्या अटकेनंतर साधारण दहा दिवसांनी पोलिसांनी फरीदाबादच्या धौज भागातील त्यांच्या भाड्याच्या घराची झडती घेतली. तिथून सुमारे ३६० किलो अत्यंत ज्वलनशील पदार्थ (अमोनियम नायट्रेट असल्याचा संशय) तसेच मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि बॉम्ब तयार करण्याचे साहित्य सापडले.यामध्ये एक असॉल्ट रायफल (३ मॅगझिन आणि ८३ जिवंत काडतुसे), एक पिस्तूल ( ८ जिवंत काडतुसे), २ अतिरिक्त मॅगझिन, १२ सूटकेसेस, स्फोटकांनी भरलेली एक बादली, २० टायमर, ४ बॅटऱ्या, रिमोट ५ किलो वजनाचे धातूचे तुकडे, एक वॉकी-टॉकी सेट याचा समावेश आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, या साहित्याचा वापर उत्तर भारतात मोठ्या दहशतवादी हल्ल्यांसाठी केला जाणार होता.

## जळगाव - क्रिकेटच्या वादातून गोळीबारात तरुणाचा मृत्यू

जळगाव , १० नोव्हेंबर : शहरातील कांचन नगरातील विलास चौकात जुन्या वादातून झालेल्या गोळीबारात एका तरुणाचा मृत्यू झाला. आकाश उर्फ टपऱ्या युवराज बाविस्कर असं मृत तरुणाचं नाव असून तर या घटनेत अन्य तीन जण जखमी झाल्याची घटना रविवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास घडली. गोळीबार करणारा आकाश सपकाळे हा पसार झालेला आहे.जळगाव शहरात रविवारी दुपारी क्रिकेटच्या वादातून तांबापुरा परिसरात झालेल्या दगडफेकीची घटनेचा तणाव निवळत नाही तोच रात्री कांचन नगरातील विलास चौकात जुन्या वादातून गोळीबार झाला. यामुळे किरकोळ वादातून जिल्ह्यात गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. कांचननगर भागात दोन युवकांमध्ये किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. हद्दपार आकाश सपकाळे उर्फ डोया आणि सागर सपकाळे यांच्यामध्ये जुना वाद आहे. आकाश रविवारी परिसरात संध्याकाळपासून धुसफूस सुरू होती. रात्री हा वाद वाढत जाऊन आकाश याने सागरच्या घरासमोर येऊन गोळीबार केला. यात सागर सपकाळे यांचे भाचे गणेश सोनवणे यांच्या हाताला तर तुषार रामचंद्र सोनवणे यांच्या कानाला व आकाश बाविस्कर यांच्या छातीत गोळी लागली. जखमींना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी आकाश बाविस्कर याचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

## शेतकरी अन्नदाता, ऊर्जदाता, इंधनदाता झाला आता हायड्रोजनदाता होणार - नितीन गडकरी



लातूर, १० नोव्हेंबर - शेतकरी अन्नदाता ऊर्जदाता, इंधनदाता झाला आता हायड्रोजनदाता होणार असल्याची माहिती केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लातूर जिल्ह्यात दिली.लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना नितीन गडकरी यांनी शेतकरी आता हायड्रोजनदाता होणार असल्याचे म्हटले. शेतकऱ्यांचे कल्याण आणि भले व्हावे, यासाठी आपण कार्यरत आहोत. देशाच्या विकासात जीडीपी हा महत्त्वाचा मापदंड आहे, परंतु त्यात शेतीचा वाटा कमी आहे. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे कारण गावात रस्ते नाहीत, रोजगार नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः चा विचार बदलला पाहिजे., असे म्हणत गडकरी यांनी शेतकऱ्यांना मोलाचा सल्ला दिला आहे. आपल्याकडे अनेक दबावगट आहेत, पण शेतकऱ्यांचा दबावगट नाही. किल्लारीचा कारखाना ही सोन्याचे अंडी देणारी कोंबडी आहे. देशात ५३० साखर कारखाने असून त्यावर सुमारे अडीच कोटी लोकांचे भविष्य अवलंबून आहे. देशात ३६५ लाख टन साखरेचे उत्पादन होते आणि या बाबतीत आपण जगात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. उत्तर प्रदेशचे अर्थकारण साखर उद्योगावर आधारित आहे, अशी माहितीही गडकरी यांनी दिली.

## यूआयडीएआयकडून नवीन 'आधार' ॲप लाँच




मुंबई, १० नोव्हेंबर - भारतीय नागरिकांसाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) यांनी नवीन 'आधार' ॲपची घोषणा केली असून हे ॲप आधार कार्ड अधिक सुरक्षित आणि सुलभपणे वापरण्यास मदत करणार आहे. हे ॲप गूगल प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअरवर डाउनलोडसाठी उपलब्ध असून, मायआधार ॲपला पूरक म्हणून कार्य करेल. नव्या ॲपद्वारे वापरकर्ते आपले आधार कार्ड डिजिटल स्वरूपात जतन, दाखवू आणि सुरक्षितपणे शेअर करू शकतील.

पूर्वी नागरिक पीडीएफ फाइल किंवा डिजिलॉकरच्या माध्यमातून आधार सेव करत होते, मात्र हे नवीन ॲप सर्व सुविधा एका युनिफाइड प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देते. यूआयडीएआयनं स्पष्ट केलं आहे की हे ॲप मायआधार ॲपची जागा घेणार नाही, तर त्यास पूरक ठरेल. मायआधार ॲपमध्ये डिजिटल कार्ड डाउनलोड, पीव्हीसी कार्ड ऑर्डरिंग, ईमेल आणि मोबाईल व्हेरिफिकेशन तसेच व्हर्च्युअल आयडी जनरेशनसारख्या सुविधा आहेत, तर नव्या ॲपचं लक्ष मुख्यतः आधार कार्ड जतन करणे, दाखवणे आणि सुरक्षितपणे शेअर करणे यावर केंद्रित आहे.

या ॲपमध्ये वापरकर्त्यांना एका मोबाईल नंबरशी जोडलेले पाचपर्यंत आधार प्रोफाइल्स सेव करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांचे आधार कार्ड एका ठिकाणी उपलब्ध राहतील. याशिवाय, प्रोफाइल पेजवर आधार कार्ड मास्क करण्याची सुविधा देण्यात आली आहे, ज्यामुळे गोपनीयता कायम राखली जाते. आधार शेअर करताना व्हेरिफायबल क्रेडेंशियल फॉरमॅट वापरला जातो, जो दुसऱ्या पक्षाला आधाराची ओळख अधिक विश्वसनीयरीत्या सत्यापित करण्यास मदत करतो. तसेच, क्यूआर कोड स्कॅन करून आधारच्या मदतीने विविध सेवा आणि व्यवहार करणेही शक्य होणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे ॲप अत्याधुनिक असून त्यात बायोमेट्रिक लॉकची सुविधा दिली आहे. हे लॉक सक्रिय केल्यावर फेस ऑथेंटिकेशन किंवा फिंगरप्रिंटद्वारेच ॲप तात्पुरते अनलॉक करता येते. तसेच, आधार अपडेट झाल्यानंतर नव्या माहितीचं त्वरित प्रतिबिंब या ॲपमध्ये दिसेल, ज्यामुळे नाव, पत्ता किंवा इतर तपशील बदलल्यानंतरचा गोंधळ टाळला जाईल.

यूआयडीएआयनं सांगितलं की हे ॲप 'डिजिटल इंडिया' मोहिमेशी सुसंगत आहे आणि नागरिकांना कागदविरहित, सोयीस्कर डिजिटल ओळख प्रणालीकडे नेणारं महत्त्वाचं पाऊल आहे.

## मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक बिनविरोध




मुंबई, १० नोव्हेंबर - मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या सर्वांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने अजिंक्य नाईक यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. अजिंक्य नाईक पुन्हा एकदा एमसीएचे अध्यक्ष बनले आहेत. अध्यक्षपदासाठी जितेंद्र आव्हाड, प्रसाद लाड, मिलिंद नार्वेकर, डायना एडलजी आणि विहंग सरनाईक यांनी अर्ज भरला होता. पण या सर्वांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने अजिंक्य नाईक बिनविरोध अध्यक्ष झाले आहेत. आता मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि खजिनदार या पदांसाठी निवडणूक होणार आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी असताना अमोल काळे यांचे निधन झाल्याने अजिंक्य नाईक अध्यक्ष झाले होते. अजिंक्य नाईक यांची आता पुन्हा एकदा बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली आहे. अजिंक्य नाईक २३ जुलै २०२४ रोजी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. नाईक यांनी वयाच्या ३८ व्या वर्षी अध्यक्ष होण्याचा मान मिळवला होता.

अध्यक्षपदासाठीची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे. त्यामुळे आता इतर पदांसाठी निवडणूक होणार आहे. ही निवडणूक १२ नोव्हेंबरला होणार आहे.

### बिहार निवडणूक सोडून राहुल गांधींना कोर्टात हजर व्हावे लागणार?

## स्वातंत्र्यवीर सावरकर अवमान प्रकरणीच्या खटल्यात राहुल गांधी अडचणीत?

### न्यायालयाच्या अटी-शर्तींचा भंग, १३ नोव्हेंबरची सुनावणी राहुल गांधींसाठी अडचणीची?





पुणे, १० नोव्हेंबर - स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी केल्या बद्दल सात्यकी सावरकर ींं/ी राहुल गांधी प्रकरण न्यायालयात चालू आहे. विशेष चझचङ-न्यायालयाने यापूर्वी राहुल गांधी यांना कोर्टात सदर फौजदारी केसच्या सुनावणीमध्ये न्यायालयाने राहुल गांधींच्या वकिलांनी केलेल्या अर्जा नुसार उपस्थित न राहण्याची सूट दिली होती. परंतु सात्यकी सावरकरांचे वकील संग्राम कोल्हटकर यांनी, दिनांक ७/११/२०२५ ला, राहुल गांधी यांच्या कडून सदर गैरहजेरी बाबत मिळालेल्या परवानगीचा दुरुपयोग केला जात असून न्यायालयाने घातलेल्या अटी शर्थींचे पालन योग्य प्रकारे पालन होत नसल्यामुळे राहुल गांधी यांना अनुपस्थित राहण्याची दिलेली सदर परवानगी रद्द करावी, असा अर्ज न्यायालयाकडे केला आहे.

गेल्या सुनावणीवेळी आरोपी राहुल गांधी यांच्या वकिलांनी राहुल गांधी यांच्या वतीने न्यायालयात एक पर्सिस झणठडखड म्हणजे इन्फॉर्मेशन फॉर रेकॉर्ड असा अर्ज दाखल केला होता. तो अचानक मागे घेत सदर पर्सिस राहुल गांधी यांना मान्य नसून त्यांच्या संमतीविनाच त्यांच्या वकिलांनी दाखल केला होता, असे स्पष्ट झाले. यावरूनच सात्यकी सावरकर यांच्या वकिलांनी आक्षेप घेतला. कारण अटीनुसार, राहुल गांधीनी नियमितपणे आपल्या वकिलाशी संपर्क ठेवून योग्य ते निर्देश व माहितीची देवघेव करणे बंधनकारक आहे. त्याचा भंग झाल्याचे दावा संग्राम कोल्हटकर यांनी अर्जाद्वारे केला आहे.

तारीख पे तारीख

सदर अर्जास उत्तर देणे राहुल गांधी यांना बंधनकारक असताना सुद्धा, अनाकलनीय कारणामुळे सात्यकी सावरकर यांच्या वकिलांनी दिलेल्या अर्जांचा उद्देश व अर्थच कळत नाही, या विचित्र सबबीखाली राहुल गांधी यांचे वकील दर तारखेस पुढील तारीख मागून मूळ केस पुढे चालू देत नाहीत, असा आरोप एड. संग्राम पाटील यांनी केला आहे.

न्यायालयाने या प्रकरणातील दिरंगाई लक्षात घेऊन लगेचच १३ नोव्हेंबरची तारीख दिल्यामुळे राहुल गांधींना सात्यकी सावरकर यांच्या अर्जावर आपले म्हणणे मांडणे बंधनकारक झाले आहे. आता हा अर्ज मंजूर झाल्यास लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना लवकरच कोर्टासमोर प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक होणार आहे.

## अमेरिकेत २३ वर्षीय भारतीय विद्यार्थिनीचा मृत्यू

वॉशिंग्टन , १० नोव्हेंबर : अमेरिकेतील टेक्सासमध्ये एका २३ वर्षीय भारतीय विद्यार्थिनीचा अपार्टमेंटमध्ये मृतदेह सापडला आहे. या विद्यार्थिनीची ओळख आंध्र प्रदेशच्या राहत्या राजलक्ष्मी यार्लागड्डा उर्फ राजी असे करण्यात आली आहे. ही घटना समोर आल्यापासूनच तिच्या कुटुंबीय आणि मित्रगण मोठ्या धक्क्यात आहेत.

अलीकडेच पदवीधर झालेली आणि नोकरीच्या शोधात असलेली २३ वर्षांची राजलक्ष्मी गंभीर खोकला व छातीत दुखणे यामुळे मृत्युमुखी पडली. आंध्र प्रदेशातील बापटला जिल्ह्यातील कर्मेचेडू गावची राहणारी राजलक्ष्मी यार्लागड्डा अलीकडेच टेक्सास एएम युनिव्हर्सिटी कॉर्पस क्रिस्टी येथून पदवी प्राप्त केली होती. ही माहिती टेक्सासच्या डेंटन शहरात तिच्या चुलत भाऊ चैतन्य वायव्हीके यांनी सुरू केलेल्या 'गो फंड मी' मोहिमेतून मिळाली आहे. निधी संकलकाच्या म्हणण्यानुसार, राजलक्ष्मी आपल्या कुटुंबासाठी उज्वल भविष्य निर्माण करण्याच्या आशेने अमेरिकेत आली होती. राजलक्ष्मीच्या कुटुंबाची कमाई मुख्यतः त्यांच्या शेती व पशुपालनातून होते. 'गो फंड मी'मोहिमेत म्हटले आहे, राजलक्ष्मीच्या कुटुंबीयांसाठी हा अनपेक्षित नुकसान अतिशय दुःखद आहे, त्यामुळे आम्ही त्यांच्या मित्रमंडळी आणि प्रियजनांकडून मदतीची विनंती करीत आहोत. या निधी संकलन मोहिमेचा उद्देश १,२५,००० अमेरिकन डॉलर गोळा करणे आहे, जे त्यांच्या अंतिम संस्काराचा खर्च, शिक्षणासाठीचा कर्ज फेडणे, पार्थिव शरीर भारतात परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबाला काही आर्थिक मदत करण्यासाठी वापरले जाणार आहे.



## कार ईएमआय, गृहकर्ज आणि भविष्याची गुंतवणूक - तिन्हींचं गणित कसं बसवावं?


गुंतवणुकीची गोष्ट

मागील आठवड्यातील घर आणि गृह कर्ज यावरील लेखाच्या प्रतिक्रियांबद्दल आभार. तुमच्या प्रतिक्रिया शब्दरूप धारण करून फोनवर येतात, तेव्हा एक ऊर्जा मिळतेच, पण नवे विषय निवडायला पण मदत होते आणि म्हणूनच मागील विषयाला थोडा पुढे नेऊन गृहकर्जाचा हप्ता, कार आणि भविष्यातील गुंतवणूक याची सांगड कशी घालायची, हे बघण्याचा प्रयत्न करणार आहोत.

'घर असावं, कार असावी आणि भविष्य सुरक्षित असावं' हे आजच्या तरुण पिढीचं सामायिक स्वप्न आहे. पण या तिन्ही गोष्टींचं एकत्रित गणित मांडणे सोपे नसते. कारण, प्रत्येक गोष्ट एकाशी जोडलेली असते आणि प्रत्येक ईएमआयसोबत येते आर्थिक शिस्तीची परीक्षा. गेल्या काही वर्षांत भारतात कर्ज घेणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२५ या दशकात घर आणि वाहन कर्जाचे प्रमाण सुमारे ३५ टक्क्यांनी वाढले आहे. त्याचवेळी, म्युच्युअल फंड, एसआयपीमधील मासिक गुंतवणूक २०,००० कोटींच्या वर गेली आहे (एएमएफआय, २०२५). म्हणजेच भारतीय कुटुंब आता कर्ज आणि गुंतवणूक दोन्हीचा संतुलित वापर शिकत आहेत.

| डीटीआय श्रेणी | स्थिती | अर्थ |
|---|---|---|
| ३०% | उत्तम | गुंतवणुकीसाठी पुरेशी जागा |
| ३०ते ४०% | मध्यम | सावधगिरी आवश्यक |
| ४०% | धोकादायक | बचत कमी, आर्थिक ताण वाढतो |

उदा. जर तुमचं उत्पन्न १,००,००० रुपये असेल आणि गृहकर्ज + कार मिळून ४०,००० रुपये असतील, तर तुमचा डीटीआय ४०% आहे.



म्हणजे मर्यादित. अशा वेळी इतर कर्जे टाळणे आणि गुंतवणुकीत सातत्य ठेवणे महत्त्वाचे ठरते.

**व्यवहार्य उदाहरण : अमित आणि सागर**

| घटक | अमित (शिस्तबद्ध) | सागर (उपभोग प्रधान) |
|---|---|---|
| मासिक उत्पन्न | १,००,००० | १,००,००० |
| गृहकर्ज | ३५,००० | ४०,००० |
| कार | १०,००० | १५,००० |
| एसआयपी गुंतवणूक | ८,००० | ० |
| कर्ज-उत्पन्न प्रमाण | ४५% | ५५% |

**घर, कार आणि गुंतवणूक तिन्हींचं आर्थिक स्थान**

| घटक | उद्देश | प्रकार | परिणाम/परतावा |
|---|---|---|---|
| घर (गृहकर्ज) | स्थैर्य, मालमत्ता निर्माण | उत्पादक कर्ज | मूल्य वाढ, करसवलत |
| कार (वाहनकर्ज) | सोय, जीवनशैली | उपभोग कर्ज | मूल्य घट, व्याज भार |
| गुंतवणूक | भविष्य सुरक्षा | संपत्ती वाढवणारी सवय | दीर्घकालीन नफा, स्वातंत्र्य |

घर हे दीर्घकालीन संपत्ती आहे, पण कार ही वापरातून घसरत जाणारी मालमत्ता आहे आणि गुंतवणूक भविष्याची खरी शक्ती आहे. म्हणूनच 'गाडी आधी की घर?' यापेक्षा 'दोन्ही चालतील, पण गुंतवणूक थांबू नये' हे सूत्र अधिक महत्त्वाचे आहे.

**आर्थिक शिस्तीचे सूत्र - ५०:३०:२०**

**आपल्या मासिक उत्पन्नाचे व्यवस्थापन साध्या पण प्रभावी पद्धतीने करता येते :**

| घटक | उत्पन्नातील हिस्सा | उपयोग |
|---|---|---|
| ५०% | दैनंदिन खर्च + | घर, कार, आवश्यक खर्च |
| ३०% | गुंतवणूक व बचत | एसआयपी, पीपीएफ, एनपीएस, विमा |
| २०% | आपत्कालीन निधी | आकस्मिक खर्च, वैद्यकीय मदत |

या तक्त्यातील प्रमाण पाळले, तर आर्थिक ताण कमी राहतो आणि भविष्याचा पाया मजबूत होतो.

**कर्ज ते उत्पन्न प्रमाण (डीटीआय) - स्थैर्याचे मापन**

डीटीआय = (एकूण ईएमआय भागिले मासिक उत्पन्न) गुणिले १००

आर्थिक स्थिती संतुलित, स्थिर वाढ ताण, गुंतवणूक थांबलेली

अमितने दोन्ही ईएमआय सांभाळत रु. ८,००० ची एसआयपी चालू ठेवली. १५ वर्षांनी त्याच्या गुंतवणुकीची रक्कम ४० लाखांच्या आसपास झाली (१२% वार्षिक परतावा धरून). सागरने मात्र गुंतवणूक थांबवली. त्याच्याकडे कार आणि घर आहे, पण भविष्यासाठी निधी नाही. फरक एवढाच - अमितने शिस्त राखली, सागरने घाई केली. मुळात ४० लाख रुपये १५ वर्षांनी सुद्धा लहान रक्कम असणार आहे. १५ वर्षांपूर्वीच्या १ लाखाची आज किती किंमत आहे विचार करा. त्यामुळे ४० लाख रुपये सुद्धा पुरेसे नाही; पण किमान काही तरी असावे म्हणून उदाहरण घेतले आहे.

**संतुलनासाठी काही सोपी सूत्रं**

१. ईएमआय एकूण उत्पन्नाच्या ४०% च्या आत ठेवा.
२. कारसाठी जास्त डाऊनपेमेंट करा; कर्ज कालावधी वाढवू नका.
३. गृहकर्जावर मिळणाऱ्या करसवलतीचा पूर्ण लाभ घ्या.
४. ईएमआयसोबत किमान ५,०००-१०,००० रुपयांची एसआयपी कायम ठेवा.
५. सहा महिन्यांचा आपत्कालीन निधी तयार ठेवा.

या पाच साध्या पायऱ्या म्हणजे आर्थिक स्थैर्याचा पाया आहेत. आपण मागील लेखात सुद्धा डीटीआयवर चर्चा केली होती आणि आज सुद्धा आपण तोच दोरा पुढे नेत आहे. त्यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कार घेणे आवश्यक असल्यासच घावी, ओलासारख्या कंपन्या आहेत, ज्या तुम्हाला ती सोय करून देऊ शकतात. पण घेणे अनिवार्य असलेच तर डाऊनपेमेंट अधिक करावे, आपल्या बजेटमध्ये असलेली आणि डीटीआय डिस्टर्ब होणार नाही, याचा विचार करून घ्यावी.

मागील लेखातील अमित आठवतोय? त्याचाच पुढला प्रश्न की, ७ लाख रुपये शिल्लक आहे. ४० लाख मिळालेले आणि त्यापैकी त्यांनी ३३ लाखांचे गृहकर्ज भरले होते. आता ७ लाख शिल्लक आहेत आणि त्याच्या वापरात असलेल्या कारवर सुद्धा जवळपास ७ लाख कर्ज शिल्लक आहे, तो म्हणतो की, कर्जमुक्त होऊ का? कारवर १२,००० रुपये ईएमआय आहे. गृह कर्ज संपवले म्हणून तो ४०,००० रुपयांचा हप्ता आता गुंतवणुकीत जाणार आहे. डीटीआय ५% च्या सुमारास आहे. त्यामुळे १२,००० रुपये हप्ता भरणे काही कठीण नाही. दोन अटी - १ त्याने कार कर्ज संपवायचे आणि १२,००० ईएमआय जो वाचेल, त्याची एसआयपी करायची. म्हणजे ५ वर्षांत ९ लाख ८० हजार १२% दराने जमा होतील. २) ७ लाख आज एकरकमी गुंतवले. ५ वर्षांत त्याचे होतील १२ लाख ३३ हजार आणि ५ वर्षांत तो कारचे कर्ज पण संपवेल.

म्हणजे, अमितने कार कर्ज आज एकरकमी भरायची घाई करू नये तसेच डेप्रीशीएटिंग असेट हे नेहमी कर्जावरच घ्यावे.

आजचा तरुण केवळ नोकरी करणारा नाही; तो आर्थिक निर्णय घेणारा आणि भविष्य नियोजित करणारा नागरिक आहे. त्याचे गणित केवळ ईएमआय नाही, ते गुंतवणुकीचेही आहे. घराचे कर्ज त्याला छत देते, कार त्याला गती देते, आणि गुंतवणूक स्वातंत्र्य देते. ही तीनही साधने योग्य प्रमाणात वापरली, तर तो केवळ ईएमआय भरणारा राहत नाही, तो आर्थिकदृष्ट्या संपत्ती निर्माण करणारा नागरिक बनतो. बघा पटतंय का? ●●

● **शिवानी दाणी वखरे**
संचालिका, मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि.
९८६०१३३८६०

## वित्तीय सल्लागाराचा उपयोग का करावा?

अर्थभान

१९९० च्या सुरुवातीला भारतात उदारीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. पुढील दशकभरात अनेक क्षेत्रे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खुली झाली. आपल्या जीवनशैलीत, कामाच्या वातावरणात, संवादाच्या पद्धतीत आणि एकूणच उपभोगाच्या नमुन्यात आमूलाग्र बदल झाला.

गुंतवणुकीच्या पद्धतीत मात्र फार उशिरा बदल झाला, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. सुमारे ६-७ वर्षांपूर्वीपर्यंत गुंतवणूक करणे ही अगदी सोपी गोष्ट होती पोस्ट ऑफिस, बँकेची मुदत ठेव, थोडी फार विमा पॉलिसी आणि बस्स! कारण, या गुंतवणूक साधनांचे स्वरूप सोपे होते योग्य परतावा देणारे आणि सहज उपलब्ध असणारे. त्यामुळे लोकांनी या चौकटीपलीकडे विचारच केला नाही.

जागतिकीकरणानंतर भारतात मोठ्या मध्यमवर्गाचा जन्म झाला. या वर्गाची महत्त्वाकांक्षा वाढत गेली क्लासी स्विस घड्याळे, आलिशान गाड्या, परदेशी सुट्या आणि शहरातील सर्वांत प्रतिष्ठित पत्ता असलेले घर! परंतु त्याच वेळी त्याची गुंतवणुकीची पद्धत जुनीच राहिली. भविष्यनिर्वाह निधी, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र आणि मुदत ठेव! या साधनांचे महत्त्व आजही कायम आहे, पण फक्त यांच्यावर अवलंबून राहणे गुंतवणूकदारासाठी धोकादायक ठरू शकते.



आज गुंतवणूकदारांसमोरचा सर्वांत मोठा धोका म्हणजे आजूबाजूला घडणाऱ्या सूक्ष्म बदलांची जाणीव न होणे. जुन्या काळात निश्चित परतावा देणाऱ्या गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे. पूर्वी अनेक गुंतवणुकी करमुक्त असायच्या, पण आज त्या संपल्यात जमा आहे. गुंतवणुकीचे जग बदलले आहे आणि दररोज अधिक गुंतागुंतीचे होत आहे. एकाच उपायाने प्रत्येक समस्येचे निराकरण होत नाही. त्यामुळे आजच्या गुंतवणूकदारासाठी सर्वांत मोठे आव्हान म्हणजे, आपली उद्दिष्टे स्पष्ट करणे आणि दुसरे त्या उद्दिष्टांशी सुसंगत अशी योग्य गुंतवणूक साधने निवडणे. अनेकदा काही जीवन घडामोडी लोकांना व्यावसायिक सल्लची गरज भासवतात, जसे की, मोठी रक्कम मिळणे, लग्न, मुलाचा जन्म, जोडीदाराचा मृत्यू किंवा निवृत्ती. कधी कधी आपण आपल्या गुंतवणुकीच्या प्रगतीबद्दल असमाधानी असतो किंवा वेळेअभावी गुंतवणुकीकडे लक्ष देऊ शकत नाही. स्वतः गुंतवणूक करणारे (डू इट यूअर सेल्फ) गुंतवणूकदारांना अनेकदा व्यावसायिक सल्लागाराइतकी माहिती नसते. प्रभावी गुंतवणूक व्यवस्थापनाची गुंतागुंत समजून घेणे, हे कठीण काम असते. काही लोकांना वाटते की, केवळ फार मोठी संपत्ती असलेल्या व्यक्तीलाच व्यावसायिक सल्लागाराची गरज असते. पण हे पूर्णपणे चुकीचे आहे. तुमची आर्थिक स्थिती काहीही असो, योग्य गुंतवणूक व्यावसायिकाचा सल्ला घेणे नेहमीच शहाणपणाचे ठरते.

इथेच वित्तीय सल्लागार कामी येतो. दुर्दैवाने, भारतात अजूनही वित्तीय नियोजनासाठी ठराविक व्यावसायिक मानक नाही. विमा एजंट, म्युच्युअल फंड एजंट इत्यादी स्वतःला वित्तीय सल्लागार म्हणवतात, परंतु खऱ्या वित्तीय नियोजकाला फक्त विमा किंवा म्युच्युअल फंड नव्हे, तर गुंतवणुकीविषयी आवश्यक असलेल्या इतर अनेक विषयांचे जसे कर नियोजन, संपत नियोजन, गुंतवणूक व्यवस्थापन, आर्थिक बाजारात उपलब्ध समस्त पर्याय आणि मुख्य म्हणजे या सतत बदल होत असलेल्या विषयावर नजर असणे.

एक चांगला वित्तीय नियोजक खालीलप्रमाणे विविध टप्प्यांमध्ये तुमच्यासोबत काम करतो.

१. ग्राहक-नियोजक यांच्यात औपचारिक नाते प्रस्थापित करणे.
२. ग्राहकाची माहिती आणि आकडे गोळा करणे.
३. आर्थिक स्थितीचे विश्लेषण.
४. वित्तीय आराखडा तयार करणे.
५. आराखड्याची अंमलबजावणी करणे.
६. आराखड्याचे निरीक्षण करून आवश्यक बदल करणे.

जेव्हा तुम्ही वित्तीय सल्लागाराची मदत घेण्याचा निर्णय करता, तेव्हा पहिला टप्पा म्हणजे सल्लागार काय करू शकतो, हे समजून घेणे. व्यावसायिक सल्लागारांची पात्रता आणि प्रमाणपत्रे यांचे महत्त्व समजून घ्या. व्यावसायिक पदवी जशी की चार्टर्ड अकाऊंटंट (सीए), कंपनी सेक्रेटरी (सीएस), एमबीए, सीएफए (सर्टिफाइड फायनान्शियल एनालिस्ट, सर्टिफाईड फायनान्शियल प्लानर या सर्व मान्यताप्राप्त पदव्या आहेत.

या पदव्या मिळवण्यासाठी वित्तीय नियोजनाच्या सर्व पैलूंवरील सखोल प्रशिक्षण आवश्यक असते. जोखमीचे व्यवस्थापन, विमा नियोजन, गुंतवणूक नियोजन, निवृत्ती नियोजन, कर नियोजन, संपत्ती नियोजन इत्यादी. व्यावसायिक अभ्यासक्रमांचा मोठा फायदा एका सामान्य गुंतवणूकदाराला घेता येतो; कारण या सर्व अभ्यासक्रमांमध्ये सतत व्यावसायिक शिक्षणाद्वारे नवनवीन विषयांबद्दल सल्लागार अवगत असतो. आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक जगात गुंतवणुकीचे असंख्य पर्याय, कर कायद्यातील बदल आणि बाजारातील चढउतार यामधून वाट काढणे खरोखरच आव्हानात्मक आहे. एक व्यावसायिक वित्तीय सल्लागार म्हणजे तुमचा दिशादर्शक, जो तुम्हाला तुमच्या उद्दिष्टांवर केंद्रित ठेवतो आणि काळानुसार योग्य बदल घडवून आणतो. त्याचे ज्ञान आणि अनुभव तुमच्या पैशाला अधिक प्रभावीपणे काम करायला लावतात तसेच भावनिक किंवा चुकीच्या निर्णयांपासून तुम्हाला वाचवतात. अनिश्चिततेने भरलेल्या या आर्थिक जगात एक विश्वासू वित्तीय सल्लागार असणे हे चैनीचे नव्हे, तर दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य आणि मन:शांतीसाठी अत्यावश्यक आहे. ●●

● **पराग परांजपे**
गुंतवणूक तज्ज्ञ/९८२२७३८९०३
Think Financial Intermediary Services Pvt. Ltd.

## 'मार्केट कॅप'ची टोपी!

लोक तुमच्याकडे कधी आकर्षित होतील, याचे फंडे सांगताना चाणक्याने म्हटले होते की, एकतर तुम्ही खूप सुंदर दिसत असाल किंवा तुम्ही यशाच्या शिखरावर असाल किंवा स्वत:सोबतच खुश असाल, तर लोक तुमच्याकडे आपोआपच आकर्षित होतील. ही बाब व्यक्तिगत जीवनात लागू होत असेलही. मात्र, आपण शेअर बाजाराच्या संदर्भात याचा विचार केला, तर यात ही बाब अगदी चपगल बसते.



एखाद्या शेअरकडे लोक कधी आकर्षित होतात, तर तो दिसायला चांगला अर्थात् चांगला परतावा देईल, असे वाटत असेल किंवा कंपनी यशाच्या शिखरावर असेल किंवा स्वत:सोबतच खुश असेल. म्हणजेच कंपनीचा तिमाही नफ्याचा अहवाल चांगला असेल, तर गुंतवणूकदार त्या कंपनीत गुंतवणुकीविषयी विचार करणारच. अशा कंपनीचे मार्केट कॅप अर्थात् बाजार भांडवलही शिखरावर पोहोचते. मार्केट कॅप म्हणजे कंपनीच्या एकूण थकबाकी असलेल्या शेअर्सचे मूल्य, म्हणजेच सध्या तिच्या शेअरहोल्डर्सकडे असलेल्या सर्व शेअर्सचे मूल्य. जारी केलेल्या शेअर्सच्या एकूण संख्येला त्यांच्या बाजारभावाने गुणाकार करून त्याची गणना केली जाते. समजा... कंपनी 'अ'चे १ कोटी शेअर्स बाजारातून खरेदी केले आहेत. जर एका शेअरची किंमत २० रुपये असेल, तर कंपनीचे बाजार मूल्य १ कोटी गुणिले २० म्हणजेच २० कोटी रुपये आहे. शेअर्सच्या किमती वाढत्या किंवा घसरत्या असल्याने कंपन्यांच्या बाजार मूल्यात चढ-उतार होते. शेअरच्या किमतीत वाढ, मजबूत आर्थिक कामगिरी, सकारात्मक बातम्या किंवा घटना, सकारात्मक बाजार भावना आणि उच्च किमतीला शेअर्स जारी करणे म्हणजे बाजार मूल्य वाढणे. याउलट, शेअरच्या किमतीत घसरण, खराब निकाल, नकारात्मक बातम्या किंवा घटना, अर्थव्यवस्था किंवा बाजारपेठेत घसरण, शेअर बायबॅक किंवा डिलिस्टिंग म्हणजे बाजार मूल्य कमी होणे. मोठे मार्केट कॅप कंपनीला निधी उभारण्यास, कर्ज घेण्यास किंवा इतर कंपन्यांना ताब्यात घेण्यास मदत करते. तथापि, लहान किंवा कमी मार्केट कॅप कंपनीची आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता कमी करते. मार्केट कॅपमध्ये वाढ झाल्याने गुंतवणूकदारांना थेट फायदा होतो; कारण त्यांच्या शेअर्सची किंमत वाढते. तथापि, घसरणीमुळे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे गुंतवणूकदार त्यांचे शेअर्स विकण्याचा निर्णय घेऊ शकतात.

जर टीसीएसचे बाजार भांडवल १२.४३ लाख कोटींपर्यंत वाढले, तर गुंतवणूकदारांची संपत्ती वाढेल आणि कंपनीला भविष्यातील गुंतवणुकीसाठी अधिक भांडवल मिळू शकेल. तथापि, जर तिचे बाजार भांडवल कमी झाले, तर तिला तोटा सहन करावा लागू शकतो. बाजार भांडवलाच्या बाबतीत देशातील आघाडीच्या दहा कंपन्यांमध्ये रिलायन्स, एचडीएफसी, एअरटेल, टीसीएस, आयसीआयसीआय, एसबीआय, बजाज फायनान्स, इन्फोसिस, एलअयासी आणि एचयूएल यांचा समावेश आहे. रिलायन्स यात अव्वल स्थानी असून, मुकेश अंबानींच्या या कंपनीचे बाजार भांडवल २० लाख कोटी रुपये आहे. ●●

● **सोनाली ठेंगडी**-७७५५९३८८२२

| | ३१ऑक्टोबर बंदभाव (रु.) | ०७ नोव्हेंबर बंदभाव (रु.) | उतार/चढाव |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ८३,९३९ | ८३,२१६ | -७२३ |
| निफ्टी | २४,७२२ | २५,४९१ | +७६९ |
| सोने | १२३२८० | १२२०२० | -१२६० |
| चांदी | १५१००० | १५२५०० | +१५०० |
| कच्चे तेल बॅरल | $६०.९८ | $६३.६३ | $+२.६५ |



## होंडाची एसयूव्ही लवकरच लॉन्च होणार

जपानची आघाडीची वाहन उत्पादक कंपनी होंडाने भारतात आपली नवीन 'झीरो सीरिज' इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) लॉन्च करण्याची योजना जाहीर केली आहे. या मालिकेतील दुसरी प्रीमियम एसयूव्ही भारतात तिच्या जागतिक डेब्यूच्या आधीच सादर केली जाणार आहे. होंडाची ही 'झीरो सीरिज' रेंजमधील दुसरी एसयूव्ही असणार आहे आणि ती भारतात पूर्णपणे आयात केलेले युनिट (सीबीयू) मॉडेल म्हणून आणली जाईल. आगामी ईव्हीच्या नेमक्या तांत्रिक बाबी अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेल्या नाहीत. मात्र, होंडा झीरो सीरिज सिंगल आणि ड्युअल इलेक्ट्रिक मोटर कॉन्फिगरेशनमध्ये उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे ती रीअर-व्हील ड्राईव्ह (आरडब्ल्यूडी) आणि ऑल-व्हील ड्राईव्ह (एडब्ल्यूडी) अशा दोन्ही पर्यायांमध्ये मिळेल. सिंगल मोटर व्हर्जन सुमारे २४१ बीएचपीची पॉवर देऊ शकते, तर ड्युअल मोटर ईव्हीची पॉवर ४८२ बीएचपीपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. या ईव्हींमध्ये किमान ९० केडब्ल्यूएच क्षमतेचा मोठा बॅटरी पॅक मिळण्याची शक्यता आहे. जो एकदा फुल चार्ज केल्यावर सुमारे ४९० किलोमीटरची रेंज देऊ शकेल. ●●

## पुनर्विकास हक्क, प्रक्रिया आणि 'बहुमत संमती'चे महत्त्व

**पुनर्विकासाची गरज व कायदेशीर चौकट**

महाराष्ट्रात जुन्या व जीर्ण इमारतींचा पुनर्विकास हा शहरी विकासाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जोडीला अनेक इमारती 'महाराष्ट्र अपार्टमेंट मालकी अधिनियम, १९७० (महाराष्ट्र अपार्टमेंट मालकी कायदा- एम.ए.ओ.ए.)' अंतर्गत नोंदणीकृत आहेत. या इमारतींना 'कॉंडोमिनियम' म्हटले जाते. सहकारी संस्थांमध्ये संपूर्ण इमारत व जमीन संस्थेच्या मालकीची असते, तर एम.ए.ओ.ए.अंतर्गत प्रत्येक फ्लॅटमालक आपला फ्लॅट स्वतंत्रपणे मालकी हक्काने ठेवतो आणि सर्वजण मिळून सामाईक क्षेत्रावर अविभाज्य हिस्सा ठेवतात. अशा इमारतींमध्ये पुनर्विकास करताना सर्वांत महत्त्वाची भूमिका असते 'डीड ऑफ डिक्लेरेशन' आणि नव्याने घातलेल्या कलम ६ व ६ यांची.

**'घोषणापत्र' (डीड ऑफ डिक्लेरेशन) कोणत्याही कॉंडोमिनियमची आत्मा**

**घोषणापत्र म्हणजे काय?**

हा दस्तऐवज मूळ बांधकामदार (प्रमोटर/बिल्डर) नोंदणी करून इमारतीला 'कॉन्डोमिनियम'स्वरूप देतो. तोच दस्तऐवज ठरवतो की, कोणत्या फ्लॅटला किती क्षेत्रफळ, किती अविभाज्य हिस्सा आणि मतदानाचे हक्क आहेत.

**घोषणापत्रातील प्रमुख बाबी**

प्रत्येक फ्लॅटचे क्षेत्रफळ व त्यावरील मालकी हक्क. **सामाईक क्षेत्रे -** जिने, लिफ्ट, टेरेस, कंपाऊंड, पाणी यंत्रणा इत्यादींचे वर्णन. वापराच्या मर्यादा, हस्तांतरणाचे नियम, दुरुस्तीची जबाबदारी. अपार्टमेंट धारकांची संघटना (अपार्टमेंट मालकांची संघटना-ए.ओ.ए.ओ.) व तिचे उपनियम.

**पुनर्विकासासाठी घोषणापत्राचे महत्त्व**

मालकी हक्काचा पुरावा म्हणून घोषणापत्र आवश्यक आहे.'बहुमत संमती' ठरवताना मतदानाचे प्रमाण याच घोषणापत्रावर आधारित असते. घोषणापत्र अद्ययावत नसल्यास पुनर्विकासाची प्रक्रिया प्राधिकरण स्वीकारत नाही. म्हणून कोणत्याही प्रकल्पाचा पाया म्हणजे योग्य प्रकारे नोंदणीकृत डीड ऑफ डिक्लेरेशन.

**पुनर्विकासासाठी कायदेशीर आधार - कलम ६अ व ६ब**



**कलम ६अ - बहुमत संमतीने पुनर्विकास**

- २०१८ च्या दुरुस्ती कायद्यांनतर कलम ६अ अंतर्गत हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, बहुमताने मंजुरी मिळाल्यास अपार्टमेंट मालक पुनर्विकास ठरवू शकतात.
- याआधी १००% संमती आवश्यक होती, जी प्रत्यक्षात अशक्य ठरत होती. या कलमामुळे पुनर्विकासाचा निर्णय आता लोकशाही पद्धतीने बहुमताने घेता येतो.

**कलम ६ ब - बहुमताच्या निर्णयाची अंमलबजावणी**

- महाराष्ट्र अपार्टमेंट मालकी (दुरुस्ती) अधिनियम, २०२३ नुसार (अंमलात येण्याची तारीख : २३ ऑक्टोबर २०२३) हे कलम लागू झाले.

**कलम ६ चा मुख्य हेतू :**

- ए.ओ.ए.ओ.ने बहुमताने पुनर्विकासाचा निर्णय घेतला आणि तो नगररचना प्राधिकरणाने (नियोजन प्राधिकरण) मंजूर केला, तर सर्व अपार्टमेंट धारकांनी इमारत रिकामी करून द्यावी.
- पुनर्विकासकर्ता किंवा संघटनेने पर्यायी निवास व्यवस्था किंवा भाडे देणे बंधनकारक आहे.
- जो मालक जागा सोडण्यास नकार देतो, त्याच्याविरुद्ध प्राधिकरण लेखी नोटीस देऊ शकते आणि तरीही तो न मानल्यास पोलिसांच्या सहकार्याने बेदखल करू शकते. हा बदल 'अल्पसंख्यक विरोधकांमुळे थांबलेले प्रकल्प' यावर तोडगा म्हणून करण्यात आला आहे.

**अंतर्गत पुनर्विकासाची टप्प्याटप्प्याने प्रक्रिया**

**१. कायदेशीर स्थिती तपासणी**

- इमारत एम.ए.ओ.ए.अंतर्गत आहे का, हे पाहणे. ● नसल्यास प्रथम घोषणापत्र नोंदवून ए.ओ.ए.ओ. स्थापन करणे.

**२. रचनात्मक ऑडिट व व्यवहार्यता अहवाल**

- तज्ज्ञ अभियंता/अभियंता वास्तुविशारद यांचा अहवाल घेणे.
- नवीन एफएसआय, टीडीआर, आर्थिक व्यवहार्यता तपासणे.

**३. ए.ओ.ए.ओ.ची सर्वसाधारण सभा**

- योग्य नोटीस देऊन सभा बोलावणे.
- बहुमताने पुनर्विकासास मंजुरी देणारा ठराव करणे.

**४. बांधकामदारांची निवड प्रक्रिया**

- विविध प्रस्ताव मागवणे, तुलना तक्ते तयार करणे. ● भाडे, कॉर्पस, कालमर्यादा, बांधकामाची गुणवत्ता, बँक हमी तपासणे.

**५. निवडलेल्या बांधकामदारासोबत करार**

- विकास करार व पॉवर ऑफ ॲटर्नी नोंदवणे.

**६. नगररचना प्राधिकरणाकडे मंजुरी**

- पुनर्विकास आराखडा सादर करून मंजुरी मिळवणे.

**७. कलम ६ ची अंमलबजावणी**

- मंजुरी मिळाल्यानंतर सर्वांनी जागा रिकामी करणे आवश्यक.
- पुनर्विकासकर्ता पर्यायी निवास किंवा भाडे देतो.

**८. सहकार्य न करणाऱ्या मालकांवरील कारवाई**

- ए.ओ.ए.ओ. प्राधिकरणाकडे अर्ज करून नोटीस देण्याची विनंती करू शकते.
- गरज पडल्यास पोलिसांच्या साहाय्याने बेदखल केले जाऊ शकते.

**९. बांधकाम काळातील प्रक्रिया**

- रेरा अंतर्गत नोंदणी, हप्ते, विमा व प्रगती अहवाल देणे.

**१०. नवीन फ्लॅटचे हस्तांतरण व अंतिम हस्तांतरण**

- बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ओसी घेऊन मालकांना नवीन फ्लॅट सुपूर्त करणे.
- नवीन घोषणापत्रात सुधारणा नोंदवणे.

**घोषणापत्राच्या आधारे बहुमत ठरवण्याचे निकष**

- 'बहुमत' मोजताना घोषणापत्रातील अपार्टमेंट संख्या व त्यांचा अविभाज्य हिस्सा यावर आधारित गणना होते.
- अनेक ठिकाणी मतदानाचे प्रमाण संख्येने नव्हे तर अविभाजित व्याजाच्या टक्केवारीने ठरवले जाते.
- त्यामुळे घोषणापत्र अद्ययावत ठेवणे अत्यावश्यक आहे.
- कोणत्याही मालमत्तेतील बदल (जसे की, दोन फ्लॅट एकत्र करणे) नोंदवणे आवश्यक आहे.

**मालकांचे हक्क व संरक्षण**

- कोणत्याही मालकास पर्यायी निवास किंवा भाडे दिल्याशिवाय बेदखल करता येत नाही.
- बेदखल नोटीस लेखी स्वरूपात आणि वाजवी कालमर्यादेसह दिली जाते.
- प्राधिकरणाची कार्यवाही कायद्याच्या प्रक्रियेनेच होते.
- अशा प्रकारे कायदा विकास व व्यक्तिगत हक्क यांचा समतोल राखतो.

**व्यावहारिक सूचना (संघटना व विकसकासाठी)**

- **नोंदी अद्ययावत ठेवा :** घोषणापत्र, उपनियम, मालकी नोंदी तपासून अद्ययावत करा.
- **पारदर्शकता ठेवा :** सर्व सभा, ठराव व मतदानाची नोंद लेखी ठेवा.
- **कायदेशीर सल्ला घ्या :** करारात एम.ए.ओ.ए., रेरा व यूडीसीपीआरच्या सर्व कलमांचा समावेश करा.
- **हमी व विमा :** कॉर्पस, भाडे, बँक हमी एस्क्रो खात्यात ठेवा.
- **संचार ठेवा :** प्रत्येक मालकास लेखी माहिती द्या, यामुळे वाद कमी होतात.

**निष्कर्ष -** या सर्व प्रक्रियेत सर्वाधिक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे डीड ऑफ डिक्लेरेशन, जो प्रत्येक फ्लॅटमालकाचा हक्क, मतदानाचा हक्क आणि पुनर्विकासातील भूमिका निश्चित करतो. योग्य घोषणापत्र, बहुमताचा ठराव आणि पारदर्शक करार या तिन्हींच्या संगमानेच पुनर्विकास प्रकल्प यशस्वी, सुरक्षित व न्याय्य ठरतो. ●●

● **ॲड. हितेश प्रवीण पारसे,**
नागपूर. ९०९६३३२३५३
कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार

● संयोजक : **अभिजित वर्तक**-९४२२९२३२०१ ●

## हॅवेल्स

उद्योगाच्या उगमकथा



घराघरात वापरल्या जाणाऱ्या केबल, वायर, मोटर, पंखे, वॉटर हीटर, एअर कंडिशनर ही उत्पादने तयार करणारी 'हॅवेल्स' ही परदेशी कंपनी असावी, असे नावावरून तरी वाटते ना? पण ही पूर्णतः भारतीय कंपनी आहे. नावात एक गंमत दडली आहे. एका भारतीय उद्योजकाने आपल्या उत्पादनांना दिलेले ते एक नाव आहे. हॅवेल्स हे फॅशन डिझायनर रोहित गांधी यांचे आजोबा हवेली राम गांधी यांनी त्यांच्या स्विच गिअर कंपनीला काही दशकांपूर्वी दिलेले इंग्रजी नाव आहे. हवेलीराम गांधी यांच्या नावातील हवेलीराम वरून ' हॅवेल्स' असे नाव झाले. अनेकांना हे कदाचित माहिती नसावे. हॅवेल्सचे संस्थापक, माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक किमत राय गप्ता यांनी दिल्लीत एक लहान व्यापारी म्हणून कारकीर्दीची सुरुवात केली. त्यांनी हॅवेल्स नावाची एक भारतीय बहुराष्ट्रीय विद्युत उपकरण कंपनी स्थापन केली. त्यांनी पंजाबमध्ये शाळेत शिक्षक म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली. सुरुवातीपासूनच त्यांची स्वप्ने मोठी होती आणि ते त्यांच्या व्यापार व्यवसायात नवीन शक्यतांचा शोध घेत असत.

गुप्ता यांना भगीरथ पॅलेसमध्ये त्यांच्या काकांच्या इलेक्ट्रिकल वस्तूंच्या दुकानात काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या उत्साहाने प्रभावित होऊन काकांनी त्यांना व्यवसायात समान भागीदार बनवले. १९५८ मध्ये किमत राय गुप्ता मालेरकोटलाहून जुन्या दिलीला गेले, जिथे त्यांनी विद्युत उपकरणांच्या व्यापाराचे दुकान सुरू केले. त्यांनी १०,००० रुपयांच्या गुंतवणुकीतून गुप्ताजी ॲण्ड कंपनीची स्थापना केली. ही कंपनी फिक्स्चर आणि इलेक्ट्रिकल केबल्स ही उत्पादने तयार करीत होती.

१९७१ मध्ये त्यांनी दिल्लीतील व्यावसायिक हवेलीराम गांधी यांच्याकडून ७ लाख रुपयांना हॅवेल्स स्विचगियर ब्रॅण्ड गुप्ताजींनी विकत घेतला. त्यानंतर कधीच त्यांनी मागे वळून बघितले नाही. त्यानंतर कंपनीने केबल्स, लाइटिंग्ज, उपकरणे, पंखे आणि गीझर यासारख्या इतर उत्पादन क्षेत्रात प्रवेश केला. १९७६ मध्ये कंपनीने कीर्ती नगर दिल्ली येथे आपला पहिला कारखाना स्थापन केला. १९८० मध्ये हॅवल्स कंपनीने रिव्हायरेबल स्विचेस चेंज ओव्हर स्विचेस आणि एनर्जी मीटर उत्पादन सुरू केले.

१९९० मध्ये कंपनीने जर्मन कंपनीसोबत तांत्रिक साहाय्यता मिळवली आणि त्यातून एमसीबी आणि ईएलसीबी तयार करण्याचे तंत्रज्ञान अवगत केले. १०,००० रुपयांपासून प्रवास सुरू करणाऱ्या आणि २२,००० कोटी रुपयांचे साम्राज्य उभारणाऱ्या माणसाची ही कहाणी.

२००७ साली हॅवेल्स कंपनीने मोठी झेप घेतली. जागतिक लाइटिंग क्षेत्रातील कंपनी सेल्वेनिया विकत घेतली. आज हॅवेल्स ही बहुराष्ट्रीय ग्राहक विद्युत उपकरणे उत्पादने तयार करणारी कंपनी आहे. कंपनीच्या एकूण ३५ शाखा ६० देशांमध्ये आहेत. ६० हजारांवर कर्मचारी कार्यरत आहेत. भारतात कंपनीच्या १४ उत्पादन साईटस् आहेत. कंपनीचे स्वतःचे ७०० पेक्षा अधिक स्टोअर्स भारतात विखुरले आहेत. नोएडा येथे कंपनीचे मुख्यालय आहे. हॅवेल्सच्या सीएसआर उपक्रमाला हॅवेल्स स्टेप्स म्हणून ओळखले जाते, त्याचे वाक्य 'छोटे कदम,बडी सोच' असे आहे. सीएसआर अंतर्गत अनेक उपक्रम कंपनी राबवत आहे कंपनीतर्फे अलवर परिसरातील ५० हजार विद्यार्थ्यांना दररोज मध्यान भोजन दिल्या जाते. आरोग्य आणि पोषण स्वच्छता शिक्षण कौशल्य विकास पर्यावरण मानवतावादी कार्य आरोग्यसेवा इत्यादी क्षेत्रात सामाजिक बदल घडवून आणून समुदायांचे जीवन सुधारणे हे या कंपनीच्या सीएसआर उपक्रमांचे उद्दिष्ट आहे. किमत राय गुप्ता यांचे पुत्र अनिल राय हे हॅवेल्स इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. ते १९९२ मध्ये हॅवेल्समध्ये सहभागी झाले आणि त्यांच्या वडिलांच्या मार्गदर्शनात त्यांनी पदोन्नती मिळवली.

आज हॅवेल्स कंपनी जागतिक ब्रॅण्ड्स क्रॅबट्री, सिल्व्हानिया, कॉंकोर्ड, लुमिनन्स आणि स्टॅण्डर्डची मालक आहे. हॅवेल्स कंपनीने नवोन्मेष, उत्पादन आणि वितरण या प्रमुख क्षेत्रांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची भविष्यात योजना आखली आहे. भविष्यात मध्यपूर्व आणि आफ्रिकेसारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याचे कंपनीने उद्दिष्ट ठेवले आहे. कंपनीने बहुतेक जाहिराती क्रिकेट सामना दरम्यान दाखवल्या होत्या, कारण कंपनीचा असे मत होते की, इलेक्ट्रिकल उत्पादनांबद्दलचे निर्णय घरातील पुरुष घेतात. ●●

● **प्रा. दीपक कुळकर्णी,** नागपूर
९८२२५७५२५७

# उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे आवाहन

अहिल्यानगर, दि. १० : जिल्ह्यातील कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, राहाता, राहुरी, देवळाली प्रवरा, शिर्डी व श्रीगोंदा नगरपरिषद तसेच नेवासा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीकडून इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ११ नगरपरिषद व १ नगरपंचायत निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी संबंधित अधिनियमांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेश व सूचनांनुसार उमेदवारांनी कार्य करणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रमाणीकरण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफ.एम. वाहिन्या, चित्रपटगृहे, बल्क एस.एम.एस., व्हॉइस एस.एम.एस., संकेतस्थळे आदींचा समावेश होतो. समाजमाध्यमे (सोशल मीडिया) यात इंटरनेटद्वारे वापरली जाणारी संवादाची व माहितीची व्यासपीठे समाविष्ट होतात, ज्याद्वारे लोक एकमेकांशी संवाद साधतात, माहिती शेअर करतात, प्रतिक्रिया व्यक्त करतात, मते किंवा विचार मांडतात आणि विविध प्रकारची माहिती (फोटो, व्हिडिओ, लेख, बातम्या) इतरांपर्यंत पोहोचवतात. उदा. एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, लिंक्डइन, व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म्स, मायक्रो ब्लॉगिंग साइट्स, मेसेजिंग प्स (व्हॉटसप, टेलिग्राम) तसेच कोलॅबोरेटिव्ह टूल्स (विकी, डिस्कशन फोरम्स) इत्यादींचा समावेश होतो.

## स्किल समिट २०२५ मध्ये दोन कौशल्य कर्नाटक पुरस्कार

बेंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ला बेंगळुरू स्किल समिट २०२५ मध्ये दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. भारतातील कौशल्य विकास आणि मानव संसाधन उभारणी क्षेत्रात कंपनीच्या उत्कृष्ट योगदानाची या पुरस्कारा द्वारे दखल घेण्यात आली आहे. टीकेएमला कौशल्य कर्नाटक कॉर्पोरेट एक्सलन्स अवॉर्ड इन स्किलिंग (लार्ज इंडस्ट्रीज कॅटेगरी) तसेच टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) साठी कौशल्य कर्नाटक अवॉर्ड फॉर द बेस्ट इन्स्टिट्यूशन इन स्किल कॉम्पिटिशन्स या दोन सन्मानांनी गौरविण्यात आले.

## झी५ च्या बाई तुझ्यापायी मालिकेने प्रेरित केलेल्या राज्यव्यापी चळवळीला दिला पाठिंबा

छत्रपती संभाजीनगर – झी५ ची मराठी ओरिजिनल मालिका बाई तुझ्यापायी ही केवळ लोकांच्या हृदयाला भिडलेली कथा नाही, तर तिने एक सामाजिक चळवळ निर्माण केली आहे. या मालिकेत दाखवलेली अहिल्याची धैर्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रवासकथा आता महाराष्ट्रात मासिक पाळीवरील कलंक आणि लैंगिक असमानतेविरोधात चर्चा सुरू करण्याचे कारण ठरली आहे.मीपणअहिल्या या मोहिमेद्वारे झी ५ ने कलाकार, प्रभावशाली व्यक्ती, विद्यार्थी आणि नागरिकांना एकत्र आणले – अहिल्याचा साधा पण ताकदवान प्रश्न का? पुन्हा विचारण्यासाठी. जे एका मालिकेतून सुरू झाले, ते आता वास्तवातील चळवळ बनले आहे – लोकांनी आपल्या लाल तळहातांनी ऐक्य आणि सामर्थ्याचे प्रतीक म्हणून आवाज उठवला आहे, मौन आणि लज्जेविरुद्ध. या मोहिमेने सर्जनशीलतेचा वापर रस्त्यांवर आणि स्क्रीनपलीकडेही केला. डोंबिवलीतील कॉलेज थिएटर ग्रुप्सनी हृदयस्पर्शी स्ट्रीट प्ले सादर केले, आणि प्रत्येक नाटकाच्या शेवटी प्रेक्षकांनी लाल तळहात उंचावले – सार्वजनिक ठिकाणे संवाद आणि परिवर्तनाचे व्यासपीठ बनली.

## प्रसिद्ध फुटबॉलर जेमी नाइट विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी परतले

मुंबई – पोदार आंतरराष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध फ्रीस्टाइल फुटबॉलर जेमी नाइट यांचे पुन्हा स्वागत करताना उत्साह आणि आनंद व्यक्त केला. जेमी नाइट हे जगातील शीर्ष दहा फ्रीस्टाइल फुटबॉलपटूंमध्ये गणले जातात आणि अनेक वेळा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे मानकरी ठरले आहेत.भारताच्या सहाव्या दौऱ्यावर, जेमी मुंबईतील ७ पोदार आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये विशेष फ्रीस्टाइल फुटबॉल कार्यशाळा घेत आहेत. या कार्यशाळा पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उत्कृष्टता उपक्रमाचा महत्वपूर्ण भाग आहेत. या सत्रांचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, एकाग्रता आणि क्रीडाप्रेम यांच्या माध्यमातून प्रेरित करणे आहे. जेमी आपल्या अप्रतिम फुटबॉल नियंत्रणासाठी आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबतच्या सहकार्यासाठी जगभर ओळखले जातात. त्यांनी यूईएफए यूरो २०२० साठी अधिकृत जागतिक शुभंकर म्हणून तसेच यूईएफए चॅम्पियन्स लीग फायनल्स २०१७ आणि २०१८ मध्ये सादरीकरण केले आहे. त्यांच्या गुरुत्वाकर्षणाला आव्हान देणाऱ्या ट्रिक्स आणि अचूक नियंत्रणाने विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

## चप्स फूटवेअरने त्यांचे पहिले एक्सक्लुझिव्ह स्टोअर उघडले

मुंबई : मुंबईमध्ये मुख्यालय असलेले भारतातील घरगुती ओपन-फूटवेअर डिसप्टर, चप्स फूटवेअरने घाटकोपर (पश्चिम) येथील आर सिटी मॉल येथे त्यांचे पहिले एक्सक्लुझिव्ह स्टोअर लाँच करून अधिकृतपणे रिटेलमध्ये पाऊल ठेवले आहे. २०१९ मध्ये दैनंदिन भारतासाठी आरामदायी, शाश्वत फुटवेअरची पुनर्परिभाषा करणारा डिजिटल-फर्स्ट ब्रँड म्हणून स्थापित, हा मैलाचा दगड चप्स चे ऑनलाइन आवडत्या व्यक्तीपासून पूर्ण अनुभवात्मक रिटेल डेस्टिनेशनमध्ये संक्रमण दर्शवितो. स्टोअर उघडणे हे केवळ एक नवीन पत्ता नाही, तर ते घरवापसी आहे. मुंबईत जन्मलेले आणि बांधलेले, चप्स फूटवेअर हे आराम-तंत्रज्ञानातील नवोपक्रम, नव्याने लाँच केलेले ग्रह-जागरूक साहित्य आणि एक सोपी, नम्र शैली यांचे समानार्थी बनले आहे जी एका पिढीला हलके, जलद आणि मुक्त चालण्यास अनुनाद करते.


# ओम जगद्गुरु जन शांती धर्मसोळ्याचे ध्वजारोहण उत्साहात संपन्न



खुलताबाद प्रतिनिधी : श्री क्षेत्र वेरूळ येथे जगदुरु जनार्दन स्वामी यांच्या ३६ वे पुण्यस्मरण उत्तराधिकारी जगदुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या पर्व काळामध्ये श्रीक्षेत्र वेरूळ येथे घृष्णेश्वर भगवान यांच्या सानिध्यामध्ये संपन्न होणार आहे या सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी आज भव्य ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन केलेले होते सोहळ्याचे प्रमुख वैशिष्ट्य अनुष्ठान यज्ञ नंदादीप महिला जप नामस किर्तन एकनाथी भागवत पारायण अखंड अन्नदान अशा महत्वपूर्ण विविध कार्यक्रमाचे आयोजन या सोहळ्यामध्ये केलेले आहे ३६ व्या पुण्यस्मरणाचे प्रमुख आकर्षण ७५१ कुंडी यज्ञ हे असून यादरम्यान आठ दिवस मौनवृत्तांमध्ये पुरुष व महिला हे परमपूज्य बाबाजींनी दिलेल्या गुरु मंत्राचा जप करणारा असून याची संख्या ११००० आहे आठ दिवस संपन्न होणारा हा सोहळा जगदुरु उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार असून जय बाबाजी भक्त परिवारासह महाराष्ट्रातील लाखो भाविक पूजनीय साधुसंत व राजकीय क्षेत्रातील विविध पक्षांचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती या सोहळ्यामध्ये असते जय बाबाजी भक्त परिवाराच्या दृष्टीने परमपूज्य बाबाजींचे पुण्यस्मरण म्हणजे मोठा सोहळा असतो भाविक वर्षभर या सोहळ्याची तयारी करत असतात हा भव्यदिव्य सोहळा यशस्वी होण्यासाठी जगद्गुरू स्वामी शांतिगिरी महाराज यांचे मार्गदर्शनाखाली विविध समित्या ची नियुक्ती केलेली असते यामुळे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत नाही लाखो भाविकांची उपस्थिती सोहळ्याला आठ दिवस असताना परमपूज्य बाबाजींचे पुण्यस्मरणाची सोहळे महाराष्ट्र सह देशभर या सोहळ्यांचा कौतुक होतात ना दिसते

कारण या सोहळ्यामध्ये देव देश आणि धर्म हे समोर ठेवून येणारी पिढी घडविण्याचे काम बाबाजींच्या हस्ते होत असते दिवसेंदिवस लाखो लोक वेगवेगळ्या व्यसनांना बळी पडत आहे त्यातून मुक्ती देण्याचे महान कार्य जगदुरु जनार्दन स्वामी यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने सातत्याने होत आहे असाच प्रयत्न होऊ घातलेल्या पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये परमपूज्य जगदुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे आजच्या पवित्र पर्वकाळावर या भव्य सोहळ्याचे ध्वजारोहण महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल जी सावे आमदार प्रशांत बंब देवगड संस्थांचे उत्तर अधिकारी स्वामी प्रकाश नंद गिरी महाराज, राजेंद्र पवार .ह भ प मेटे महाराज आश्रम हे संत महंत सेवागिरी महाराज उद्योजक मनोज पवार अनिल भैय्या चोरडिया घृष्णेश्वर देवस्थानचे अध्यक्ष विकी दांडगे , भाजपा छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे उपाध्यक्ष योगेश टोपरे माजी सभापती गणेश नाना अधाने यासह जय बाबाजी भक्त परिवारातील नाशिक जळगाव धुळे अहिल्यानगर जालना पुणे ठाणे बीड व परभणी जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती वेरूळ आश्रमामधून आज ध्वजारोहण सोहळ्यानिमित्त भव्य शोभा यात्रेचे आयोजन केले होते यामध्ये परमपूज्य बाबाजी यांची पालखी व उत्तराधिकारी जगदुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांची रथामधून मिरवणूक काढण्यात आली यामध्ये जय बाबाजी भक्त परिवारासह बाबाजींच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होता अनेक मान्यवर असं परमपूज्य बाबाजीच्या मार्गदर्शनाने सोहळ्याचा समारोप होऊन महाप्रसादाने याची सांगता झाली दि २५ नोव्हेंबर ते दोन डिसेंबर या दरम्यान आयोजित ओम जगदुरु जन शांती धर्म सोहळ्यामध्ये भाविक भक्तांनी तन-मन धनाने सहभागी व्हावे असे आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराचे वतीने राजेंद्र पवार यांनी केले.

# सावे यांच्या उपस्थित इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती



तभा वृत्तसेवा

पैठण दी १०:- पैठण नगर परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या वतीने पक्ष निरीक्षक कॅबिनेट मंत्री अतुल सावे, सह पक्ष निरीक्षक आमदार अनुराधाताई चव्हाण, तुषार पाटील शिसोदे, लक्ष्मण पाटील औटे यांनी नगराध्यक्ष तसेच एकूण १२ प्रभागातील नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या यावेळी नगर परिषदेवर भाजपाची सत्ता येणार असल्याचा विश्वास नामदार सावे व्यक्त केला.

नगर परिषदेच्या भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या मुलाखती शहराध्यक्ष बंडू आंधळे यांच्या संपर्क कार्यालयात घेण्यात आल्या. यावेळी नगराध्यक्ष पदासाठी मोहिनी सुरज लोळगे, रेखाताई दिलीप कुलकर्णी, वृषाली सतिष आहेर,अश्विनी दीपक लखमले यांनी पक्षाकडे नगराध्यक्ष पदासाठी मुलाखती दिल्या तर १ ते १२ प्रभागातील नगरसेवक पदाच्या २५ जागेसाठी ६५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.यावेळी मा. नगराध्यक्ष सुरज लोळगे, शहराध्यक्ष बंडू आंधळे,सरचिटणीस सुरेश गायकवाड, सरचिटणीस सतिष आहेर, विशाल पो्हेकर, शिवाजी तुपे, लक्ष्मीकांत पसारे आदींची उपस्थिती होती.

# तालुक्यातील जरंडीचा आदर्श राज्यभरात राबवू : वासुदेव सोळुंके



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ नोव्हेंबर

सोयगाव तालुक्यातील जरंडी गावचे काम सर्वच बाबी मध्ये आदर्शवत आहे त्यामुळे जरंडी गावाचा नाव लौकिक राज्यात दरवळन्यास आता कोणीही रोखू शकत नाही मात्र जरंडी ग्रामपंचायत राज्यात रोल मॉडेल ठरली आहे त्यामुळे जरंडी पॅटर्न आता राज्यात राबविण्यासाठी शिफारस करण्यात येईल असे मत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके यांनी शुक्रवारी(दि.७) जरंडी भेटी दरम्यान केले

यावेळी सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पाटील,दिलीप पाटील,मधुकर पाटील,कृषिभूषण रवींद्र पाटील,माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे,बनेखा तडवी, अमृत राठोड,मधुकर सोनवणे,दिलीप मोघडे आदींची उपस्थिती होती संतोष पाटील, सतिष बाविस्कर, अंबु राठोड, भास्कर निकम् आदींनी पुढाकार घेतला.

शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके याच्यासह गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,उप अभियंता प्रवीण फुलारी,शाखा अभियंता राजेश राजगुरू, विस्तार अधिकारी अशोक दौड यांनी जरंडी येथे भेट दिली यावेळी त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत झालेल्या कामांचा व अभियानाचा आढावा घेतला.

# कन्नड नगरपरिषदेत 'रायभानजी जाधव विकास आघाडी'चा झंझावात

## हर्षवर्धन जाधवांचा नगरपरिषद कायापालटाचा निर्धार!

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०९ नोव्हेंबर – आगामी कन्नड नगरपरिषद निवडणुकीत 'रायभानजी जाधव विकास आघाडी' रिंगणात उतरणार असल्याची घोषणा माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी केली आहे. इमानदार, शिक्षित आणि जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या उमेदवारांनाच संधी देण्यात येईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

हर्षवर्धन जाधव म्हणाले, कन्नड शहरातील नागरिकांना त्यांच्या घराजवळील मूलभूत सुविधा पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था यांची जबाबदारी नगरपरिषद घेईल. जेथे सुविधा मिळतील, तेथील नागरिकांनीच कर भरावा; अन्यथा जनतेवर अन्यायकारक करभार टाकण्यास आम्ही विरोध करू.

ते पुढे म्हणाले, नगरपरिषद म्हणजे फक्त राजकारणाचे केंद्र नाही, ती नागरिकांच्या विकासाची पहिली पायरी आहे. आजपर्यंत जी दुर्लक्षिली गेली, ती कन्नड नगरपरिषद आम्ही आदर्श बनवू. शहराचा कायापालट करणे हा आमचा संकल्प आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत सर्व ठिकाणी उमेदवार देण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही हर्षवर्धन जाधव यांनी दिली. जनतेचा विश्वास आमचे बळ, आणि पारदर्शक कारभार आमचा चेहरा असेल, असे ते म्हणाले.

कन्नडच्या राजकीय पटलावर या घोषणेनंतर नव्या समीकरणांना सुरुवात झाली असून, आगामी निवडणुकीत रायभानजी जाधव विकास आघाडीचा सहभाग स्थानिक राजकारणात नवा रंग भरणार आहे.

# पिच्छीतील नवरंग नवग्रहांचे प्रतीक - आचार्य प्रणामसागरजी महाराज

## पिच्छी परिवर्तन महोत्सव उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर : खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ मंदिर राजाबाजार यांच्या वतीने आयोजित पिच्छी परिवर्तन महोत्सव रविवारी नबाबपुरा येथील हिराचंद कस्तुरचंद कासलीवाल प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. शहरासह उपनगरांतून हजारो भाविकांनी उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घेतला.

समाजातर्फे आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराजांना तपश्चर्या शिरोमणी ही मानाची उपाधी प्रदान करण्यात आली. भाविकांनी जयघोष करत आनंद व्यक्त केला. सोहळ्यात आचार्यश्रींच्या जुन्या पिच्छीचा मान सौ. मीनादेवी सुनीलकुमार पाटणी परिवाराला, तर नवीन पिच्छी अर्पणाचा मान मनोजकुमार फुलचंद-सौ. रितू उमंग दगडा परिवाराला मिळाला. आर्यिका सम्यकश्री माताजी आणि शुल्लक प्रथमसागरजी यांना वस्त्रभेटी देण्यात आल्या.

चातुर्मासातील प्रमुख कलशासाठी लकी ड्रॉ घेण्यात आला. यात मुख्य भक्तामर कलश : चंदशेकर धन्नालाल कासलीवाल सरस्वती कलश : अमित-डॉ. सुमित पाटणी आणि हिमांशु गंगवाल आचार्य मानतुंगाचार्य कलश : फुलचंद जैन (रवि मसाला) परिवार जैनाचार्य पुष्पदंत कलश : रोहिणी प्रमोद पाटणी परिवार०

# संत एकनाथ सचिन घायाळ शुगरला ऊस देतांना विचार करावा : तुषार शिसोदे

तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्वाचा असलेला संत एकनाथ सचिन घायाळ शुगर साखर कारखाण्याला ऊस घालतांना शेतकऱ्यांनी विचार करावा कारण शेतकऱ्यांचे मागील हंगामातील उसाचे पेमेंट आजही सचिन शुगरने दिले नाही.कारखाण्यावर अनेक प्रकारच्या आनागोंदी सुरु असून यामुळे काही दिवसात सचिन शुगर वर कार्यवाही होणार असल्याचे माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक भाजपा नेते तुषार शिसोदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. रविवारी घाई गरबडीत ऊस उत्पादक, शेतकरी, सभासद यांची दिशाभूल करत कारखाण्यावर गळीत हंगाम पार पडला असा आरोप करत शिसोदे यांनी घायाळ कंपनीच्या आनागोंदी वर प्रकाश टाकत बुलढाना अर्बन बँके कडुन घेतलेल्या कर्जाची परतफेड आणि गैर व्यवहारा बाबत माहिती दिली.सहकार आयुक्त सदरील भ्रष्टाचाराला अभय देत असल्याचे आरोप ही शिसोदे यांनी केला.आपण या बाबत मोठे जन आंदोलन तसेच कायदेशीर आंदोलन उभारणार असल्याचे भाजपा नेते तुषार शिसोदे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

# विभागीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेत रुपाली शिंदे प्रथम राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



कन्नड : दि.१० नोव्हेंबर – छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या विभागीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेत जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संचलित शिक्षण महर्षी स्व. के.के. जाधव सर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी रूपाली अनंता शिंदे हिने १४ वर्ष वयोगटातील इपी प्रकारात चमकदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. रूपालीच्या या यशामुळे तिची राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या उत्कृष्ट यशाबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. अ. सचिन भामरे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी रूपालीचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.


# तवल्यागड फाटा-वडनेर रस्त्याचे डांबरीकरण व्हावे – निवृत्त पोलीस निरीक्षकांची पालकमंत्र्यांकडे मागणी



तभा वृत्तसेवा

कन्नड : तवल्यागड फाटा-वडनेर-कालीमठ फाटा रस्ता अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी सेवा निवृत्त पोलिस निरीक्षक नामदेव चव्हाण व भरत राठोड यांनी पालकमंत्री संजय सिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.या मार्गावर आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना व बँक असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अथवा मुख्यमंत्री सडक योजनेतून काम हाती घ्यावे, अशी मागणी करताच पालकमंत्री सिरसाट यांनी संबंधित विभागाशी समन्वय साधून रस्त्याचे डांबरीकरण लवकर सुरू केले जाईल, असे आश्वासन दिले.

# पावसाच्या पाण्याने सोलार पंप डॅमेज



तभा वृत्तसेवा

पैठण दी १० :- पैठण तालुक्यात झालेल्या पावसाच्या अतिवृष्टीत सोलनापुर शिवार गट नंबर १८२/१ मध्ये सोलार पंप वाहून गेला असून त्यांचे अवशेष डॅमेज झाले आहे.

पैठण तालुक्यात अतिवृष्टीने थैमान घातल्याने शेतकरी वर्गाचे कंबरडे मोडले. अनेक ठिकाणी जाणवरे आणि जमीन वाहून गेल्या आहेत. अश्यात सोलनापूर शिवारात प्रकाश खराद यांचे एच पी कंपनीचे सोलार पंप वाहून जाऊन डॅमेज झाले आहे. तर ईतर शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झाले आहे.

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ७६०/२०२५ पुढील नारीख २३/१२/२०२५

अर्जदार : १. संजय दशरथ दाभाडे तय. ४६ वर्ष भंदा. घरकाम २. नाना दशरथ दाभाडे वय ४१ वर्ष धंदा. घरकाम १ व २ रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३ पद्माबाई दिलीप जाधव वय. ५० वर्ष धंदा घरकाम रा. आंबेडकर पुतला जवळ, एकलहरा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४ मंगल रमेश जाधव वय. ५० वर्ष धंदा. मजुरी रा. साजापूर ता.जि.छ.संभाजीनगर ५ नंदाबाई सुभाष गडकर वय, ४२ वर्ष धंदा. मजुरी य. शिरेसायगांव, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध:-

गैरअर्जदार: निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की, असे की, अर्जदार यांचे वडिल नामे दशरथ किसन दाभाडे हे दि. २३/०१/२०२४ रोजी मौजे अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे, तसेच अर्जदार यांची आई सोनाबाई दशरथ दाभाडे ही देखील दि.०३/०५/२०२३ रोजी मौजे अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाली आहे. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत दशरथ किसन दाभाडे व मयत सोनाबाई दशरथ दाभाडे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत दशरथ किसन दाभाडे व मयत सोनाबाई दशरथ दाभाडे यांचे कायदेशीर एकमेव वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत दशरथ किसन दाभाडे व मयत सोनाबाई दशरथ दाभाडे याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत दशरथ किसन दाभाडे व मयत सोनाबाई दशरथ दाभाडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत दशरथ किसन दाभाडे व मयत सोनाबाई दशरथ दाभाडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्रहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ.संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ६००/२०२५ पुढील लारीख ०३/१२/२०२५

अर्जदार : १. संगिता मच्छिंद्र दाभाडे वय ४१ वर्ष धंदा. घरकाम रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. मंगेश मच्छिंद्र दाभाडे, वय, २७ वर्ष धंदा. मजुरी रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३ दिक्षा मच्छिंद्र दाभाडे, वय. २५ वर्ष धंदा. मजुरी रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४ अजय मच्छिंद्र दाभाडे वय. २१ वर्ष धंदा. मजुरी रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर

– विरूद्ध:–

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की, असे की, क. १ यांचे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे पिता नामे मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे हे दि. ३१/१२/२०२३ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, छ.संभाजीनगर ता.जि.छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे यांचे जन्मदाते आई व वडील हे खुप दिवसांन पुर्वीच मयत झालेले आहे व त्यामुळे अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत मच्छिंद्र लक्ष्मण दाभाडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुट्टी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

Shriram Pratishthan's

Institute Code: 2640

**Aditya Institute of Pharmacy**

At Selu, Tq. Selu Dist. Parbhani

Approved by PCI New Delhi, DTE Mumbai, Affiliated to SRTMU Nanded. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी बी. फार्मसी प्रथम वर्ष व डी. फार्मसी प्रथम वर्ष अभ्यासक्रम संस्थास्थरावरील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून रिक्त राहिलेल्या जागांकरिता अर्ज मागवण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी नियम व निकषानुसार शिष्यवृत्ती मिळेल.

| Sr.No. | Activity | Schedule For First year D.Pharm | Schedule For First year B.Pharm |
|---|---|---|---|
| 1 | Submission of application for admission with application ID at Institute | 06/11/2025 to 11/11/2025 up to 05:00PM | 11/11/2025 to 13/11/2025 up to 05:00PM |
| 2 | Display of Provisional merit list on website and notice board. | 12/11/2025 up to 05:00PM | 14/11/2025 up to 11:00AM |
| 3 | Submission of grievance and correction (If any). | 13/11/2025 up to 01:00PM | 14/11/2025 up to 05:00PM |
| 4 | Display of final merit list on website and on notice board. | 13/11/2025 Up to 05:00PM | 15/11/2025 Up to 10:00AM |
| 5 | Reporting to college and confirmation of admission to institute (Along with all original documents.) | 14/11/2025 to 17/11/2025 up to 05:00PM | 15/11/2025 to 17/11/2025 up to 05:00PM |

All the vacant seat are filled as per government rules and reservation given in seat matrix.

Address: Vidyavihar Sankul Rawalgaon Road, Selu.

Website:adityainstituteofpharmacy.org.in Email: aiopselu@gmail.com

Contact No. 8788369124, 9107070765

Principal/ Secretary

## अग्रलेख...

# कर्माचा उलटा फेरा

भारताच्या शेजारी यावर्षी फारच नाट्यमय आणि आश्चर्यकारक घटना समोर येत आहेत. ज्यांचा अहिंसा, सहिष्णुता, शांतता, सौहार्द या तत्त्वांशी दूरदूरचा संबंध नाही, असे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान शांतता चर्चेसाठी टेबलावर आले आहेत. आणखी एक मजा म्हणजे हे दोन्ही इस्लामी देश सीमापार दहशतवादाच्या मुद्यावरून एकमेकांशी भिडले आहेत. दोन्ही देश इस्लामिक विचारसरणीवर आधारलेले आहेत आणि आम्ही शरियतनुसार वागतो, असा त्यांचा दावा आहे. २०२१ पर्यंत अफगाणिस्तानचे अधिकृत नाव इस्लामिक रिपब्लिक ऑफ अफगाणिस्तान असे होते. पण, तालिबानने काबुलवर कब्जा मिळविल्यानंतर इस्लामिक एमिरेट ऑफ अफगाणिस्तान, असे नवे नाव धारण केले. पाकिस्ताननेही स्वत:ला मुस्लिम देशांचा पाठीराखा म्हणून स्वत:ला इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान, असे अधिकृत नाव धारण केलेले आहेच. धर्म कुठलाही वाईट नसतो. पण नुसते धर्माचे नाव घेतल्याने अथवा एखाद्या देशाचे नामकरण धर्माच्या आधारावर केल्याने सर्व काही सुरळीत होईल आणि नागरिक धर्माचे काटेकोरपणे पालन करतील, असे मुळीच नाही. भारत हिंदू बहुसंख्य देश असूनही भारतीय गणराज्य असे त्याचे नाव आहे. नावात धर्माचा कुठेही उल्लेख नसताना आपल्या देशात लोकशाही व्यवस्था सुखाने नांदत आहे. जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून भारत नावारूपास आला आहे. यथा प्रजा, तथा राजा, अशी एक म्हण आहे. काहीही घडले असले तरी अफगाणिस्तान कधीही व्यापक अर्थाने पारतंत्र्यात नव्हता. तेथील जनतेला पारतंत्र्याची सवयच नाही. कधीकाळी कबिल्यांमध्ये राहणाऱ्या अफगाणी जनतेची मध्ययुगीन मानसिकता कायम आहे. धर्मासाठी रक्तपात करण्यास अफगाणी आजही एका पायावर तयार आहेत. ते कुणालाही सोडत नाहीत. ज्यांच्या पोटी ते जन्माला येतात, त्या महिलांनाही ते गुलामासारखे वागवितात. बुरखा पांघरला नाही म्हणून जाहीर फटक्यांची शिक्षा देतात. त्यामुळे दोन्ही शेजारी स्वत:ला इस्लामिक देश म्हणवून घेत असले तरी त्यांचे वागणे खऱ्या धर्मानुसार नाही.

आजच्या आधुनिक युगात अफगाणी महिलांना शिक्षण, नोकरीपासून वंचित ठेवण्याचे महापाप आजही तालिबान करीत आहे. अजूनही चार-पाच मुस्लिम देश वगळता तालिबान सरकारला अधिकृत मान्यता मिळालेली नाही. त्यांच्याकडे काहीच नसल्याने गमावण्याची भीतीही नाही. एकीकडे रानटी, अशिक्षित, धर्मवेडा आणि क्रूरतेसाठी प्रसिद्ध असलेला अफगाणिस्तान आणि दुसरीकडे अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला, हिंदुस्थानद्वेषाने पछाडलेला पाकिस्तान यांच्यात गेल्या पाच महिन्यांपासून सीमेवर भांडण सुरू झाले आहे. भांडणाचे कारणही फार मजेशीर आहे. दोन्ही देश हे दहशतवाद्यांसाठी नंदनवन आहे. जगात जेवढ्या काही दहशतवादी संघटना कार्यरत आहेत, अथवा होत्या, त्यापैकी ७५ टक्के या दोन्ही देशांत कार्यरत होत्या. भारतात कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानचे सर्वप्रकारचे पाठबळ आहे. विशेषत: १९९० पासून पाकिस्तान भारतविरोधी तत्त्वांना थेट पाठबळ व आश्रय देत आला आहे. आंतरराष्ट्रीय मंचावरून उघडपणे दहशतवादी संघटना आणि त्यांच्या म्होरक्यांना समर्थन देत आला आहे. पाकिस्तानची वाईट नजर केवळ भारतावरच पडली असे नाही; तर नेपाळ, अफगाणिस्तान, शियाबहुल इराण आदी देशांमध्ये दहशतवादी घुसवून अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्नही त्याने केला. अफगाणिस्तानातील तालिबान, हक्कानी गटाला तर पाकिस्ताननेच उभे केले. त्यांना आर्थिक पाठबळ दिले. १९९६ मध्ये जेव्हा अफगाणिस्तानात तालिबान पहिल्यांदा सत्तेत आला, तेव्हा पठाणांचा भारताविरोधात वापर करण्याची खेळी पाकिस्तानने आखली होती. दुर्दैवाने २००१ मध्ये अमेरिकेने तालिबानला सत्तेवरून हाकलल्याने भारताला दिलासा मिळाला. मात्र, काश्मिरातील दहशतवाद्यांना अफगाणिस्तानच्या भूमीवर प्रशिक्षण देण्याचे काम पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि लष्कराने सुरूच ठेवले. ज्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने पोसले, त्याच संघटना आता पाकिस्तानला घायाळ करीत आहेत. त्यात तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान ही दहशतवादी संघटना सर्वांत पुढे आहे. जेमतेम ३० ते ३५ हजार सदस्य असलेल्या या संघटनेला अल-कायदाने आर्थिक आणि मनुष्यबळाचे पाठबळ दिले. अमेरिकेने २००१ मध्ये अल-कायदाविरोधात मोहीम उघडली. परिणामी, या संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन पाकिस्तानात आश्रयास आला होता. त्याचे साथीदारही सोबत आले. खैबर पख्तूनख्वा, बलुचिस्तान या पाकिस्तानच्या भूभागात या संघटनेने पाय रोवले. पण, अल-कायदाचे दहशतवादी एवढे बेलगाम झाले की त्यांनी पाकिस्तानच्याच नाकात दम आणला. परिणामी त्यांच्याविरोधात लष्करी कारवाई करावी लागली. यामुळे संतप्त झालेल्या बैतुल्लाह मसूदने तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेची २००७ मध्ये स्थापना केली. जो पाकिस्तान टीटीपीची मदत घेऊन काश्मिरात हिंसाचार घडविण्याचे स्वप्न पाहत होता, तोच हल्ल्यांनी रक्तबंबाळ झाला. २०२४ मध्ये टीटीपीच्या हल्ल्यांमध्ये ११०० पाकिस्तानी पोलिस, रेंजर्स आणि सैनिक तर ४००-५०० पेक्षा जास्त सामान्य नागरिक ठार झाले. सततच्या हल्ल्यांमुळे त्रस्त झालेल्या पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करण्याची चूक केली. हल्ल्याने चवताळलेल्या तालिबान्यांनी ९ ऑक्टोबरला थेट पाकिस्तानी चौक्यावर हल्ले केले. पाकिस्तान सरकार तर हादरलेच. ऑपरेशन सिंदूरमध्ये पराभूत झालेला फिल्ड मार्शल आसिम मुनीरच्या पायाखालची वाळू सरकली.

दोन्ही मुस्लिम देशांमध्ये रक्तपात सुरू झाल्याने कतरने हस्तक्षेप करीत संघर्ष थांबविला. दोन्ही देशांमध्ये दोहा येथे पहिली शांतता चर्चा झाली. एकमेकांवर हल्ले न करण्याचा निर्णय इस्लामाबाद-काबुलने घेतला. त्यानंतर तुर्किएच्या इस्तंबुलमध्ये दुसरी शांतता चर्चा झाली. दोघांच्या हातात बंदुका असताना शांतता चर्चेसाठी येणे म्हणजे निव्वळ ढोंग करणे होते. बैठकीत पाकिस्तानच्या तोंडून सीमापार दहशतवाद हा शब्द वारंवार येत होता. शांततेची किंमत भारताच्या शेजाऱ्याला कळू लागली. ज्या सीमापार दहशतवादाने भारतात अस्थितता निर्माण केली, तोच दहशतवाद आता भस्मासुर बनून पाकिस्तानच्याच डोक्यावर हात ठेवू लागला. तेहरीक-ए-तालिबान संघटनेविरोधात कारवाई करण्याचे लेखी आश्वासन इस्लामाबादने मागितले. तथापि, तालिबानने असे कोणतेही आश्वासन देण्यास नकार दिला. याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. चर्चा फिस्कटली. पुन्हा ड्युरंड सीमारेषेवर तोफा, बंदुका धडधडू लागल्या. दोन्ही मुस्लिम देशांनी भांडू नये म्हणून कतर आणि तुर्किए हस्तक्षेप करीत राहिले पण, त्याचा काहीच फायदा झाला नाही. या हस्तक्षेपाचा उद्देशही शुद्ध नाही. तर दोन्ही देश सुन्नी मुस्लिम असल्यामुळे त्यांच्यातील वादाने शिया मुस्लिम देश खूश होऊ नयेत म्हणून कतर, तुर्किएने मध्यस्थी केली. ८ नोव्हेंबरला पुन्हा एकदा इस्तंबुलमध्येच दोन्ही देश एकत्र बसले. इकडे एक दिवस अगोदर इराणला लागून असलेल्या चमन सीमेवर पुन्हा गोळीबार झाला. तिसरी शांतता चर्चाही फिस्कटली. पाकिस्तानने लेखी आश्वासन देण्याची अट अफगाणिस्तानने मान्य केली नाही. दोन दिवस चर्चा चालली; पण काहीच हाती लागले नाही. दिलासा देणारी बाब एकच की, युद्धविराम कायम ठेवण्यावर एकमत झाले.

ज्या भूमिकेत कधीतरी भारत होता, त्याच भूमिकेत आता पाकिस्तान आला आहे. सीमापार दहशतवाद थांबवा, आम्ही संबंध सुरळीत करू, अशी मवाळ भूमिका भारत घेत राहिला; पण पाकिस्तानने त्याचा उलटा अर्थ घेतला आणि सीमापार दहशतवादाला पाठबळ देत राहिला. म्हणतात ना, जीवनात कर्माचा उलटा फेरा येत असतो. ज्या देशाने 'मुस्लिम उम्माह', 'गज्वा-ए-हिंद', 'इस्लामिक स्टेट ऑफ खोरासान'च्या नावावर अफगाणिस्तान, काश्मिरात दहशतवादाची विषाक्त बीजे पेरली, त्याची फळे चाखण्याची वेळ त्या पाकिस्तानवर आली आहे. आणि ज्या देशात हिंदू, शीख, जैन, बौद्ध, मुस्लिम, ज्यू, पारशी हे सारे सुखाने नांदत आहेत आणि ज्याचा 'हे विश्वचि माझे घर', 'वसुधैव कुटुंबकम्'वर दृढविश्वास आहे, नव्हे तो भारतीयांच्या जगण्याचा पाया आहे, असा भारत जगाचा आध्यात्मिक गुरू म्हणून वेगाने उदयास येतो आहे... आणि त्याचे समानधर्मी शेजारी भांडतच आहेत!

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# उद्या निर्णायक दुसरी फेरी!

बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा आटोपला असून, उद्या ११ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या व शेवटच्या टप्प्यात १२२ विधानसभा मतदारसंघात मतदान होईल. बिहारमध्ये झालेल्या पहिल्या टप्प्याच्या मतदानात भाजप आघाडी व लालू आघाडी यांच्यात अटीतटीची लढत झाली असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे बिहार विधानसभेचा निकाल प्रामुख्याने दुसऱ्या फेरीच्या निकालावर अवलंबून राहणार आहे. दुसरी फेरी जो जिंकेल, तो या निवडणुकीचा विजेता असेल असे सर्वसाधारणपणे मानले जाते.

**पहिली फेरी** : पहिल्या फेरीत मतदान झालेल्या १२१ मतदारसंघात २०२० मध्ये भाजपने ३२ जागा जिंकल्या होत्या, जनता दल युनायटेडने २३ जागांवर विजय नोंदविला होता, तर विकासशील इन्सान पक्षाने चार जागा काबीज केल्या होत्या. हा पक्ष आता लालू आघाडीत सामील झाला आहे. २०२० मध्ये लालू आघाडीने या १२१ मतदारसंघांपैकी ४२ जागा राष्ट्रीय जनता दलाने, डाव्या आघाडीने ११, तर काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. एकप्रकारे काँग्रेस पक्ष पहिल्या फेरीत तरी 'कमजोर कडी' सिद्ध झाला होता

**आता २०२५** : ६ नोव्हेंबर रोजी झालेल्या पहिल्या फेरीत ५७ मतदारसंघांतील उमेदवार जनता दल युचे होते. तर ४८ मतदारसंघांत भाजप उमेदवार उभे होते. तर चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाने १४ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते. लालू आघाडीचा विचार करता राष्ट्रीय जनता दलाने ७३, काँग्रेस २४ व डाव्या पक्षांनी १४ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते. पहिल्या फेरीत उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व विजय सिन्हा यांनी अनुक्रमे तारापूर व लखसराई मतदारसंघांतून निवडणूक लढविली आहे तर लालू आघाडी म्हणजे महागठबंधन आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार तेजस्वी यादव यांनी राघोपूर मतदारसंघांतून निवडणूक लढविली. पहिल्या फेरीत १४ मंत्र्यांचे भाग्यही मतदानयंत्रात सीलबंद झाले आहे.

**दुसरी फेरी** : बिहारमधील दुसऱ्या फेरीच्या मतदानात एकूण १३०२ उमेदवारांचे भाग्य ठरणार आहे. या फेरीत राज्याच्या २० जिल्ह्यांमध्ये मतदान होणार आहे. यात भाजप आघाडीचा वरचष्मा राहत आलेला आहे. २०२५ च्या निवडणुकीत हीच स्थिती कायम राहिल्यास भाजप आघाडीला राज्यात पुन्हा एकदा सत्ता राबविण्याची संधी मिळू शकते. दुसऱ्या फेरीतील मतदारांचा विचार करता या मतदारसंघात पहिल्या फेरीच्या तुलनेत मुस्लिम व यादव मतदारांची संख्या कमी आहे. या दोन्ही समाजातील मतदारांनी पहिल्या फेरीत आपली एकगठ्ठा मते लालू आघाडीच्या पारड्यात टाकली आहेत. दुसऱ्या फेरीतही त्याची पुनरावृत्ती होणार असली तरी पहिल्या फेरीच्या तुलनेत दुसऱ्या फेरीत या समाजांचा प्रभाव तुलनेने कमी असल्याचे मानले जाते.

**मुख्यमंत्री नितीशकुमार** : बिहारमधील निवडणुकीत भाजप आघाडीला मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या चेहऱ्याचा, नावाचा व कामाचा फायदा होत असला तरी स्वत: नितीशकुमार मात्र विधानसभा निवडणूक लढविण्यापासून दूर राहिलेले आहेत. आपल्या राजकीय कारकीर्दीत त्यांनी फक्त तीन वेळा विधानसभा निवडणूक लढविली असून, दोन वेळा ते विजयी झाले आहेत. याउलट लोकसभा निवडणुकीत मात्र त्यांनी सहा वेळा विजय मिळविला आहे. विधानसभा निवडणूक न लढविता, विधानसभा निवडणूक जिंकणारा मुख्यमंत्री अशी त्यांची प्रतिमा तयार झाली आहे- ती यामुळेच.

**केवळ सहा राज्ये** : भारतीय संघराज्यातील केवळ सहा राज्यांमध्ये विधान परिषद नावाची व्यवस्था अस्तित्वात आहे, त्यातील एक म्हणजे बिहार. उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या अन्य पाच राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात असून, या राज्यांतही मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेचा मार्ग चोखाळीत मुख्यमंत्रिपदापर्यंतचा रस्ता पादाक्रांत केला आहे. मात्र सर्वाधिक वेळा विधान परिषदेवर जाऊन, मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा एक प्रकारचा विक्रम जणू नितीशकुमार यांनी प्रस्थापित केला आहे. बिहारचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहणारे नेते असा विक्रम त्यांनी यापूर्वीच नोंदविला आहे आणि यातील विरोधाभास म्हणजे विधान परिषदेवर निर्वाचित होत त्यांनी राज्याची धुरा समर्थपणे सांभाळली आहे.

**राष्ट्रीय प्रभाव** : बिहारच्या निवडणूक निकालांनी नेहमीच राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले आहे. तसे यावेळीही होईल. बिहारचे निकाल राष्ट्रीय राजकारणाला निश्चितपणे प्रभावित करतील. यात काँग्रेस पक्षाची अग्निपरीक्षा होणार आहे. लालू आघाडीतील पक्षांमध्ये काँग्रेसची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी राहिली आहे. दुसरीकडे जागावाटपात मात्र काँग्रेसने जास्त जागा पटकावल्या आहेत. याचा परिणाम लालू आघाडीत दिसून येतो. राष्ट्रीय जनता दल व काँग्रेस यांच्यातील युतीत कमालीचा तणाव निर्माण होत ती तुटण्याच्या स्थितीत आली होती. शेवटी, राहुल गांधी यांच्या हस्तक्षेपानंतर ती जुळून आली. यावेळी काँग्रेस किती जागा जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बंगालवर परिणाम** : बिहार निवडणुकीचा ताबडतोब होणारा परिणाम बंगालमध्ये दिसणार आहे. बिहार-बंगालचे 'जुळे राजकारण' मानले जाते. मार्च-एप्रिल महिन्यात बंगाल विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे बिहार निकालांचा प्रभाव निश्चितपणे बंगाल निवडणुकीवर होणार आहे.

**बंगालचा बिगुल** : निवडणूक आयोगाने बंगालसह काही राज्यांच्या मतदारयाद्यांची छाननी-तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या कामकाजात ही एक स्वाभाविक प्रक्रिया मानली जाते. आयोगाच्या कामकाजाचा तो एक अविभाज्य भाग असल्याने त्यावर कुणी आक्षेप घेण्याचे कारण नाही. मात्र, बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर जोरदार आक्षेप घेत राज्यातील एकाही मतदाराचे नाव मतदारयादीतून वगळले गेल्यास केंद्रातील मोदी सरकार अस्तित्वात राहणार नाही असा इशारा दिला आहे. यासाठी त्यांनी कोलकातात एक मोठा मोर्चा काढला. येणाऱ्या दिवसात निवडणूक आयोग विरुद्ध ममता बॅनर्जी यांच्यातील 'सामना' साऱ्या देशास पाहावयास मिळण्याची चिन्हे आहेत.

**सुधारणा आवश्यक** : राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे निवडणूक आयोगाच्या प्रतिमेला तडे बसत असून, काही लोकांमध्ये आयोगाच्या कामकाजाबाबत संशयाचे वातावरण निर्माण केले जात आहे. हे सारे टाळण्यासाठी सरकार व निवडणूक आयोग यांनी मतदारयाद्या तयार करण्याबाबत काही सुधारणा करणे आवश्यक आहे. यात राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तक हा एक सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. भारतात जन्मास येणाऱ्याचे नाव विशिष्ट कालावधीत या राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तकात नोंदविले जावे आणि हे नोंदणीपुस्तकच निवडणूक आयोगाची मतदारयादी म्हणून ओळखले जावे. असे केल्यास स्वतंत्रपणे मतदारयादी तयार करून, त्यात वेळोवेळी सुधारणा, दुरुस्ती करण्याचे काम आयोगास करावे लागणार आहे. यावर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्चही होणार नाही आणि देशाच्या सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या कायदेशीर लढायाही बंद होतील. देशाच्या काही राज्यांतील मतदारयाद्यांमधील काही विसंगती समोर आणल्या जात आहेत. यात काही मानवी चुकाही असू शकतात. पण, त्यामुळे संपूर्ण निवडणूक आयोग, निवडणुकींचे निकाल संशयाच्या सावटाखाली येत आहेत. याला वेळीच आवर घातला पाहिजे, अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया नोंदविली जात आहे.

प्रत्येक देशात राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तक ही एक अनिवार्य आवश्यकता मानली जाते. असे असताना ७८ वर्षांनंतरही भारतात ही संकल्पना राबविली गेलेली नाही. येणाऱ्या काळात बंगाल, तामिळनाडू या विरोधी पक्षांच्या राज्यांच्या निवडणुका होणार आहेत. येथे निवडणूक आयोग विरुद्ध राज्य सरकार यांच्यात टोकाचे वाद निर्माण होणार आहेत. हे सारे टाळण्यासाठी आयोग व केंद्र सरकार यांनी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता तयार झाली आहे. आणि हे न झाल्यास निवडणूक निकालांवर प्रश्नचिन्ह निर्माण करून लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेलाच आव्हान देण्याचे प्रयत्न होत राहतील आणि त्याचे परिणाम घातक असतील.

## वेध

अनिल फेकरीकर

# मृतदेहांची राखही झाली असुरक्षित!

स्वत:चा फायदा व्हावा याकरिता सोने, पैसा, बकऱ्या, गाई, म्हशी आणि सर्व प्रकारचे साहित्य चोरण्याचे काम चोरांच्या टोळ्या करतात. पण नागपूर जिल्ह्यात उमरेड गावात चक्क दोन मृतदेहांची राख चोरण्याचा अफलातून प्रकार घडला. परिणामी आता मृतदेहांची राखही असुरक्षित झाली की काय असाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसे पाहता मृतदेहांची राख अघोरी विद्या प्राप्तीसाठी केली जाते. पण प्रश्न हा पडतो की, मानवाने चंद्रासह मंगळावर जाण्याचा भीमपराक्रम केला असताना पृथ्वीतलावरील अंधश्रद्धाळू मात्र मृतदेहांची राख चोरून अघोरी विद्येसाठी का धडपडत आहेत. विशेष म्हणजे ही अघोरी विद्या प्राप्त झाल्यावर संबंधित लोक त्याचा सदुपयोग करणार नाही हे शंभर टक्के खरे आहे. ते तर त्या अघोरी विद्येचा दुरुपयोगच करतील, हे शाश्वत सत्य आहे. पण अशा अघोरी विद्येची समाजाला खरोखरच गरज आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. तसे पाहता विज्ञानवादी माणूस अंधश्रद्धा, अघोरी विद्येला मान्यता देतच नाही. तरीही मृतदेहांची राख चोरीला गेली हे शाश्वत सत्य नाकारून कसे चालणार आहे. विशेष म्हणजे राख चोरणाऱ्यांना त्यातून युरेनियमचा साठा मिळणार आहे का? मग तरीही त्यांनी जळत्या चितेची राख चोरण्याचे धाडस केले, खरोखरच हा गुन्हा विचित्र आणि पोलिसांकरिता आव्हान ठरला आहे. नागपूर जिल्ह्यातील उमरेड गावात सोमवार ३ नोव्हेंबर २०२५ रोजी एका युवतीचा आणि इसमाचा मृत्यू झाला. त्यांच्यावर स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार पार पडला. दुसऱ्या दिवशी सर्व आप्तस्वकीय त्यांच्या रक्षासह अस्थी गोळा करायला गेले तेव्हा त्यांना तिथे काहीच दिसले नाही. त्या अन्त्यसंस्कार केलेल्या मृतदेहांची राख चोरांनी रातोरात चोरून नेली होती. पोलिसांकडे याविषयी तक्रार झाली. पोलिसांनी तातडीने तपास यंत्रणा कामाला लावली, पण नेमकी राख कोणी नेली याचा उलगडा करता आलेला नाही. यामुळे चोरांनी प्रथमत: स्मशानभूमी आणि परिसराची रेकी केली असावी, त्यानंतर त्यांनी मृतदेहांची राख चोरून नेली. गुन्हेगार गुन्हा करताना काही तरी पुरावे मागे सोडतात असे म्हणतात. पण राख चोरणाऱ्यांनी असले पुरावे सोडलेले नाहीत. मात्र खबऱ्यांना सक्रिय केले तर नक्कीच चोरांचा उलगडा लागणे कठीण नाही. याकरिता पोलिसांसह विज्ञानवादी विचारांच्या सामान्य लोकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा अन्त्यसंस्कारानंतर रक्षा विसर्जनापासून ते दोघेही आयुष्यभर वंचित राहतील, हे मात्र खरे. चोरांनी तर चोरी करून यश संपादन केले, पण ज्यांच्या नातेवाईकांची राख चोरीस गेली त्या लोकांच्या भावनांचे काय? अघोरी विद्येसाठी धडपड करणाऱ्यांनी माणुसकीच्या नात्याने का असेना आप्तस्वकीयांच्या भावनांचा विचार करायला हवा होता. पोटच्या मुलीचा अचानक मृत्यू ही घटना पचविणे कठीण आहे. त्या अवस्थेत तिची राखही चोरांनी चोरल्याने त्या आईवडिलांना काय वाटत असावे, याचाही विचार व्हायला हवा. फक्त स्वत:चा स्वार्थ पूर्ण व्हावा म्हणून चोरांनी मृतदेहांची राख चोरून नेणे एवढ्यापुरता ही घटना मर्यादित नाही. यातून सामाजिक, भावनिक, धार्मिक असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्याची उत्तरे समाजानेच शोधायला हवी.

आपल्या हातून अपराध घडला तर माणूस होतो. मग येथे राख चोरणाऱ्यांना काहीच वाटू नये याचे आश्चर्य वाटते. अघोरी विद्येत एवढीच ताकद असेल तर मग त्याचा वापर पाकिस्तानच्या विरोधात करा ना? तिथे तर भारतीय सैन्यालाच दोन हात करावे लागतात. जिवंतपणी त्या मुलीसह इसमाने यातना भोगल्या. त्यांना मेल्यावर राख विसर्जनानंतर मोक्ष प्राप्तीचाही अधिकार चोरांनी हिसकावून घेतला. हे काही चांगले घडले नाही. ही बाब खटकणारी, संताप आणणारी शिवाय लोकांच्या भावनांचा अनादर करणारीच आहे. पण राखेची चोरी नेमकी कशाकरिता केली, याचा उलगडा व्हायला हवा. जिज्ञासू आणि विज्ञानवादी लोकांची हीच भावना असून, त्याचे खरे रूप समोर आले तरच बरे होईल. समाजानेही आता मृतदेहावर अन्त्यसंस्कार केल्यानंतर आपल्या व्यक्तीच्या राखेची दुसऱ्या दिवशीपर्यंत सुरक्षा करावी. अन्यथा कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अन् भलतेच प्रश्न उद्‌भवतील.

९८२२४६८६६०

## कानोसा

अमोल पुसदकर

# क्रांती गीत वंदे मातरम्

१८७५ ते २०२५ हा १५० वर्षांचा प्रवास क्रांतिकारकांचे स्फूर्तिगान वंदे मातरम्ने केलेला आहे. बंकिमचंद्र चटर्जी, ज्यांना ऋषी बंकिम असेही म्हणतात, त्यांनी या गीताची रचना केलेली होती. असे म्हणतात की त्यांना दुर्गा देवीच्या प्रतिमेमध्ये भारत मातेचा साक्षात्कार झाला. एका दिव्य आणि दैवी अनुभूतीतून त्यांनी हे गीत लिहिले. संस्कृत आणि बंगाली या दोन भाषांमधील शब्द या गीतामध्ये आहेत. हे गीत म्हणजे मातृभूमीचे वर्णन आहे. या गीतामध्ये भारत मातेला ''त्वम ही दुर्गा दशप्रहरणधारिणी'' म्हटलेले आहे, म्हणजे आपल्या दहा हातांमध्ये शस्त्र धारण करणारी दुर्गा असे भारत मातेला संबोधले आहे. यावरून आपल्या लक्षात येते की कवीची भारत मातेबद्दलची भक्ती देवी स्वरूपातील भक्ती आहे. १८८२ मध्ये त्यांनी लिहिलेल्या आनंदमठ या कादंबरीमध्ये या गीताचा समावेश केला गेला होता. स्वत: गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी एका कार्यक्रमात हे गीत गायले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या त्यावेळच्या जवळपास सर्वच महापुरुषांनी हे गीत म्हटले. हळूहळू सर्वसामान्य जनतेच्या मुखांमध्ये सुद्धा हे गीत पोहोचले. ''वंदे मातरम्'' म्हणजे हे मातृभूमी तुला माझा नमस्कार असो. लाखो लोकांच्या ओठावर ज्या वेळेला ''वंदे मातरम'' हे गीत आरूढ झाले, त्या वेळेला हे गीत नव्हे, हा एक मंत्र बनला. सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये देशभक्तीची भावना जागृत करणारा शब्द म्हणजे ''वंदे मातरम्'' झाला. म्हणूनच इंग्रजांनी या गीतावर बंदी घातली होती. परंतु तरीही ज्या वेळेला आपल्या देशभक्तीचे प्रकटीकरण लोकांना करावेसे वाटायचे, त्या प्रत्येक वेळेस त्यांच्या मुखातून एकच आवाज निघायचा तो म्हणजे ''वंदे मातरम्''.

१९०५ मध्ये इंग्रज सरकारने बंगालचे विभाजन केले होते. तशा पद्धतीचा कायदा सुद्धा संसदेमध्ये पारित करण्यात आला होता. ज्या वेळेला बंगालमधील जनतेने याच्या विरोधात आवाज उठविला, त्या वेळेला जनता नि:शस्त्र होती, इंग्रज सशस्त्र होते; जनता संघटित नव्हती, इंग्रज संघटित होते. तरीसुद्धा वंदे मातरम्ची ही किमया होती की लाखो लोक बंगालच्या विभाजनाच्या विरोधात उभे ठाकले. यातूनच स्वदेशीचे आंदोलन जन्माला आले. लोकांनी इंग्रजांचा विरोध म्हणून इंग्रजांच्या सर्वच वस्तूंवर बंदी घातली, बहिष्कार घातला. चप्पल शिवणाऱ्यांनी विदेशी चप्पल शिवायला नकार दिला. पुरोहितांनी विदेशी कपडे घालणाऱ्या वराचे लग्न लावण्यास नकार दिला. धोब्यांनी विदेशी कपडे इस्त्री करण्यासाठी नकार दिला. लोकांनी दुकानांमधील विदेशी मिठाई नाकारली. अशा पद्धतीने वंदे मातरम् हे स्वदेशीच्या अभूतपूर्व आंदोलनाचे कारण बनले. विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटू लागल्या. लोक



जिथे भेटत तिथे एकच साद एकमेकांना घालीत ती म्हणजे ''वंदे मातरम्.'' शेकडो क्रांतिकारकांनी ''वंदे मातरम्''चा जयघोष करीत आपले बलिदान दिले. फाशीच्या फासालासुद्धा त्यांनी हसत हसत आपल्या गळ्यात घातले. शेवटी इंग्रज सरकारला बंगालचे विभाजन रद्द करावे लागले. राष्ट्रवादी शक्तींचा विजय झाला. काँग्रेसच्या एका अधिवेशनामध्ये पंडित विष्णू दिगंबर पलूसकर हे वंदे मातरम्चे गायन करायला उभे राहिले. त्या वेळेस मंचावर उपस्थित असलेल्या मौलाना मोहम्मद अली यांनी त्यांना वंदे मातरम् हे इस्लामच्या विरोधात आहे असे म्हणून विरोध केला. परंतु पंडितजी त्यावर म्हणाले की, वंदे मातरम् हे मातृभूमीला वंदन करणारे गीत आहे, हे कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही. ही एक कवीची कल्पना आहे, परंतु आता तो राष्ट्रभक्तीचा उत्कट भाव झालेला आहे, त्यामुळे मी हे गीत म्हणणारच. आणि त्यानंतर त्यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने वंदे मातरम् सादर केले.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. संसदेमध्ये काही राष्ट्रवादी विचारांचे लोक ''हिंदुस्तान में रहना होगा तो वंदे मातरम् कहना होगा'' अशा पद्धतीच्या घोषणा देत होते. त्यावर सय्यद शहाबुद्दीन म्हणाले होते की, आम्हाला जर तुम्ही वंदे मातरम् म्हणण्याची सक्ती केली तरी आम्ही ते म्हणणार नाही. तुम्ही आम्हाला या देशातून हाकलून दिले तरी जगाच्या पाठीवर अनेक मुस्लिम देश आहेत जिथे आम्ही जाऊ शकतो. परंतु आम्ही जर येथील हिंदूंना या देशातून हाकलून लावले, तर मात्र हिंदूंना संपूर्ण जगामध्ये जाण्यासाठी कुठलाही देश नाही. यावरून आपल्या लक्षात येते की राष्ट्रवादी विचारांच्या लोकांनी संघटित राहणे, एकत्र राहणे व आपला प्रभाव हिंदुस्थानवर कायम ठेवणे आवश्यक आहे. एकेकाळी मौलाना मोहम्मद अली यांनी वंदे मातरम्ला विरोध केला होता. आता ज्या काळामध्ये कधी सय्यद शहाबुद्दीन विरोध करतो, तर कधी विविध राजकीय पक्षांचे नेते विरोध करतात. राष्ट्रभक्ती हा आमचा स्थायीभाव असायला पाहिजे. वंदे मातरम् हा राष्ट्रवादाचा हुंकार आहे. हे क्रांतिकारकांचे क्रांतिगीत आहे. समाज कितीही बदलला, आधुनिकता कितीही आली तरीसुद्धा प्रत्येक पिढीला देशभक्ती शिकवावी लागणार आहे. भारत हा काही जमिनीचा तुकडा नाही, ती एक चैतन्यमय माता आहे, अशा पद्धतीचा भाव होता म्हणूनच क्रांतिकारकांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

देशाच्या स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत जितकी युद्धे भारताने आपल्या सीमांच्या संरक्षणासाठी लढलेली आहेत, त्या सर्वांमध्ये ज्या तरुण सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे, त्यांचा उद्‌घोष ''वंदे मातरम्'' हाच होता. आमचे जीवन हे क्षणिक आहे, परंतु राष्ट्राचे जीवन हे चिरकालीन आहे. ''आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे'' या एकाच कामनेसाठी या शूरवीर सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे. त्यामुळे वंदे मातरम् हा आजही राष्ट्रभक्तीचा मंत्र आहे. या एका शब्दाने लाखो लोकांना प्रेरित करण्याचे कार्य केलेले आहे. भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेटच्या सामन्यामध्ये सुद्धा, ज्या वेळेला हजारो प्रेक्षक जमलेले असतात, त्या वेळेला ते आपल्या भावना प्रकट करण्यासाठी ''भारत माता की जय'' आणि ''वंदे मातरम्'' हाच उद्‌घोष करीत असतात. ऑपरेशन सिंदूरच्या वेळेला सुद्धा ठिकठिकाणी लोकांनी विजयाचा जो जल्लोष केला, त्याही वेळेला त्यांनी ज्या घोषणा दिल्या त्या ''भारत माता की जय'' आणि ''वंदे मातरम्''च्याच होत्या. काळ बदलला तरी चालेल, तंत्रज्ञानाचा प्रचार झाला तरी चालेल. परंतु त्याग नावाचे जे जीवनमूल्य आहे, मातृभूमीकरिता सर्वस्व समर्पित करण्याची जी भावना आहे, ती भावना वंदे मातरम्ने निश्चितपणे निर्माण होऊ शकते. म्हणून शाळा, महाविद्यालये, कार्यालये, सर्वच ठिकाणी जनतेने वंदे मातरम्चे गायन केले पाहिजे, त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे, भारत मातेची देवीस्वरूप मूर्ती आपल्या मनामध्ये प्रतिष्ठित केली पाहिजे. अशा पद्धतीने वंदे मातरम्चे १५० वे वर्ष जनतेने साजरे करावे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-३८

सोमवार, १० नोव्हेंबर २०२५

### घडवू मन्वन्तर

घडवू मन्वन्तर मन्वन्तर ॥धृ.॥

सहकार्याचे सुखमय जीवन, ध्यास एक हा पवित्र घेउन
जन अपुलेसे करू निरंतर ॥१॥

अहंकारमय फेकुनि ओझे, करु नित हितकर देशाला जे
हासत क्रमुनी पथ हा खडतर ॥२॥

शुभ आकांक्षा सुफलित करिते, सकल विपत्ती विलया नेते
उदित शक्ति करु ती प्रलयंकर ॥३॥

अभिमानाला देश पारखा, कलह त्यास करि क्षीण सारखा
एकत्वावर प्रगती निर्भर ॥४॥

मात कराया दानवतेवर, ठरती बोथट शब्दांचे शर
त्रिनेत्र उघडो समष्टिशंकर ॥५॥

इतिहासाची नटवू पाने, अति गौरवमय पुरुषार्थाने
या देशाचे आम्ही किंकर ॥६॥

ध्वज भगवा हा विश्वविजेता, घेउनि चाले अपुला नेता
ध्येय दूर ना, थोडे अंतर ॥७॥

## रुफटॉप सोलर बसवताना फसवणूक टाळा

भारत सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेला महाराष्ट्रात खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपलं नागपूर राज्यात सोलर सिस्टिम बाबतीत आघाडीवर आहे. नागपूर जवळच्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत सोलर पॅनलचे उत्पादन सुरू झालेले आहे. घरावर सोलर सिस्टिम बसवणाऱ्या व्यक्तींना केंद्र सरकारकडून अनुदान देण्यात येत आहे. भरमसाट वीज बिल भरण्यापासून मुक्ती मिळत असल्याने साहजिकच अनेक नागपूरकर सौर ऊर्जेपासून वीजनिर्मितीचा विचार करत आहेत. शहरातील काही विशिष्ट विक्रेत्यांकडून सोलर सिस्टिम बसवून घेतली तरच अनुदान मिळते. अनेक विक्रेते बनवाबनवी करून ग्राहकांकडून पूर्ण पैसे घेतात आणि सिस्टिम बसवण्यास टाळाटाळ करतात. विक्रेत्यांची विश्वासार्हता, उत्पादनांची गुणवत्ता आणि वॉरंटी तपासणे अत्यावश्यक आहे. आपली फसवणूक झाली असल्यास पीएम सूर्यघर योजनेच्या राष्ट्रीय पोर्टलवर तक्रार दाखल करावी. तक्रारीची ताबडतोब दखल घेऊन आपली समस्या तातडीने सोडवली जाते. ज्यांनी आपल्या घरावर सोलर सिस्टिम लावली आहे अशा व्यक्तींचे योग्य मार्गदर्शन घेतल्यास फसवणूक टाळता येऊ शकते.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## वाचक पत्रे

### तर पूर व पीक नुकसान भरपाईचे प्रमाण कमी होईल

यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. राज्य सरकारने पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी ऑक्टोबर २०२५ या महिन्याच्या सुरुवातीला राज्य सरकारने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले व योग्यवेळी कर्जमाफीची घोषणा केली जाईल असे सांगितले. या पॅकेजच्या वितरणाचा आढावा मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ८००० कोटी रुपयांची आर्थिक मदत पोहोचली आहे. उपरोक्त आकडेवारीचा विचार केल्यास राज्य सरकार शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई बाबत निश्चितच गंभीर असून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहेत असे दिसते. पाऊस आता पूर्वीसारखा १५ जून ते १५ ऑक्टोबर या चार महिन्यांत सारख्या प्रमाणात न पडता तो ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात काही दिवसात अतिवृष्टी स्वरूपात पडतो आहे. आता पाऊस पडण्याचा प्रकार बदलला आहे. कमी वेळात जास्त जोराने पाऊस पडत आहे. त्यामुळे अतिवृष्टी होऊन बऱ्याच क्षेत्रात पूर येणे व पिकांचे नुकसान होत असल्याचे आढळून येते. निसर्गाच्या लहरीपणामुळे सरकारला शेतकऱ्यांना कोटी- कोटी रुपयांची आर्थिक मदत करावी लागत आहे. आपण निसर्गाच्या प्रक्रियेला थांबवू शकत नाही हे जरी खरे असले तरी, हा नुकसान भरपाईचा दरवर्षी होणारा शासनाचा खर्च कमी करू शकतो. यासाठी जलतंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक आहे. पाऊस पडला की त्या पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होणे गरजेचे आहे. पाणी हे नेहमी उताराकडे वाहते हे आपणास ठावूक आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राचे योग्य सर्वेक्षण करून त्या त्या क्षेत्राचा उतार कोणत्या बाजूला आहे हे आपण सर्वेक्षणावरून ठरवू शकतो. प्रत्येक शेतासाठी व क्षेत्रासाठी पाणी निचरा नाल्या खोदणे आवश्यक आहे. शेताचे क्षेत्रफळ, शेतात येणाऱ्या पाण्याचे पाणलोट क्षेत्र व येणाऱ्या पाण्याचे प्रमाण याचा योग्य हिशेब करून त्यानुसार शेताच्या बाजूला योग्य लांबी, रुंदी व उंचीच्या नाल्या बांधल्या पाहिजेत. गोसीखुर्द मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी, त्या धरणाच्या १०७ कि.मी. लांबीच्या उजव्या मुख्य कालव्यातून चंद्रपूर जिल्ह्यातील असोलामेंढा या तलावाच्या पाणीसाठ्यात वाढ करून सिंचन क्षेत्रात वाढ आपण करीत आहोत. या धर्तीवर प्रत्येक क्षेत्राचे सर्वेक्षण करून पाण्याचा निचरा करणे आवश्यक आहे. तसेच शक्य तिथे सिमेंटचे चेक डॅम बांधून पाणीसाठ्यात वाढ व पूर नियंत्रित होऊ शकतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

www.tarunbharat.net
तरुण भारत
धर्म अध्यात्म



● संयोजक : शिल्पा विवेक कवठेकर/९८२३२६४६२६

# भारतीय जीवनचिंतनाचा मेरुदंड : भगवद्गीता

मानदंड संस्कृतीचे

डॉ. राजेंद्र नाईकवाडे/९८५०३५१०२५



(भाग १)

श्रीमद्भगवद्गीता हा हिंदू धर्म-संस्कृतीचा गाभाग्रंथ आणि मानवतेला कर्मयोग शिकविणारा जगातील आद्य प्रबोधनग्रंथ आहे. जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेले हे तत्त्वज्ञानात्मक खंडकाव्य आधुनिक परिभाषेत एखाद्या स्वतंत्र पंथ-संप्रदायासारखे आहे! गीतोपदेश हाच खरेतर विविध भारतीय धर्मपंथांचा; एवढेच नव्हे तर जागतिक धर्मपंथांचाही एक मध्यवर्ती मूलस्रोत आहे! या गीतामृताचा परामर्श घेताना, भारतीय ज्ञानप्रवाह, संस्कृत भाष्यपरंपरा (शांकरभाष्य), मराठी व अन्य भारतीय भाषांतील भाष्यपरंपरा (ज्ञानदेव), आधुनिक विचारकांची भाष्यपरंपरा (लोकमान्य, गांधीजी, विनोबा, ओशो इ.), जीवन जगण्याची पद्धती (शंकराचार्य, ज्ञानदेव ते लोकमान्य), स्वतंत्र ज्ञानशाखा, जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि मानवीय जीवनमूल्यांची मांडणी करणारा प्रबंध, वगैरे विविध अंगांनी याकडे बघावे लागते. भारतीय विचारक याकडे कोणत्या दृष्टीने बघतात, याचा विचार करताना दोन नावे डोळ्यापुढे येतात! गांधीजी आणि विनोबा! हे दोघेही गीताग्रंथास आपली माता मानतात, हे त्यांच्या अनुक्रमे 'गीतामाता' व 'गीताई' या गीताभाष्यांवरून दिसून येते. विनोबा म्हणतात, गीताई माउली माझी, तिचा मी बाळ नेणता, पडतां रडतां घेई, उचलुनि कडेवरी. केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वातही हे गीतादर्शन मान्यताप्राप्त ठरलेले दिसते. चीनमध्ये अलिकडे झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिसंवादात-भगवद्गीता हा ग्रंथ ज्ञानामृत असून, तो भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचा लघु इतिहास आहे. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय दूतावासाने बीजिंग येथे आयोजित केलेल्या 'भारतीय तत्त्वज्ञान : परंपरांचा संगम' या परिसंवादात चीनमधील तज्ज्ञांनी भगवद्गीतेवर भाष्य केले असून, या ग्रंथाला त्यांनी भारताचा तत्त्वज्ञानविषयक ज्ञानकोश म्हटले आहे. या परिसंवादातील मुख्य वक्ते ८८ वर्षीय प्राध्यापक झांग बाओशेंग यांनी भगवद्गीतेचा चिनी भाषेत अनुवाद केला आहे.

गीता हा हिंदुधर्माचा सर्वमान्य स्वतःप्रमाण ग्रंथ मानला जातो. तो 'भगवद्गीता' शब्दाचा संक्षेप आहे. संस्कृतमध्ये शिवगीता, गुरुगीता, हंसगीता, रामगीता इत्यादी अनेक गीता दिसून येतात. महाभारतात 'अनुगीता' आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेपर्यंत हा इतिहास येतो! गीता असा स्त्रीलिंगी शब्द बनण्याचे कारण गीतेच्या अध्यायसमाप्तीसूचक वाक्यात सापडते. उपनिषत् या स्त्रीलिंगी संस्कृत शब्दांचे बहुवचनी रूप 'उपनिषत्सु' या विशेष्याचे 'श्रीमद्भगवद्गीता' हे विशेषण म्हणून त्या वाक्यात वापरले आहे. गीत म्हणजे गाइलेले. श्रीमत् भगवंताने गाईलेल्या उपनिषदातील असा अर्थ, 'इति श्रीमद्भगवद्भीतात्सु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे... अध्यायः' असे ते समाप्तीसूचक वाक्य प्रत्येक अध्यायाच्या शेवटी आले आहे. त्याचा अर्थ, श्रीमद् भगवद्गीता हे उपनिषद म्हणजेच ब्रह्मविद्या असून, योगशास्त्रही आहे, तोच श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातला संवाद होय. ब्रह्म हे अंतिम सत्य त्याच्या साक्षात्काराने मोक्ष मिळतो. योग म्हणजे मनासह सर्व इंद्रियांचा संयम आणि असा संयम करून एकाग्र मनाने परब्रह्माशी एकरूप होणे. योग हे ब्रह्मप्राप्तीचे साधन म्हणून भगवद्गीतेत वर्णिले आहे. महाभारतातील भीष्मपर्वाचा भगवद्गीता हा भाग. भगवद्गीतेचे १८ अध्याय, ७०० श्लोक आहेत. वेदांताची उपनिषदे, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रे ही प्रस्थानत्रयी मानली आहे. म्हणून केवलाद्वैतवादी शंकराचार्य आणि त्यांचे अनुयायी, विशिष्टाद्वैतवादी रामानुजाचार्य, त्यांचे गुरू यामुनाचार्य आणि त्यांचे अनुयायी, द्वैतवादी मध्वाचार्य आणि त्यांचे अनुयायी यांची आणि इतर वल्लभाचार्य इ. आचार्यांची गीतेवर भाष्ये आणि टीका आहेत. भगवद्गीता हा भागवत धर्माचा मुख्य आधारभूत प्रमाणग्रंथ आहे. भारताप्रमाणेच भारताच्या बाहेरही शेकडो वर्षांपासून या ग्रंथांचे अनेकानेक भक्त होऊन गेलेले दिसतात. अरबी मुसाफिर अल बीरूनी (९७३-१०४८) यास हा ग्रंथ फार आवडला होता असे म्हणतात! लंडन येथे १७८५ साली विल्किन्सन याने गीतेचे इंग्लिश भाषांतर प्रसिद्ध केले. त्यामुळे युरोपमध्ये याची चांगली प्रसिद्धी होऊ लागली. ई. आर्नल्डने केलेले गीतेचे द सॉंग सिलेस्टिअल हे भाषांतरही प्रसिद्ध आहे. १८२३ साली आउगुस्ट हिल्हेल्म फोन स्लेगेल (१७६७-१८४५) याने गीतेची परिष्कृत आवृत्ती लॅटिन भाषांतरासह १८२३ मध्ये प्रसिद्ध केली. हे भाषांतर जर्मन पंडित व्हिल्हेल्म फोन हंबोल्ट (१७६७-१८३५) याने वाचले आणि तो हर्षित झाला. त्याच्या मते, महाभारतातील भगवद्गीता ही घटना फार सुंदर आहे आणि आपणास माहीत असलेल्या साहित्याच्या जगात बहुधा सर्वश्रेष्ठ अशी ही तत्त्वज्ञानात्मक कविता आहे, असे म्हणावे लागते.

काही गीताभ्यासकांच्या मते, आज जे गीतेचे समग्र स्वरूप आहे, ते विचारात घेता, त्यातील विचारांचा ऐतिहासिक क्रम कोणता, मूळचा भाग कोणता व नंतरचा भाग कोणता या गोष्टींचा निस्संशय असा अंतिम निर्णय करणे कठीण आहे. त्याचप्रमाणे गीतेत अनुक्रम आणि उपसंहार लक्षात घेता गीतेत 'ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचाच' आदेश हा मुख्य आहे, हे गीतारहस्यकार लो. टिळक यांचे मत मान्य करावे लागते. मात्र, काही ठिकाणी सांख्ययोग किंवा ज्ञानयोगाचा आणि काही ठिकाणी; विशेषतः अखेरच्या अठराव्या अध्यायात भक्तियोगाचा अंतिम संदेशही भगवंतानी दिलेला दिसतो. ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग यापैकी कोणता योग हा प्रधान उद्दिष्ट मानले, तरी ज्ञानयोगाला किंवा स्थितप्रज्ञ दर्शनाला कर्मयोगाची आणि भक्तियोगाची जोड द्यावीच लागते. ज्ञानापासून आणि भक्तिपासून या तीन योगांपैकी कोणताही योग वेगळा करता येत नाही. सुख-दुःखाची द्वंद्वांच्या पलीकडची अनासक्त अवस्था हे या सर्व योगांचे शुद्ध अधिष्ठान आहे. या अधिष्ठानाचे परमशांती किंवा ब्रह्मनिर्वाण हे अंतिम स्वरूप आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत गीतेचे अनेकानेक भाष्यकार झाले आहेत. शंकराचार्यपूर्व भाष्यकारांच्या मते, ज्ञानकर्म समुच्चय, शंकराचार्यांच्या मते, निष्काम कर्मजन्य चित्तशुद्धीने निष्पन्न होणारी संन्याससहित ज्ञाननिष्ठा, रामानुज, मध्व, निंबार्क ज्ञानेश्वर इ. आचार्यांच्या मते, ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करीत साक्षात्काररूप झालेली भक्ती किंवा योगी अरविंदांच्या मते कर्म, पातंजलयोग, ज्ञान व भक्ती याचा समुच्चय म्हणजे पूर्णयोग, यापैकी कोणते तरी एक किंवा यांचा सम्यक समन्वय हे गीतातात्पर्य असल्याचे लक्षात येते. अर्जुनाच्या संमोहाचा किंवा संभ्रमाचा निरास करण्याकरता आत्मतत्त्वाच्या विवरणापासून श्रीकृष्ण परमात्म्याने आपल्या विवेचनाचा प्रारंभ केला आहे. भगवान म्हणतात- या युद्धात हत्या होणार आहे, त्यात नाशवंत शरीरेच नष्ट होणार आहेत, आत्मा नव्हे! या शरीरातील आत्मा सनातन व नित्य अविनाशी असाच आहे म्हणून त्यांसंबंधी शोक करण्याची जरूर नाही! बहुतेक वेळा कृष्ण हा स्वतः परमेश्वर असून, तो परमेश्वररूप अर्जुनास उपदेश करीत आहे, असा या संवादाचा आकृतिबंध आहे. फलाची अपेक्षा न धरता निष्काम बुद्धीने स्वधर्माचे आचरण करावे हे सैद्धांतिक आशयसूत्र अथापासून इतिपर्यंत जवळपास कायम दिसते. भगवद्गीतेमध्ये काही अंतर्विरोधी वाटतील, अशी विधानेही दिसून येतात! युद्धभूमीवर युद्धासाठी म्हणजे एकप्रकारे हिंसेसाठी उपदेश असा वाच्यार्थ गृहीत धरून काही विचारकांनी गीतेचे टीकात्मक विश्लेषण केलेले दिसते. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. परंतु, जेव्हा हेच बाबासाहेब आपल्या वृत्तपत्राच्या शीर्षस्थानी ज्ञानेश्वरीतील अर्जुनाच्या युद्धसिद्धतेसंबंधीची ओवी आपल्या प्रबोधनमाध्यमाचे घोषवाक्य म्हणून मिरवितात, तेव्हा गीतेचा जनमानसाने घ्यावयाचा खरा उपदेशच ते एकप्रकारे अधोरेखित करतात. इंग्रजविरोधी, भारत राष्ट्रावरील सांस्कृतिक आक्रमणविरोधी आणि सर्व प्रकारच्या विदेशी वसाहतवादविरोधी स्वातंत्र्यसंग्रामाचे जनक लोकमान्य टिळक हे गीतेचा जो कर्मयोगपर अन्वयार्थ मांडतात व आपले हे आधुनिक गीताभाष्य जनताजनार्दनाला अर्पण करतात, तोच अर्थ भारतीय जनमानसात रुजला असून, त्याच आधारावर अनेक भारतीय महापुरुषांचे जीवन घडलेले दिसतात. काही विद्वानांच्या मते, संपूर्ण गीताशास्त्राचा निःश्रेयस-पर्यवसायी सारभूत अर्थ सांगणारा आदेश असा सांगता येईल! मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडवा॥ (गीता ११.५५) अर्थ : माझ्याकरिता कर्म करणारा, मीच ज्याचे अंतिम उद्दिष्ट आहे, माझा भक्त, आसक्तीरहित, प्राणिमात्रांबद्दल निर्वैर वृत्तीचा असा जो तो, हे पांडवा, माझ्यापाशी येतो. माझ्या कर्मांत जो मग्न भक्तीने भरला असे. जगी निःसंग निर्वैर मिळे जो मज मत्पर - **विनोबा** ●●

**(लेखक समरसता साहित्य परिषदेचे महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य आहेत.)**

# मच्छिंद्रनाथांना भगवान शंकर व दत्तगुरूंचे दर्शन आणि नवनाथ पंथाची स्थापना

श्री नवनाथ भक्तिसार

स्मिता देशमुख/९९२३१६८६८६



भगवान शंकर आणि दत्तात्रेय बद्रिकाश्रमाची शोभा पाहत असताना त्यांची नजर उग्र तपश्चर्या करीत असलेल्या मच्छिंद्रनाथांकडे गेली. भगवान शंकरांच्या सांगण्यानुसार दत्तात्रेय प्रभू मच्छिंद्रनाथांकडे गेले. तपसाधनेने त्यांचा अस्थिपंजर झालेला देह तेजोमय झाला होता. दत्तगुरूंनी मच्छिंद्रनाथांना अनुग्रहित केले व नवनाथ पंथाची स्थापना करून घेतली. मच्छिंद्रनाथांना भगवान शंकराचा व दत्त गुरूंचा आशीर्वाद प्राप्त झाला. महादेवाने दत्तात्रेयांना अशी विनंती केली की, मच्छिंद्रनाथांकडून आपण सर्व सिद्धींचा अभ्यास करून घ्यावा. भोलेनाथाच्या सूचनेनुसार दत्तगुरूंनी मच्छिंद्रनाथांना कला, विद्या, मंत्र, तंत्र सर्व शिकविले. सर्व देवीदेवतांच्या शक्ती प्राप्त होण्यासाठी त्यांच्याकडून साधना करून घेतली व सिद्धी व शक्ती प्राप्त करून दिल्या.

नवनाथ संप्रदायाच्या परंपरेनुसार योग दीक्षा दिली आणि 'नाथ' ही संज्ञा, शैली, शृंगी असे विविध अलंकार, नाथपंथी भूषणे दिली. सामर्थ्य देऊन नवनाथ संप्रदाय वाढविण्याची आज्ञा केली. यानंतर भगवान दत्तात्रेय आणि महादेव हे स्वस्थानी परतले आणि मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रा करण्यासाठी तेथून निघाले.

अध्याय दुसरा

**सप्तशृंगी गडावर मच्छिंद्रनाथांना देवीचा उपदेश**

मच्छिंद्रनाथ तीर्थयात्रा करीत असताना सप्तशृंग पर्वतावर आले. सप्तशृंगी मातेचे दर्शन घेताच त्यांना अशी स्फूर्ती झाली की, कलियुगातील संकटग्रस्त लोकांसाठी उपयोगी पडेल असे दिव्य शास्त्र काव्यरूपाने रचावे. यासाठी त्यांनी अंबामातेसमोर सात दिवसांचे अनुष्ठान केले. माता प्रसन्न झाली व तिने मच्छिंद्रनाथांना मार्तंड पर्वतावर नेले आणि त्यांच्याकडून बीज मंत्राने हवन करविले. यामुळे त्या ठिकाणी विशालकाय असा कांतीमान नागवृक्ष प्रगट झाला. यावर विविध देवता विराजमान होत्या. मंत्रोपासना केल्यावर ते झाड सुवर्णमय झाले. देवीने मच्छिंद्रनाथांना सर्व देवीदेवतांचा परिचय करून दिला आणि त्यांची कृपा प्राप्त करण्यासाठी एक अत्यंत प्रभावी असा उपाय सांगितला. देवी म्हणाली की, यावेळेस तू भगवान सूर्यनारायणाचे स्मरण करून आपली साधना चालू ठेव, त्यामुळे तुला कुठलीही बाधा होणार नाही. हे ऐकून मच्छिंद्रनाथांनी देवीला वंदन केले. देवी आशीर्वाद देऊन स्वस्थानी निघून गेली. यानंतर देवीने सांगितल्याप्रमाणे सर्व विधी यथासांग करून मच्छिंद्रनाथांनी सहा महिने कठोर परिश्रम केले आणि त्या नागाश्वथ वृक्षावरील सर्व दैवते प्रसन्न करून घेतली. सर्व देवतांनी दिलेल्या विद्यांच्या आधारे मच्छिंद्रनाथांनी शाबरी विद्येवर आधारित महान अशा ग्रंथाची निर्मिती केली.

**मच्छिंद्रनाथांचे बंगाल येथे आगमन, ब्राह्मण स्त्रीस भस्म दान**

तीर्थाटन करीत मच्छिंद्रनाथांचे आगमन बंगाल देशातल्या चंद्रगिरी गावात झाले. या गावात धर्माप्रमाणे आचरण करणारा सर्वोपदयाळ व सरस्वती असे दाम्पत्य होते. सरस्वती सद्गुणी व पतिव्रता होती. परंतु, अपत्य नसल्याने दोघेही दुःखी होते. भिक्षा मागत असताना मच्छिंद्रनाथ या दाम्पत्याच्या घरासमोर गेले. मच्छिंद्रनाथांचे तेजस्वी रूप पाहून हे कोणीतरी महान योगी असावेत, असे तिला वाटले. तिने आपली व्यथा सांगितली. मच्छिंद्रनाथांनी आपल्या झोळीतून चिमूटभर भस्म काढले आणि ते सूर्यमंत्राने अभिमंत्रित केले. सरस्वतीला देऊन म्हणाले की, तू याचे सेवन कर. याच्या प्रभावाने तुझ्या पोटी हरिनारायणाचा जन्म होईल.

तुझ्या पोटी आलेला हा पुत्र यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य प्राप्त करेल. पुढे १२ वर्षांनी मी स्वतः त्याला अनुग्रह देईन, असे सांगून आणि भिक्षा घेऊन मच्छिंद्रनाथ पुढील प्रवासासाठी निघाले.(ही गोष्ट सरस्वतीने शेजारच्या स्त्रियांना सांगताच त्यांनी तिला कानफाट्या साधूंच्या चेटूक कथा सांगून घाबरवून सोडले.

याचा परिणाम असा झाला की, तिच्या मनात विकल्प उत्पन्न झाला. सरस्वतीने ते भस्म गोठ्याच्या मागे उकिरड्यात टाकून दिले आणि घरी स्वगृही आली.

**अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त !** ●●

# राम जपु जीह.. जानि प्रीति सों..!

**राम जपु जीह.. जानि, प्रीति सों प्रतीति मानि**
**रामनाम जपे जैहै जिय की जरनि ।**
**रामनाम सों रहनि, रामनाम की कहनि**
**कुटिल-कलि-मल-सोक-संकट-हरनि ॥१॥**
**रामनाम को प्रभाउ पूजियत गनराउ**
**कियो न दुराव, कही आपनी करनि ।**
**भव-सागर को सेतु, कासी हूँ सुगति हेतु**
**जपत सादर सम्भु सहित घरनि ॥२॥**
**बालमिकि ब्याध हे, अगाध-अपराध-निधि**
**'मरा मरा' जपे पूजे मुनि-अमरनि ।**
**रोक्यो बिंध्य, सोख्यो सिंधु घटजहुँ नाम-बल**
**हारयो हियँ, खारो भयो भूसुर-डरनि ॥३॥**
**नाम-महिमा अपार सेष सुक बार-बार**
**मति-अनुसार बुध बेदहूँ बरनि ।**
**नामरति-कामधेनु तुलसी को कामतरू**
**रामनाम है बिमोह-तिमिर-तरनि ॥४॥**
**- गोस्वामी तुलसीदास**



श्रीरामचरितमानस (भाग ९)

जिव्हे, रामनामाचा जप कर. त्याचे महत्त्व लक्षात घे. त्यासंबंधी सारं जाणून घे. त्यावर विश्वास ठेवून हे नामस्मरण सुरू कर. या नामस्मरणानं तुझा हा हृदयाचा दाह शांत होईल. फक्त नामस्मरणच कर असं नाही, तर त्यानुकूल आचरणही करायला विसरू नकोस.

कुठेही बोलायचे झाले तर रामनामाचे कथन कर. वाणीचा दुरुपयोग होणार नाही, याची काळजी घे. राम नामाचा विलक्षण प्रभाव लक्षात घेतल्यास तुला कळेल की, कलियुगात सर्व दुःखांचा परिहार करणारे हे अमोघ साधन आहे. या कुटिल कलियुगात पाप, दुःख आणि सर्व अनिष्टांचा नाश करायचा असेल किंवा पापं घडू नयेत, असे वाटत असेल, तर रामनाम घे. या स्मरणाने येणारी प्रसन्नता अपार सुखद असेल.

रामनामाच्या प्रभावानंच आरंभी गणेश पूजा होते. श्रीगणेशांनी आपल्या सर्व कृतींचे निःसंकोच कथन केले आहे. प्रथम गणेशपूजा का होते, ती कथा स्वतः गणेशांनी सांगितली आहे. संसार समुद्राला यशस्वीपणे पार करून जायचे असेल, तर रामनाम त्यावरील पुलासारखे आहे. त्यासाठी उगाच आणखी यातायात करण्याचे कारण नाही. भगवान शंकर काशीत पार्वतीसह सर्वजीवांना मुक्तीसाठी रामनाम स्मरण हाच उपाय सांगत आहेत.

वाल्मीकिंनी काय कमी पापं केली होती? पण रामाऐवजी 'मरा मरा' असा उलट जप केला आणि ते वाल्याचे ऋषी वाल्मीकि झाले. परिणामी ऋषी आणि देवांनीही त्यांना पूज्य मानले. अगस्ती ऋषींनीही याच नामाच्या प्रभावाने विंध्य पर्वताला अती पसरायला प्रतिबंध केला आणि समुद्रही प्राशून आटवला होता. समुद्र पराभवाने खजिल झाला आणि त्यामुळेच गोडवा हरवून खारट झाला.

नामाचा महिमा अपार आहे. शेष, शुकदेव, वेद आणि पंडितांनी ही आपल्या शक्तीनुसार त्यांच्या महत्त्वाचा उल्लेख केला आहे. रामनामाबद्दल प्रेम ही गोष्ट, तर तुलसीदासाला कल्पवृक्ष किंवा कामधेनुसारखी आहे. इतकेच नव्हे तर, 'रामनाम' हे अज्ञानरूपी अंधःकाराला संपूर्ण नष्ट करणाऱ्या सूर्यासारखे अतिशय प्रभावशाली आहे. ●●

डॉ. शरद् कळणावत


# दशक आठ - दुश्चित निरूपण

समर्थवाणी

वृषाली मानेकर/८६०५१७७४७८

परमार्थात प्रत्येकाला वाटते की, आपल्याला ईश्वर दर्शन व्हावे, ब्रह्मदर्शन घडावे. सत् समागमामुळे ते घडते हे खरे आहे. पण सत् समागम घडला तरी कुणी सांगू शकेल का की, एका विशिष्ट वेळेत आपल्याला ब्रह्मदर्शन घडेल? अनेकांना सत् संगती लाभते, त्यांचं सातत्यही टिकते तरीपण अपवादात्मक साधकांनाच ब्रह्मदर्शन घडते. असे का होते, याचे कारण समर्थांनी या समासात स्पष्टपणे सांगितले आहे. या जगात समता जर कुठे आढळत असेल, तर ती संतसज्जनांजवळ दिसते. त्यांनी अनुभवलेला ब्रह्मानंद ते मुक्त हस्ताने उधळतात. तो ब्रम्हानंद घेणे आणि पचवणे यासाठी साधकाच्या मनाची ताकद आणि तयारी लागते. म्हणूनच सत् समागम घडला तरी त्याचा लाभ सगळ्यांनाच घेता येईल असे नव्हे. आता मनाची तयारी म्हणजे कोणती, याचे वर्णन बृहदारण्यकामध्ये याज्ञवल्य ऋषींनी जनक राजाला दिले होते.

आत्मा कसा आहे, हे समजून घेण्यासाठी इंद्रियसंयमन, एकाग्रता, अंतर्मुख होणे, सहनशील असणे या सर्व क्रिया व्हाव्या लागतात. सर्वप्रथम निरनिराळ्या विषयांकडे धावणाऱ्या मनावर नियंत्रण ठेवावे. ओढाळ बैल जसा हिरव्याकडे धावतो तसेच मन सतत विषयाकडे धाव घेते. आपल्या वेळेचा सतत सदुपयोग करावा, असे श्री समर्थांनी या ठिकाणी सुंदर दृष्टांत देऊन स्पष्ट केले आहे. समर्थ म्हणतात, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवालासुद्धा देवपणा येत नाही. समजा एखादा वाकडा-तिकडा दगड आहे, त्याला टाकीचे घाव घालून नीट केला; पण पुन्हा बघावे तर तो जसाच्या तसाच दिसतो. टाकीचा घाव घालून दगडाची खपली काढली, तर ती काही पुन्हा त्या दगडाला चिकटत नाही. माणसाचे तसे नाही. उत्तम उपदेशाने माणसाच्या वाईट बुद्धीत बदल होऊ शकतो. ज्याप्रमाणे नारदांच्या उपदेशाने वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाला तसेच काहीसे हे आहे. कधीकधी हे बदल तात्पुरते असू शकतात.



(समास ६ वा)

एखाद्याला त्याच्यातील दोष समजावून सांगितले, तर तेवढ्यापुरता त्याच्यात बदल होतो. पाषाणाचे असे होत नाही म्हणून माणसापेक्षा पाषाणच बरा, असे समर्थ म्हणतात. मंदिरे, घाट, चबुतरे, धर्मशाळा बांधण्यासाठी पाषाणाची गरज लागते. निरनिराळ्या देवांच्या मूर्ती बनवण्यासाठी उत्तम पाषाण वापरतात. या दृष्टीने विचार केला, तर पाषाणाचे मूल्य कितीतरी आहे, हे लक्षात येते. त्यापुढे माणसाची किंमत कमीच आहे, असे म्हणायला हरकत नाही. श्री समर्थ दुश्चितपणाने मानवी जीवनाची कशी नासाडी होते, याचे वर्णन करतात. मनाचा अस्थिरता, श्रद्धाहीनता, श्रम करण्याची तयारी नसणे, चित्ताची व्यग्रता, निश्चितपणाचा अभाव या सर्व गोष्टी मानवाला घातक आहेत. दुश्चितपणा अंगी असेल, तर धड प्रपंच नाही अन् परमार्थही नाही, अशी अवस्था होते. दुश्चितपणामुळे चांगल्या कार्याचा नाश होतो. मनाला सतत चिंतेने ग्रासलेले असल्यामुळे कोणत्याही गोष्टीचे नीट स्मरण राहत नाही. दुश्चितपणामुळे जीवन नकोसे वाटते. जन्ममरण पाठीस लागते. एकंदरीत, भजन, पूजन किंवा कोणतेही साधन घडत नाही. पर्यायाने साधकाला आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाही. दुश्चितपणा म्हणजे अशांत, अस्थिर, अश्रद्ध्य आणि अनिश्चित चित्त होय, अशी याची व्याख्या करता येईल. केवळ दुश्चितपणामुळे माणसाचे केवढे नुकसान होते, त्यात आळसाची भर पडली, तर जीवन अगदीच वाया गेले असे समजावे. श्री समर्थांना आळशी माणूस मनापासून आवडत नाही. आळसे कार्यभाग बुडाला हेच खरे. तो माणूस दुश्चित आहे, आळशी आहे, त्याबद्दल न बोललेले बरे. तो सदा सर्वकाळ आपला वेळ आळसात घालवतो, त्याला परमार्थ साधने अगदीच अशक्य आहे. आळसाने माणसाच्या विचारांची वाढ खुंटते आणि आचार धर्म बुडतो. श्रवण घडत नाही. पाठांतर होत नाही. निरूपण, प्रवचन याचा फायदा घेता येत नाही. परमार्थाची साधना हळूहळू मलिन होऊ लागते. आळशी माणसाला सतत निद्रेचा मोह होतो. खूप खावे, खूप निद्रा घ्यावी, उरलेला वेळ उगीच वाया घालवावा, असा आळशी माणसाचा स्वभाव असतो. खरे म्हणजे आळशीपणा, झोपाळूपणा ही अज्ञानाची लक्षणे आहेत.

माणसाच्या बुद्धीला दोन बाजू असतात. एक म्हणजे इंद्रियांच्या माध्यमातून आत येणारी दृश्य जगाची माहिती व्यवस्थितपणे रचून दृश्य वस्तूचे ज्ञान करून देणारी एक बाजू आणि दृश्य वस्तूवरून वृत्ती काढून घेऊन अंतर्मुखपणे स्वरूपाकडे पाहणारी दुसरी बाजू. बुद्धीच्या या दुसऱ्या बाजूला सद्बुद्धी किंवा प्रतिमा असे म्हणतात. सद्बुद्धीच्या अभावात परमार्थ होऊ शकत नाही. दुश्चितपणा, आळस, निद्रेचा विलास या दुष्ट त्रयीमुळे आयुष्याची माती होण्यास वेळ लागत नाही. खरे तर तीनही दुर्गुण मूर्खाची लक्षणे आहेत. त्यामुळे कोणत्याही उपदेशाचा प्रभाव कुचकामी ठरतो. अज्ञानी माणसाला अज्ञान आणि झोप यापेक्षा दुसरे काहीच महत्त्वाचे वाटत नाही. अज्ञानी माणूस भूक लागली की पोटभर जेवतो, जेवून उठला की त्याला सुस्ती येते आणि मग तो निश्चिंतपणे झोपा काढतो. ज्याप्रमाणे माकडाच्या हाती एखादे रत्न दिले, तर त्याला जसे त्याचे काहीच महत्त्व वाटत नाही, तो ते वाया घालवतो, त्याचप्रमाणे दुश्चित माणसाला केलेला परमार्थाचा उपदेश फुकट जातो.

सत् समागमाचा प्रभाव कसा असतो, हे श्री समर्थांनी समजावून सांगितले. जसे लोखंड परिसराला लागले, पाण्याचा थेंब समुद्रात पडला, एक नदी गंगेला येऊन मिळाली, ज्या क्षणी हे घडते, त्या क्षणी लोखंडाचे सोने होते, पाण्याचा थेंब सागर बनतो आणि नदी गंगारूप होते. त्याचप्रमाणे जो अत्यंत सावध आहे, कष्टाळू आहे, तत्पर आहे, त्याला सत् समागमामुळे ताबडतोब मोक्ष प्राप्त होतो. परमार्थाच्या अनुभवात साधकाची दृष्टी तयार व्हावी लागते. जो अनन्य असतो, समर्पित असतो, त्याची मोक्षाकडे होणारी वाटचाल वेगाने होते. त्याच्या अंतर्यामी विवेकबुद्धी निर्माण होते. आता मोक्ष म्हणतात तो आहे तरी कसा? स्वरूपदर्शकाची अवस्था कशी असते? सत्ससमागम केल्याने स्वरूपदर्शन खरेच होते काय? असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. साधक जर मनाने स्थिर असेल, तर या सर्व प्रश्नांची उत्तरं श्री समर्थांकडून ओघाओघाने मिळतात. प्रश्नांची उकलही होते. त्यासाठी मन स्थिर करणे गरजेचे आहे एवढे खरे. ●●

# श्री गुलाबराव महाराज विरचित स्त्रीगीते

ज्ञानेशकन्या

डॉ. अलका इंदापवार/८४५९१२३६६९

श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक असामान्य अद्वितीय असे व्यक्तित्व. जन्मकर्म च मे दिव्यं असे भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी म्हटलेले आहे. त्याची आठवण गुलाबराव महाराजांचे चरित्र आणि कार्य पाहून जरूर होते. मी प्रत्येक कलियुगात धर्माचार्य म्हणून येत असतो आणि श्रीनारदांच्या आज्ञेने भक्तीची पुनर्स्थापना करीत असतो, ही श्री महाराजांची वचने सध्याच्या धकाधकीच्या असुरक्षिततेच्या काळात फार आधार वाटतात. यातूनच त्यांचे संतत्व दिव्यत्व प्रगट होते. त्यांच्या हृदयात जे सद्गुरू श्रीज्ञानेश्वर महाराज आणि श्रीकृष्णाचे प्रेम ओतप्रोत, अगदी तुडुंब भरलेले आहे, त्याचा अखंड स्रोत काव्यरूपाने वाहत असतो. 'गंगेसी उदधी निरंतर' या ज्ञानेश्वरीतील ओवीप्रमाणे गंगेचा ओघ जसा समुद्राकडे मिळाल्यानंतरही पुन्हा पुन्हा वाहत राहतो, त्याप्रमाणे भगवंताची प्राप्ती झाल्यावरही त्या सिद्धावस्थेचा अनुभव तो दिव्य आनंद अत्यंत रसाळतेने विविध रूपरचना आकार घेऊन अलंकारिकतेने व्यक्त केला आहे. ते शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. प्रेमाच्या ओघात त्यांनी केलेली काव्यरचना आपल्याही मनाला स्पर्शून त्यात कृष्ण प्रेमाचा अंकुर फुटतो. श्री गुलाबराव महाराजांनी स्त्री वर्गासाठी काही गीत रचना केली आहे. स्त्री जीवनाचे आणि त्यांच्या भावनिकतेचे प्रतिबिंब त्यात उमटले आहे. या स्त्रीगीतातून भगवंताच्या परमप्रेमाचे नवनवे उन्मेश तर आहेतच याशिवाय भक्तीविचारांचे सूक्ष्म पैलू देखील उलगडून दाखविलेले आहेत. श्रीकृष्णाच्या लीला वर्णन करताना ही स्त्रीगीते बहारीने व्यक्त होतात. गौळणी गाऱ्हाणी घेऊन यशोदेकडे येतात आणि यशोदा आपले पुत्रप्रेम व्यक्त करते. त्यात यशोदेला श्रीकृष्णाचे परब्रह्म ज्ञानही कायम असते.

**यशोदा म्हणते,**
**बाई माझा कृष्ण तान्हा प्रेमासाठी वश ग ।**
**सोडोनी क्षीराब्धीजा गोकुळी करी वास ग ॥**
**जावो जा घरी नारी माझ्या बाळाला बोलू नका ।**
**मुनीही ध्याती जया तो मिळाला आम्हा फुका ॥**
**उनाड माझा मला तुम्हासी करणे काय ।**
**माझिया दारामध्ये न द्यावा पुन्हा पाय ॥**

यशोदेचे कृष्णप्रेम आणि गौळणींनी केलेली तक्रार याचे अतिशय सुंदर नाट्यमय वर्णन केलेले चित्रबद्ध लेखन आणि साधी बोलभाषा यामुळे ही स्त्री गीते अत्यंत लोभस आकर्षक झालेली आहेत.

**बाई आली ही आली गाई ।**
**गाय ही हंबरत ॥**
**बाई माझा मेघःशाम ।**
**श्रीकृष्ण दूध पीत ॥**
**हाड हाड गाई । गाई गेल्या पाण्या ।**
**माझिया नंदलाला । साखर देजो वाण्या ॥**



श्रीकृष्णाचे महात्म्य ज्ञान यशोदेच्या तोंडी श्री महाराजांनी असे घातले आहे की, त्यामुळे त्या स्त्रीगीताचा बाज एकदम वेगळ्या स्तरावर जातो.

**यशोदा म्हणते,**
**म्हणता तुझी माय वाटते लाज मनी ।**
**तू माझी कृष्णाबाई जनक आणि जननी ॥**

संसारिक गप्पा, याच्या-त्याच्या उखाळ्या पाखळ्या, सासर-माहेरचं वर्णन करणारी स्त्री या स्त्रीगीतात दिसत नाही तर गुरुकृपा, श्रीकृष्णाचे सान्निध्य, आणि त्याचा गोड दिव्य अनुभव यातून व्यक्त झालेला आहे. त्यामुळे स्त्रीगीत सदृश रचना जरी असली, तरी सुद्धा त्याचा गहन गंभीर अर्थ माणसाला अंतर्मुख करतो. सोपे शब्द आणि अर्थ, चारचौघींना सहज विशिष्ट ठेक्यावर म्हणता येण्यासारख्या रचना हे स्त्रीगीताचे वैशिष्ट्य आहे. शिळोप्याच्या वेळी चार घटका आनंदात जाव्या यासाठी ओवीवृत्तासारखी रचना असलेली गाणी स्त्रिया गात असत. कधी दळताना, कांडताना तर कधी गौरी गणपती दिवाळी अशा सणासुदीला ही गाणी रंगत असत. यातून स्त्रियांचा मनोव्यापार आणि त्यात असणारी कलात्मकता व्यक्त होते, ही सर्व वैशिष्ट्ये श्री गुलाबराव महाराजांच्या स्त्रीगीतात आढळून येतात.

**सगुण प्रेमापुढे मज नावडे ब्रह्मभाव ग ।**
**मोहनगिरीधारी कृष्णाला राधा प्यारी ग ॥**
**निंब ते स्वर्गभोग । बाई साखर विष्णुस्थान ग ।**
**भोजनी रुचे ऐसे। मम लवण वृंदावन ग ॥**
**अन्य न पहावे मुख । म्हणूनी पतीने अंध केले ग ।**
**रडता विश्वासाही। गुरुमायेने उचलिले ग ॥**
**बोलिल्या बोलण्याची । बाई श्रीकृष्णा वाटे लाज ग ॥**
**म्हणोनि देवभक्त । पायी ज्ञानेश्वराच्या साजे ग ॥**
**आळंदी लागी जाता । मार्गी कोटिशः वृंदावन ग ॥**
**सद्गुरू पाहता डोळा । अंग झाले हे नारायण ग ॥**

या स्त्रीगीतात स्वर्ग विष्णूस्थान आणि वृंदावन यांच्यासाठी आलेली उपमाने अत्यंत सुंदर आहेत. स्वर्गभोग हा कडूलिंबासारखा कडू असून, विष्णूस्थान हे साखरेप्रमाणे गोड आहे; परंतु वृंदावन हे मिठासारखे खारट असले तरी जेवणाची रुची ही मिठाशिवाय येऊ शकत नाही. त्यामुळे वृंदावनाची कृष्णभक्ती अत्यंत आवश्यक आहे, असे सुंदर वर्णन येथे दिसून येते. श्री महाराजांनी इथे आपल्या अंधत्वाचे कारण दिले आहे. श्री महाराजांची माधुरा भक्ती होती, त्यामुळे ते श्रीकृष्णाला आपला पती मानत असत. माझ्यासारख्या गोपीने अन्य कोणाचेही मूख पाहू नये म्हणून मला श्रीकृष्णाने अंध केले आहे, असे ते आपल्या सखीला सांगतात.

त्यांची सद्गुरूभक्ती गीताच्या अखेरीस व्यक्त होते. माझे सद्गुरूनाथ ज्ञानेश्वर महाराज इतके सामर्थ्यवान आहेत की, त्या आळंदीश्वराला शरण गेले तर त्या मार्गात अनेक वृंदावने सहजच प्राप्त होतात. या माझ्या सद्गुरूंना डोळ्यांनी पाहिल्यावर माझे स्वतःचे अंगही नारायणा रूप झाले. असा दिव्य अनुभव अत्यंत वेधक आहे.

विशिष्ट चालींची विशिष्ट तालात स्वरबद्ध होणारी चित्रमय शैलीतील कलात्मक भान असणारी ही स्त्रीगीते विस्तृत प्रमाणात महाराजांनी लिहिलेली आहे. त्याचे सादरीकरण करून लोकांपर्यंत ती लोककला माध्यमातून पोचविता येतील आणि त्यामुळे कृष्णभक्तीचा प्रचार-प्रसार करता येईल. यात केवळ दोन-चार गीते दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या या लोक गीतातील विराणी, लावणी, तुंबडी, कटाव, शैयागीत यातून कलेचे अतिउच्चतम भान दिसून येते. ●●

# संपत्ती पेक्षा ज्ञानाचे पारडे जड : पाटील

## कबनसांगवी येथे ६४ गुणवंतांचा सत्कार । आ. संजय बनसोडे, अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची उपस्थिती

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ११ नोव्हेंबर :** जेंव्हा जेंव्हा गुणवत्तेचा कस लागतो तेंव्हा संपत्ती पेक्षा ज्ञानाचे पारडे जड असते याचे




जागतिक उदाहरण म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांच्याकडे संपत्ती नव्हती मात्र 'ज्ञानाचे प्रतीक' म्हणून आज त्याचे नाव जगात गाजते आहे असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी कबनसांगवी (ता. चाकूर) येथे रविवारी दि.९ रोजी गुणवंतांचा सत्कार कार्यक्रमात केले.

सेवानिवृत्त पोलिस पाटील माणिकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री संजय बनसोडे, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जि.प.सदस्य सुदर्शन मुंढे, माजी नगराध्यक्ष सौ. उषाताई कांबळे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नितीन रेड्डी, माजी नगरसेवक रविंद्र निळकंठ, सरपंच सौ. अनुश्री सांगवे, उपसरपंच सौ. मीनाक्षी राजारुपे, विनायक बडे आदी उपस्थित मान्यवर होते.

माजी पंचायत समिती सदस्य राजकुमार राजारुपे यांच्या संकल्पनेतुन ॲड.विनोद निला, धनराज बाचिफळे यांनी 'गावचा अभिमान.. गुणवंतांचा सन्मान' या बॅनरखाली आयोजित केलेल्या या सत्कार सोहळ्यात नुतन २३ डॉक्टरांचा व ९ वैद्यकिय प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व दहावी, बारावी व विविध शिष्यवृत्ती परीक्षेत व खेळात प्राविण्य मिळवलेल्या व शासकिय नोकरीस लागलेल्या एकूण ६४ जणांचा सन्मान करण्यात आला. माजी मंत्री संजय बनसोडे, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी गुणवंतांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, अतिवृष्टीमुळे पिचलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी इतर काही कामे थांबवली आहेत. परंतु येत्या चार पाच महिन्यांत येरोळमोड ते चाकूर रस्त्याचे काम पूर्ण करुन घेऊ असा शब्द दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी प.स. सदस्य राजकुमार राजारुपे यांनी तर सुत्र संचालन धनराज बाचिफळे व मुख्याध्यापक प्रमोद हुडगे यांनी केले. आभार ॲड. विनोद निला यांनी मानले.

यावेळी चेअरमन संजय पाटील, पोलीस पाटील सोपानदेव पाटील, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समीतीचे अध्यक्ष शिवाजी नांगराळे, डॉ. महादेव सुर्यवंशी, ज्ञानेश्वर सांगवे, अनिल नागराळे, संतोष राजारुपे, संजय राजारुपे, ओम सांगवे, रतन सोनकांबळे, शरद निला, रमाकांत मोतीपवळे, गंगाधर मोतीपवळे, अक्षय मोतीपवळे यांच्यासह नागरीक, महिला आदि उपस्थीत होते.




# कृष्णा श्रीरामे याची राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ११ नोव्हेंबर :** जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा दिनांक ९ नोव्हेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथील क्रीडांगणावर आयोजित करण्यात आली होती. सदरील स्पर्धेत किलबिल नॅशनल स्कूलच्या कृष्णा श्रीरामे या खेळाडूने १४ वर्षे वयोगटात विभागीय स्तरावर अतिशय चांगली कामगिरी करत यश संपादन केले. त्यामुळे पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी कृष्णाची निवड झाली आहे. या खेळाडूला शाळेचे क्रीडा शिक्षक, ,कासीम शेख,मोसीन शेख, , दत्तात्रय गिरी, विशाल सरवदे निलेश बन यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे यांनी खेळाडूचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या फुटबॉल संघाने मारली बाजी

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ नोव्हेंबर :** उदगीर येथे नुकत्याच पार पडलेल्या 'ब' विभागीय आंतर महाविद्यालयीन फुटबॉल पुरुषांच्या स्पर्धेत छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाचा संघ सहभागी होऊन त्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. संघाचा कर्णधार सय्यद अफ्फानच्या नेतृत्वात खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

पठाण तौसिफ, शेख अबराज, धोंडगे निशांत, सावंत कृष्णा, शेख अयान, या खेळाडूंची निवड आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेच्या संघात झाली. खेळ आणि खेळाडूसाठी प्रसिध्द असलेल्या या महाविद्यालयातून अनेक राष्ट्रीय खेळाडू निर्माण झालेले आहेत. ही परंपरा कायम ठेवत खेळाडू आपली उज्ज्वल कामगिरी करत आहेत.

खेळाडूच्या या यशाबद्दल खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहित करणारे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पी.टी. शिंदे, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, व इतर कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे तसेच महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी, विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्षपदी पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ नोव्हेंबर :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या संपन्न झालेल्या बैठकीत बसवराज पाटील मलकापूरकर यांची उपाध्यक्ष म्हणून आणि प्रशांत पेन्सलवार यांची सहसचिव म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. दोघांनीही संस्थेच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. या निवडीबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंगेशकर महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा

**त. भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ नोव्हेंबर :** औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात दि.१० नोव्हेंबर रोजी इतिहास विभाग, मराठी विभाग व गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'गांधी विचार संस्कार परीक्षा - २०२५' आयोजित करण्यात आली. महाविद्यालयातील एकूण २० विद्यार्थ्यांनी प्रस्तुत परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांचे विचार व कार्य माहित व्हावे आणि आपल्या महाविद्यालयीन शिक्षणासोबतच सामाजिक कार्य




करण्याची प्रेरणा मिळावी याकरिता प्रस्तुत परीक्षेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ.आनंद मुसळे यांनी पर्यवेक्षण कर्तव्य पार पाडले. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे यांच्या मार्गदर्शनात इतिहास विभागप्रमुख डॉ.सचिन हंचाटे यांनी परीक्षेचे आयोजन व यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. याप्रसंगी डॉ.सुचिता किडीले डॉ. अशोक नारनवरे इत्यादी उपस्थित होते.

> प्रस्तुत परीक्षेच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याची सविस्तर माहिती मिळाल्याने माझ्या ज्ञानात मोलाची भर पडली आहे. जीवनामध्ये सत्य, अहिंसा, शिस्त, स्वावलंबन, सदाचार, संस्कार इत्यादी मूल्यांचा अंगीकार व जोपासना आवश्यक आहे.
>
> **– ज्योती मरगणे** (परीक्षार्थी).

# अहमदपूरचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ११ नोव्हेंबर :** अहमदपूर नगर परिषद क्षेत्रात एकूण ४४ मतदान केंद्र निर्माण करण्यात आले असून, यावेळी शहरात एकूण ३७६९६ मतदारांचा समावेश आहे, यापैकी पुरुष मतदारांची संख्या १९२४४ असून स्त्री मतदार संख्या १८४५२ एवढी आहे.

उद्यापासून तहसील कार्यालय अहमदपूर येथे नामनिर्देशनपत्र वाटप व भरणा प्रक्रिया चालू होत असून यासाठी ४८ अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी ३ डडढ पथकांची स्थापना करण्यात आली असून शहराच्या ३ येणाऱ्या मुख्य रस्त्यांवर्ती डडढ पथकांची



स्थापना केली आहे. एक लातूर अहमदपूर रोड येथे, दुसरे पथक नांदेड अहमदपूर रोड वर तर तिसरे पथक आंबेजोगाई अहमदपूर रोड वर स्थापन केले आहे.

मतदार जनजागृतीसाठी डथएएझ पथक कार्यरत राहणार असून सर्व १२ प्रभागांमध्ये मतदार जनजागृती केली जाणार आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी उपविभाग कार्यालय येथे पत्रकार बांधव व विविध राजकीय पक्षाचे तालुका अध्यक्ष/पदाधिकारी व प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधताना दिली.

### अहमदपूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले, निवासी नायब तहसीलदार संतोष अनर्थे, नगर परिषदचे अशोक स्वामी, अधिकारी/कर्मचारी, राजकीय पक्षाचे तालुका अध्यक्ष, पदाधिकारी, प्रतिनिधी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# साकोळ शिवरस्त्यांसाठी ८० लाखांचा निधी मंजूर

## आ. संभाजीराव निंलगेकर यांच्या प्रयत्नांना आले यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ११ नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ शिवारातील चार शिवरस्त्यांसाठी आ. संभाजीराव पाटील-निंलगेकर यांच्या प्रयत्नातून ८० लाखांचा निधी मंजूर करण्यात आल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

साकोळ शिवारातील शेतकऱ्यांसाठी आपल्या शेताकडे जाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या साकोळ ते तळेगाव (दे), वाढीव एक किलोमीटर, साकोळ ते घुगी वाढीव एक किलोमीटर, तर साकोळ ते बाकली एक किलोमीटर, साकोळ ते कवठाळ नवीन एक किलोमीटर या चार शिवरस्त्यांसाठी आ. संभाजी पाटील-निलंगेकर यांच्याकडे शेतकरी वर्गातून तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते शिवाजी सोलगे, सूर्यकांत उमाटे, सतीश भिक्का, महेश लुल्ले, संतोष डोंगरे, राजकुमार पाटील, अजीम मुल्ला, अशीष धुमाळे, भानुदास आवाळे यांनी मागणी केली होती.

शिवरस्ते मंजूर केल्यामुळे शेतकऱ्यांची आपल्या शेताकडे जाण्यासाठीची होणारी खूप मोठी गैरसोय दूर होणार आहे. यामुळे आता एक चांगला रस्ता मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांना पावसाळ्यातही आपल्या शेताकडे जाता येणार आहे.

यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.


# दत्ताजीराजे जाधवराव यांच्या समाधीस अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ नोव्हेंबर :** दत्ताजीराजे जाधवराव यांच्या स्मृतिदिनानिमित्त निलंगा तेथील समाधीस्थळी समाधी पूजन व अभिवादन करण्यात आले.

येथील राजे लखुजीराव जाधवराव यांचे नातू, राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांचे भाचे व छत्रपती शिवाजी महाराज यांचे मामेभाऊ दत्ताजीराजे बहादुरजीराजे जाधवराव यांचा ३६० वा स्मृतिदिन निलंगा येथील संगन बसव स्वामी विरक्त मठ परिसर पेठ निलंगा येथील समाधीस्थळी समाधी पूजन करून साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी विशेष म्हणून लखुजीराजे जाधवराव यांचे १७ वे वंशज डॉ. नरेशराजे जाधवराव उपस्थित होते. यावेळी त्यांनी दत्ताजीराजे जाधवराव यांचा इतिहास उलगडून सांगितला व समाधी परिसरातील ऐतिहासिक माहिती दिली.

याप्रसंगी भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव, जिल्हा संघटक विनोद सोनवणे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, उदय निटुरे, सुबोध गाडीवान, सचिन नाईकवाडे, हंसराज शिंदे, शिवाजी भंडारे, गोविंद इंगळे, मनोज कोल्ळे, शेषराव ममाळे, अंकुश ढेरे, पिंटू पाटील, रवी फुलारी, दत्ता मोहळकर, अविराज पाटील,सुमित ईनानी, हरिभाऊ सगरे, प्रकाश पटने, मारुती नागदे, संदीप कांबळे, संतोष मोघे आदींनी उपस्थित राहून स्मृतिदिनानिमित्त समाधी पूजन करून अभिवादन केले.



# रेणापूर-पानगाव रस्त्याच्या कामाला गती येणार केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ११ नोव्हेंबर :** रेणापूरहून पानगावला जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मागच्या चार वर्षांपासून रखडत चालू आहे. रस्ता व्यवस्थित नसल्याने वाहनधारकांना वाहन चालविणेही अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे या रस्त्याच्या कामाला गती येणार तरी केव्हा? असा संतप्त सवाल नागरीकांतून उपस्थित केला जात आहे.

मागच्या चार वर्षांपासून अद्यापपर्यंत या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. परंतु त्याला म्हणावी तेवढी गती आलेली नाही. त्यातच यावर्षी पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्याने रस्ता आणखीनच खराब झाला आहे. वाहनधारकांना वाहने चालविताना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. चारचाकी वाहन घेऊन रेणापूरहून-पानगावला जायचे म्हटले की, अंगावर काटा येत असल्याच्या भावना वाहनधारकांतून व्यक्त केल्या जात आहेत. मुरढव ते पानगावपर्यंतचा रस्ता आता वाहतुकीसाठी योग्य झाला आहे. पाथरवाडीपर्यंतही रस्ता चांगला झाला आहे. मात्र मध्यंतरी रस्त्यात असणाऱ्या खड्ड्यांमुळे या मार्गावरुन प्रवास करणे खडतर बनले आहे. या रस्त्याच्या कामाला गती यावी, अशी मागणी या परिसरातील नागरीकातून सातत्याने लावून धरली जात असली तरी त्याकडे संबंधित विभागाचे अधिकारी फारसे गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत. या रस्त्याच्या कामाला तात्काळ गती देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनीच आता संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत आणि नागरिकांची, वाहनधारकांची रस्त्याअभावी होणारी कुचंबणा संपवावी अशी मागणीही जोर धरत आहे.

# अकृषि विद्यापीठातील रखडलेली भरती प्रक्रिया होणार सुरू?

## ■ एंट्री पॉइंट ला सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठीचे ५०:५० चे सूत्र अवलंबावे : अभाविप

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ नोव्हेंबर :** महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील रखडलेली प्राध्यापक भरती होण्याचे संकेत दिसत आहेत. याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्वागत करीत आहे. गेली दहा-बारा वर्षांपासून विद्यापीठांमधील रखडलेली प्राध्यापक भरती आता होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे असे विविध विद्यापीठांच्या प्राध्यापक भरतीच्या जाहिरातींवरून निदर्शनास येते आहे. याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्वागत करीत आहे.

ही भरती पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने नुकताच एक शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. पदभरती पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने व्हावी या उद्देशाने दिनांक ६ ऑक्टोबरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामधील एका महत्त्वाच्या मुद्यावर मात्र विद्यार्थी परिषद आक्षेप व्यक्त करीत आहे. या परिपत्रकानुसार सहाय्यक प्राध्यापक भरतीच्या संदर्भात ज्या अटी टाकण्यात आल्या आहेत त्या युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वाला अनुसरून नाहीत असे सकृतदर्शनी दिसत आहे.

सहाय्यक प्राध्यापक म्हणून अर्ज करण्यासाठी सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण अथवा पीएचडी झालेली असावी असे युजीसीची मार्गदर्शक तत्वे सांगतात. या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक पात्रतेसाठी ५० गुण आणि मुलाखतीसाठी ५० गुण असे विभाजन केले आहे आणि असे विभाजन योग्य तसेच सर्व समावेशक ही आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या या शासन निर्णयात मात्र निवड होण्यासाठी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ७५:२५ हे सूत्र ठेवण्यात आले आहे.

या ७५ गुणांमध्ये शैक्षणिक पात्रता, शिकवण्याचा अनुभव आणि संशोधन कार्य या सर्वाला मिळून ७५ गुण ठेवले आहेत आणि या ७५ पैकी किमान ५० गुण जर मिळाले असतील तरच ती व्यक्ती मुलाखतीसाठी पात्र ठरणार आहे. मुळात केवळ सेट/नेट झालेल्या व्यक्तीला शिकवण्याचा अनुभव आणि संशोधन कार्य या संदर्भात गुण कसे मिळणार? शिवाय या अटींमध्ये एक भेद असा करण्यात आला आहे, की ज्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील महाविद्यालय व विद्यापीठातून आपले पदवी, पदव्युत्तर पदवी आणि एम.फिल./पीएचडी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असेल, त्यांना तुलनेने एका अर्थाने कमी गुण मिळणार आहेत. याचा अर्थ केवळ सेट/नेट अथवा पीएचडी झालेली व्यक्ती आणि शिवाय ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या ७५ पैकी ५० गुणांच्या अटीमध्ये पात्रच ठरू शकणार नाही. म्हणजे महाराष्ट्रातील बहुसंख्य महाविद्यालय व विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेतून डावलले जात आहे.

युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अशा व्यक्तींना अर्ज करण्याची मुभा आहे. मात्र या शासन निर्णयानुसार अशा व्यक्तींनी जरी अर्ज केला, तरी ते पात्रच ठरू शकत नाही. एक प्रकारे नवीन सेट नेट अथवा पीएचडी झालेली व्यक्ती सहाय्यक प्राध्यापक पदाच्या नियुक्तीस पात्रच ठरू शकणार नाही, त्यामुळे हा शासन निर्णय त्यांच्यावर अन्याय करणारा आहे.

या शासन निर्णयात सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक या संदर्भात ज्या अटी आहेत त्या ७५:२५ या सूत्रानुसार होण्यास काही आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र अनुभवी सहाय्यक प्राध्यापक हे या ७५ पैकी अपेक्षित गुण मिळवू शकतात. त्यामुळे केवळ सुरवातीस म्हणजेच सहाय्यक प्राध्यापक पदाच्या संदर्भातील ७५:२५ ही अट नैसर्गिक न्यायाच्या विरोधात असल्याने त्यावर योग्य पुनर्विचार करून कोणावरही अन्याय होणार नाही अशा पद्धतीने शासन निर्णयात बदल करण्यात यावा अशी ठाम मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करीत आहे.

मुळात गेली अनेक वर्षे रखडलेल्या प्राध्यापक भरतीची कार्यवाही आणि अमलबजावणी लवकरात लवकर व्हावी हीच विद्यार्थी परिषदेची भूमिका आणि मागणी राहिलेली आहे. पण असे होत असताना एन्ट्री पॉइंटला सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठीचे ७५:२५ चे सूत्र न अवलंबता युजीसीने मान्यता दिलेले ५०:५० चे सूत्र अवलंबावे. तसेच शैक्षणिक पात्रतेतील दुजाभाव करणाऱ्या मानांकन पद्धतीमध्ये बदल करावा, अशी देखील मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करत आहे.

यावर शासनाने योग्य तो निर्णय घेऊन कोणावरही अन्याय होणार नाही तसेच केवळ या मुद्यावर भरती प्रक्रिया रखडली जाणार नाही अशी अपेक्षा आणि मागणी विद्यार्थी परिषद करीत आहे.

# उत्तर भारतीयांनी गोदावरी किनारी एकत्र येऊन केली छठपूजा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० नोव्हेंबर-**

उत्तर भारतीय बांधवांनी हजारोंच्या संख्येत गोदावरी किनारी एकत्र येऊन छठपूजा महापर्व मोठ्या भक्तीभावाने साजरा केला. धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या हस्ते आरतीला प्रारंभ झाल्यानंतर तीन दिवसांचा कठोर उपवास सोडत महिलांनी नदीकाठावरून उदय होत असलेल्या सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण केले.

या प्रसंगी दिलीप ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नांदेडमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात छठ सण साजरा होतो, हे पाहून आनंद आणि अभिमान वाटतो. तीन दिवस पाण्याचा घोट न घेता उपवास करणाऱ्या मातृशक्तीचे हे अद्भुत उदाहरण आहे.प्राकृतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नांदेडतर्फे गेल्या १५ वर्षांपासून हा सण भव्यदिव्य पद्धतीने साजरा केला जात आहे याबाबत सर्वांचे मनापासून अभिनंदन करण्यात येत आहे.

बंदा घाट येथे सोमवारी संध्याकाळी व मंगळवारी पहाटे दोन सत्रात हजारो भाविक



उपस्थित होते.महिलांनी मंगळवारी पहाटेपासून गुडघ्यापर्यंत पाण्यात उतरून सूर्यउदयानंतर अर्घ्य अर्पण करून व्रताची समाप्ती केली. फटाक्यांच्या आतषबाजीने वातावरण दुमदुमून गेले. त्यानंतर सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष शिवशंकर प्रसाद, उपाध्यक्ष एस. के. झा, सचिव मनोज ठाकूर व कोषाध्यक्ष रामप्यारे शर्मा यांनी उपवास करणाऱ्या महिलांचा सत्कार केला. संध्याकाळच्या सत्रात प्रमुख अतिथी म्हणून म्हणून लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल, भाजपाचे अरविंद भारतीया व मुन्नासिंग तेहरा, लायन्स रीजनल सेक्रेटरी गंगाबिषण कांकर, युवा व्याख्याता शांभवी साले, माजी नगरसेविका जयश्री ठाकूर, अमृता जायस्वाल, संध्या छापरवाल, हुकूमसिंग गहलोत आदी मान्यवर उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने सुभाष कुकडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक जीव रक्षकांनी दक्षता घेत सुरक्षिततेची काळजी घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजीव जिंदल, सचिन मित्तल, अशोककुमार दास, मनोजकुमार सिंह, संजय त्रिपाठी, प्रेमजी पागल पानवाले, जितेंद्र निषाद, हरेराम साहा, रजनीश दुबे, यांनी परिश्रम घेतले. पहाटे चार वाजल्यापासून अमित रंजन झा, विनय शर्मा, ब्रजराज झा, नवलकुमार, गोपालप्रसाद सिंह, अजितकुमार सिंह, शैलेंद्र निगम, राजेश विश्वकर्मा, शिवा यादव, राधेश्याम विश्वकर्मा, दिनेश शर्मा, उमेश विश्वकर्मा, रामजीत सहानी, सुनील मिश्रा, महेश विश्वकर्मा, छोटू पाल, कार्तिक विश्वकर्मा, चंदन कुमार व मुकेश अग्रवाल यांनी गोदाकाठी उपस्थित राहून महाप्रसाद वाटप केले.

बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, छत्तीसगड व पश्चिम बंगाल येथून आलेले व नांदेड जिल्ह्यात कार्यरत असलेले हजारो उत्तर भारतीय बांधव या सोहळ्यात सहभागी झाले. गोदावरी तीरीचा हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नांदेडकर उपस्थित होते.

# 'मॉडर्न' स्कुलने विद्यार्थ्यांना घडवली विमानाची सफर




**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १० नोव्हेंबर-**

उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विमानाने सहल काढून ग्रामीण भागातील शाळांमध्ये पहिला मान पटकाविला आहे.

उमरी ते हैद्राबादचा प्रवास स्कूल बसने करुन हैदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सिंधुदुर्गला सहल नेली आहे. सदर सहलीत सिंधुदुर्गचा किल्ला, देवबाग व मालवन बिच, रॉक गार्डन आदी स्थळांना भेटी देणार असल्याची माहिती मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी दिली आहे.

ग्रामीण भागातील मुलांचे विमान वारी चे स्वप्न यामुळे पूर्ण झाले . शाळेच्या या सहली मुळे आमच्या मुलांना विमानात बसता आले अशी प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली . शालेय विद्यार्थ्यांचे सोबत संस्थाचालक संजय कुलकर्णी, सहशिक्षक नितेश सीतावार, सौ. निलिमा वर्मा, सौ.भावना पेशरवार, सौ. सुप्रिया सुवर्णकार, उन्नती वर्मा व संजय भूसांडे इत्यादी स्टाफ गेलेला आहे.

## तामसा येथे आयुष निदान व उपचार शिबिराला मोठा प्रतिसाद

**तामसा** -येथील आयुष शासकीय आयुर्वेदिक दवाखान्यात राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत शनिवारी (ता. ८) घेण्यात आलेल्या आयुष निदान व उपचार शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख , जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सत्यनारायण मुरमुरे , जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी डॉ. सुनील भंडारे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास बोंदरवाड यांनी शिबिराचे आयोजन केले होते. उद्घाटन जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सत्यनारायण मुरमुरे यांच्या हस्ते व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे यांच्या उपस्थितीत धन्वंतरी पूजनाने झाले. डॉ. सत्यनारायण मुरमुरे यांनी आयुर्वेदाचे महत्त्व सांगून सध्याच्या धावपळीत जीवनशैली बदलामुळे मधुमेह,रक्तदाब सारखे आजार वाढवल्याचे सांगितले . शिबिरात आयुर्वेदिक,युनानी, निसर्गोपचार पद्धतीने रुग्णांवर उपचार व मार्गदर्शन झाले. हदगाव आयुर्वेदतज्ञ डॉ. उषा कदम यांनी रक्त मोक्षण (जलौकावचरण) नस्य, विद्कर्म आयुर्वेदिक पद्धतीद्वारे रुग्णांवर उपचार करून मार्गदर्शन केले. या शिबिरात ४७२ रुग्णांनी लाभ घेतला. रुग्णांची रक्त, लघवी, तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. शिबिरात वार्धक्यजन्य आजार , वातव्याधी , त्वकविकार , नेत्रविकार,पंचकर्म, स्नेहन, स्वेदन जलौकावचरण नस्य, विद्कर्म पद्धतीने उपचार करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी डॉ. दीपक कदम, डॉ. उषा कदम , डॉ. दिलीप मंडलवार , डॉ. शेख जमील, डॉ. नरेंद्र रणवीरकर, डॉ. विजयालक्ष्मी घोडजकर , डॉ. सिद्धार्थ पोहरे ,डॉ.सुरेश डोंगरे, नेत्र चिकित्सक सिद्धेश्वर सूर्यवंशी यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र व आयुर्वेदिक दवाखाना तामसा व वायफना येथील आरोग्य कर्मचारी, आशावर्कर यांनी प्रयत्न केले. औषध निर्माण अधिकारी मोहनकुमार मेड यांनी प्रस्तावना केली. सूत्रसंचालन औषध निर्माण अधिकारी गजानन झाडे यांनी केले. आभार औषध निर्माण अधिकारी संजीवनी पारधी यांनी मानले.

## ओबीसी चळवळ संपवण्याचा प्रयत्न : गोविंद गोपनपल्ले

**मुदखेड** -ओबीसी चळवळ संपवण्याचा प्रयत्न होत असुन माझ्या घरी ओबीसीची बैठक झाली तेव्हापासून भाजपा पदाधिकाऱ्यांनी बाबतीत गैरसमज करून घेतला आहे. मी ओबीसीचा कार्यकर्ता असून ओबीसी साठीच काम करेल माझ्यावर येणाऱ्या दबावाला



मी घाबरत नसून ओबीसीचेच कार्य करण्याकरिता मी भारतीय जनता पक्षाचा व पदाचा राजीनामा देत असल्याची माहिती गोविंद गोपनपल्ले यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे पत्रकार परिषदेत पुढे बोलताना सांगितले की भारतीय जनता पार्टी ही लोकशाहीच्या मूल्यांवर आधारित असून परंतु नांदेड जिल्ह्यातील नेते भाजपा मध्ये प्रवेश करून पक्षातील लोकशाही पूर्णता पायमल्ली करून हुकूमशाहीच्याच मार्गावर स्वतःच्याच विचारसरणीतून निर्णय घेत जुने निष्ठावंत कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता काँग्रेस पक्षातून आलेले कार्यकर्त्यांची चमकोगिरी पुढेकर दिसत असून पक्षातील जुन्या जाणत्या निष्ठावांत कार्यकर्त्यांना येत्या काळात न्याय मिळेल अशी आशा करणे चुकीचे ठरेल असे ठाम मत यावेळी मांडले. मुदखेड नगर परिषदेची निवडणूक रणधुमाळणी चालू असतानाच भाजपाच्या कार्यकर्त्याच्या राजीनामा म्हणजे भाजपलाही खिंडार पडण्याची शक्यता आहे इच्छुकांची गर्दी जास्त असल्यामुळे आणि किती जण नाराज होऊन भाजपा सोडतील याची कल्पना करता येत नाही. येणाऱ्या निवडणुकीत गोविंद गोपनपल्ले यांनी त्यांच्या वार्डातील लोकांना विश्वासात घेऊनच हे निवडणूक लढवणार असल्याचे गोपनपल्ले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

## उपाध्यक्षपदी संदेश देवके यांची निवड

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या नांदेड महानगर उपाध्यक्षपदी पत्रकार संदेश देवके यांची निवड करण्यात आली आहे.



तर महानगराध्यक्षपदी रमेश देवडे कार्याध्यक्षपदी, देविदास डांगे, सचिवपदी संतोष कुलकर्णी, संघटक दत्तात्रय शेंबाळे, कोषाध्यक्ष विष्णू वाघमारे तसेच सदस्य सुनील बेंद्रीकर यांची निवड करण्यात आली आहे. या नूतन कार्यकारिणीच्या निवडीची पत्रे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष रुपेश पाडमुख आणि जिल्हाध्यक्ष श्रीधर नागापूरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या प्रसंगी रुपेश पाडमुख, श्रीधर नागापूरकर आणि रमेश पांडे यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भूकरमापक पदांसाठी १३ आणि १४ नोव्हेंबर रोजी ऑनलाईन परीक्षा

**नांदेड** -भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता १३ आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक आणि उमेदवारांच्या प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या https://mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे. भूमि अभिलेख विभागातील उपरोक्त रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता १ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार विहीत कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी गुरूवार १३ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात पुणे आणि अमरावती विभागात परीक्षा होणार असून या विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजता उपस्थित राहावयाचे आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीसाठी काँग्रेसच्या मुलाखती

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १० नोव्हेंबर-**

मुखेड नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या वतीने दि.९ नोव्हेंबर रोजी काँग्रेस जनसंपर्क कार्यालयात नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या असुन नगराध्यक्ष पदासाठी ०१ अर्ज तर नगरसेवक पदासाठी ५६ अर्ज आल्याची माहिती काँग्रेसने पत्रकार परिषदेत दिली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजल्यानंतर राजकीय पक्षांकडून इच्छुकांच्या मुलाखती सुरू झाल्या असून रविवार दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी येथील काँग्रेस भवनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर,




प्रदेश महासचिव डॉ.श्रावण रॅपनवाड,तालुकाध्यक्ष राजू पाटील रावणगावकर,जिल्हाउपाध्यक्षराजन देशपांडे,शौकत पठाण,शहराध्यक्ष हनमंत नारनाळीकर आदींनी नगराध्यक्षपदासह इच्छुक नगरसेवक पदाच्या उमेदवारांची मुलाखत घेतल्या आहेत.नगराध्यक्ष पदासाठी डॉ. दिपाली श्रावण रॅपणवाड यांनी तर नगरसेवक पदासाठी २० जागेसाठी ५३ जणांनी मुलाखती दिल्या असुन ५६ जणांनी उमेदवारी अर्जाच्या माध्यमातून उमेदवारी ची मागणी केली आहे.

यावेळी मुखेड नगरपालिका निवडणुकीसाठी डॉ.श्रावण रॅपणवाड यांच्या अध्यक्षतेत कोर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे.या कमिटीत सदस्य म्हणून शहराध्यक्ष हनमंतराव नारनाळीकर,युवकचे अध्यक्ष जयप्रकाश कानगुले,रामेश्वर पाटील इंगोले,अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष इम्रान पठाण, शिवाजी गायकवाड,इरफान मोमीन यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेस तालुका व शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

**निवडणुकीत सक्षम पर्याय देवू : रॅपनवाड**

नगर परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या वतीने नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी सक्षम पर्याय देवून मतदारांच्या आशिर्वादाने चमत्कारीक निकाल देवु असे मत प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव डॉ.श्रावण रॅपनवाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

# इस्लापुरात शाळेच्या जुन्या इमारतीली आग

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १० नोव्हेंबर-**

ईस्लापूर येथील जुन्या जिल्हा परिषद शाळेतील एका खोलीत ठेवलेले विद्यार्थ्यांचे बसण्याचे डेस्क-बेंच लागलेल्या आगीत जळून खाक झाले. ही घटना रविवार दि.९ रोजी सायंकाळी चारच्या सुमारास घडली.

आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. ही घटना लक्षात येताच गावकऱ्यांनी तत्काळ आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. नंतर अग्निशमन दलही घटनास्थळी दाखल झाले. गावकऱ्यांच्या मदतीने आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात आली. या आगीत सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक



अंदाज व्यक्त होत आहे. ईस्लापूर येथील ही जिल्हा परिषद शाळा जुनी व जीर्ण अवस्थेत आहे.

काही खोल्या वापरण्यायोग्य असल्या तरी बहुतांश इमारतीची पडझड झाली आहे. संबंधित खोलीत विद्यार्थ्यांचे डेस्क ठेवण्यात आले होते. नवीन शाळा दुसऱ्या ठिकाणी सुरू आहे. या शाळेला आग कशामुळे लागली, याचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र, गावातील नागरिकांनी वेळेवर धाव घेत आग आटोक्यात आणली.

# आष्टी गटामधून गजानन कंठाळे निवडणूक रिंगणात उतरण्याची शक्यता

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १० नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद गटांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहेत त्यात आष्टी हा गट ओबीसी पुरुषांकरिता आरक्षित झाल्याने अनेक उमेदवार इच्छुक असताना यात प्रमुख्याने या गटातील नागरिकांतून काँग्रेसचे सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष तथा येवली येथील सरपंच प्रतिनिधी गजानन कंठाळे यांना उमेदवारी भेटल्यास विजय नक्कीच होऊ शकतो अशी चर्चा या गटातून नागरिकांमधून होत आहे. उच्चशिक्षित, मितभाषी, व्यसनाधीनते कडे वळलेल्या तरुणांना व्यसनमुक्तीसाठी आतापर्यंत मोठ्या प्रमाणात कार्य केलेले तसेच गोरगरीब लोकांच्या विवाहासाठी साईप्रसाद च्या माध्यमातून जनजागृती केलेले गजानन कंठाळे यांच्या नावास दिवसागणिक या गटातून नागरिकांचा वाढता पाठिंबा भेटत असल्याचे चित्र सध्यातरी दिसत आहे.



गजानन कंठाळे मागील पंधरा वर्षापासून कृषी कंपनीमध्ये काम करत सामाजिक कार्यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात त्यामुळेच गावातील लोकांनी मोठ्या विश्वासाने त्यांना भरघोस मतांनी निवडून देऊन त्यांना सरपंच केल्यामुळे येवली गावाचा कायापलट त्यांनी केला. गावातील रस्ते, पाण्याची व्यवस्था, बसवेश्वर मंदिर तसेच शाळेतील कामही मोठ्या प्रमाणात केली. घरकुल तसेच मनरेगाच्या माध्यमातून शेतीचे रस्ते, विहीर यामुळे गावाची आर्थिक उन्नती झालेली आहे. तसेच सर्व समाजाला न्याय देण्याची भूमिका व निर्व्यसनी, प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणून गावांमध्ये त्यांचे नाव आग्रह क्रमाने गावकरी घेत असतात तसेच माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांचे ते निकटवर्तीय असल्यामुळे त्यांच्या काळात गावांमध्ये वेगवेगळ्या योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला येवली ते पिंपळगाव हा रस्ता त्यांच्या काळातच मंजूर झाला.

# रस्त्याच्या मध्यभागी बसणारे भाजीपाला विक्रेते हटवा, अन्यथा आक्रमक भूमिका घ्यावी लागेल : क्षितिज जाधव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० नोव्हेंबर-**

शहरातील दिपनगर ते तरोडा नाका मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी बसणाऱ्या भाजीपाला विक्रेत्यांना रस्त्याच्या बाजूला करावे अन्यथा आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा भारतीय जनता पार्टीचे माजी सरचिटणीस क्षितिज जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांना दिला आहे.




शहरातील दिपनगर ते तरोडा नाका मार्गावर भाजीपाला विक्रेते तसेच हातगाडी चालकांनी कब्जा केलेला आहे. मागील काही दिवसापासून भाजीपाला विक्रेते व हातगाडी चालकांनी थेट रस्त्याच्या मधोमध ठाण मांडल्याने वाहतुकीला मोठा अडथळा होत असून वाहतुकीची कोंडी हे नित्यनेमाचे झाले आहे . भाजीपाला विक्रेते रस्त्याच्या मधोमध बसत असल्यामुळे याचा त्रास पादचारी नागरिकांना होत आहे. विशेष करून शालेय विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे. रस्ता अरुंद त्यातच भाजीपाला विक्रेते रस्त्याच्या मध्यभागी येत असल्याने या मार्गावरून जाण्यासाठी स्कूलबस चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. भाजीपाला विक्रेत्यांच्या या रस्त्यावरील अतिक्रमामुळे दीपनगरसह परिसरातील जनता वैतागली असून या मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी बसणाऱ्या भाजीपाला विक्रेत्यांना रस्त्यावर न बसण्याची ताकीद द्यावी अन्यथा आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा क्षितिज जाधव यांच्यासह परिसरातील नागरिकांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांना दिला आहे.

निवेदनावर क्षितिज जाधव, नामदेव केंद्रे, मुकुंद धानोरकर, गौतम सारपाते, साईनाथ तेलंग, विलास देवळे, विशाल धुतमल, माधव खंडागळे, दीपक तेलंग, संतोष गवळी, सोनू नेरलकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्री वीरभद्र स्वामी यात्रेनिमित्त नरंगल येथे रंगला कुस्त्यांचा फड

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १० नोव्हेंबर-**

तालुक्यातील नरंगल (बु) येथे भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री वीरभद्र स्वामी यात्रेनिमित्त यंदा गोविंद शंकरराव पाटील यांच्या शेतात काळ्या मातीत कुस्त्यांचा फड चांगलाच रंगला होता. या कुस्त्यांच्या फडात पालमचा आबु चाऊस आणि उदगीरचा निरज वाघमारे यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला तर द्वितीय क्रमांक जय चाऊस, तृतीय क्रमांक गजानन जाहूरकर आणि आयुब शेख यांनी पटकावले. यात यवतमाळची महिला कुस्तीपटू देवयाणी माने यांनी पुरुष कुस्तीपटूला धुळ चारत उपस्थितांना आश्चर्यचकित केले.

काळ्या मातीतील कुस्त्यांचा फडाचे उद्घाटन उत्कृष्ट कुस्तीपटू तथा देगलूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारुती मुंडे आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्रुदेव पवार यांच्या हस्ते करण्यात आली तर शेवटच्या कुस्तीचे बक्षीस वितरण पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक मारुती मुंडे म्हणाले की, नरंगलकरांनी कुस्तीचे सामने घेत भारतीय खेळाला चालना दिली आहे. कुस्तीपटूंनी केवळ स्पर्धा जिंकण्यापुरते मर्यादित न राहता राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचं नाव उज्वल करावे असे



सांगितले.

दरम्यान ही स्पर्धा दुपारी बारा ते सायंकाळी साढेसातच्या दरम्यान घेण्यात आली. या स्पर्धेत अतिशय चांगल्या कुस्तीपटूने सहभाग घेतला होता त्यावेळी ही स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली, अंतीम कुस्ती पालमचा आबु चाऊस आणि उदगीरचा निरज वाघमारे यांच्यात कुस्ती रंगली, ही लढत अत्यंत चुरशीची होती. शेवटी पंचांच्या निर्णयानुसार शेवटची कुस्ती विभागून देण्यात आली. तर या स्पर्धेत यवतमाळहून आलेली महिला कुस्तीपटू देवयाणी माने हीने पुरुष कुस्तीपटूला धूळ चारीत अवघ्या दोन मिनिटांत विजयावर शिक्कामोर्तब केले.

मागील दोन वर्षांपासून नरंगल (बु) येथे बंद पडलेल्या कुस्त्याचा फडाला गावकऱ्यांच्या माध्यमातून पुन्हा चालू करण्यात आले. या फडासाठी गावातील तरुणांबरोबरच पंचक्रोशीतील लोकांनीही सहकार्य आणि मदत केली. तर महाराष्ट्रातील दर्जेदार कुस्तीपटूंनी सहभाग नोंदवित चालना दिली. यंदा महाराष्ट्रातील उदगीर, लातूर, नळेगाव, पुसद, यवतमाळ, संभाजीनगर, कुर्डुवाडी, सोलापूर, पुणे, हिंगोली, मुखेड या ठिकाणासह तेलंगाणा आणि कर्नाटक राज्यातील कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला. तर कुस्त्यांच्या फडासाठी विरभद्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, महात्मा बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नरंगलचे संस्थापक अध्यक्ष कै. शंकरराव गोविंदराव पाटील यांच्यास्मरणार्थ १४०५१ रु., कै. इरवंतराव लिंगप्पा पाटील यांच्या स्मरणार्थ ११०००/- रू., कै. मोहम्मद नवाज पो. पटेल यांच्या स्मरणार्थ ५१००/- रू., कै. गणपतराव राजेप्पा पाटील यांच्या स्मरणार्थ ५००१/- रू, कै. रंजिता मधुकर पाटील यांच्या स्मरणार्थ ५००१/- रू तसेच शंकर शिवलींगराव म्हेत्रे तमलूरकर यांच्यातर्फे ११५५१/- रू. भुमन्ना नरसिंग गाडगे शहापुरकर यांच्या तर्फे ७०००/- रू., डॉ. आनंद नरंगलकर यांच्या तर्फे ५०००/- रू, सतीश तारकांत पाटील यांच्याकडून रु. ५०००/-, रामराव विठ्ठलराव वाघमारे नंदूरकर यांच्या तर्फे ५०००/- रू., प्रा. नरेंद्रकुमार विठ्ठलराव वनंजे तमलूरकर कथा तर्फे ५०००/- रू., तलाठी श्री संतोष राचन्ना पाटील यांच्या तर्फे ५०००/- रू, सरपंच सौ. शोभा अरविंद कर्णे यांच्या तर्फे ५०००/- रू., गजानन रामराव तंबाके यांच्या तर्फे ५०००/- रू. देणगी देण्यात आली तर यांच्यासह अनेकांनी मदतीचा हात पुढे केला.

ही स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडली. या कुस्ती समिती मंडळ अध्यक्ष मारोती भीमराव पाटील, उपाध्यक्ष रामलु कोरटे व रफिक पटेल, सचिव दत्तात्रय कंदलवार, दिलीप गायकवाड, सहसचिव ज्ञानेश्वर म्याकलवार, नरसिंग करे, कोषाध्यक्ष नरेश कर्णे, संतोष नल्लामडगे, कार्याध्यक्ष सायलू सुरावार, नागनाथ कऱ्हाडे, कार्याध्यक्ष अंबादास कऱ्हाडे, विजय कंदलवार, राजू शंकरराव पाटील, माजी सरपंच यशवंत शंकरराव पाटील, व्यंकट शंकरराव पाटील, गोविंद शंकरराव पाटील, अशोकराव गोपछडे, ॲड रवींद्र पाटील, संतोष पाटील, कैलास हसनाळे, अंबादास पाटील, ॲड संजय देशमुख, देवेंद कऱ्हाडे, व्यंकटराव पाटील, बालाजी पाटील, प्रकाश कर्णे,आनंद कऱ्हाडे, खाजामिया शेख, राम सिद्धपा पाटील ,यादव कऱ्हाडे, यादव कांबळे, काशिनाथआप्पा स्वामी, मिलींद वनंजे, व्यंकटराव पाटील, माधव कर्णे, गंगाधर कुऱ्हाडे, राजू पाटील, जगदीश कऱ्हाडे, हुल्लाजी भालके, जगदीश कऱ्हाडे, राजू पाटील, संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तर या स्पर्धेचे सुत्रसंचलन शाहिर माणिक कोकले आणि उत्तम वनंजे यांनी केले तर पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्रुदेव पवार, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, उपनिरीक्षक महाजन मैसनवाड, पोलीस जमादार मोहन कनकवले, पोलीस जमादार बालाजी पुरी, पोलीस हवालदार कृष्णा तलवारे, पोलीस कॉन्स्टेबल नामदेव वानरे, पोलीस कॉन्स्टेबल विशाल अटकोरे, पोलीस कॉन्स्टेबल बळीराम घुळे आदींनी शांततेत पार पाडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पोलिसांची भल्या पहाटे गुन्हेगारांविरूध्द धरपकड मोहीम

## अवैध हत्यार बाळगल्या प्रकरणी आठ गुन्हे दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

आगामी नगर पालिका निवडणुक संदर्भात पोलिस विभागाने कठोर भूमिका घेतली असून जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार, हद्दपार आरोपी, फरार आरोपी, तुरूंगातून नुकतेच बाहेर सुटलेले आरोपी, गांजा बाळगणारे तसेच अवैधपणे हत्यार बाळगणारे आरोपी, हिस्ट्रीशिटर, मालाविरूध्द व शरीराविरूध्द गुन्हे करणारे गंभीर आरोपी यांच्याविरूध्द जोरदार मोहीम उघडली असून दि ९ नोव्हेंबर रोजी भल्या पहाटे सर्व पोलिस ठाण्यांतर्गत कारवाई करीत सात गुन्हेगारांविरूध्द धरपकड मोहीम राबविण्यात आली आहे.

पोलिस विभागाच्यावतीने निवडणुक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस विभागाच्यावतीने जोरदार मोहीम उघडण्यात आली आहे. सर्व पोलिस ठाण्यातील ४० अधिकारी आणि जवळपास ३०० कर्मचारी यांनी ऑलआऊट ऑपरेशनच्या माध्यमातून जिल्ह्यात सात गुन्हेगारांविरूध्द अवैध शस्त्र बाळगल्या प्रकरणी गुन्हे दाखल केले असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच हद्दपार असूनही विना परवानगी जिल्हा हद्दीत मिळाल्यामुळे हद्दपार आरोपींना पकडून पुन्हा अटक करण्यात आली आहे. एनबीडब्ल्यू वारंट मधील एकवीस आरोपी यांची तपासणी करण्यात आली. सदर मोहीम अविरतपणे चालूच राहणार असून आरोपींना जेरबंद करण्याचे काम पोलिस विभागाच्यावतीने करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले आहे. सदर मोहीम पोलिस अधीक्षक कोकाटे, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सर्व ठाणेदार तसेच शाखाप्रमुख, अधिकारी व अंमलदार यांनी राबवली आहे.

आगामी होणाऱ्या निवडणुक संदर्भात जिल्ह्यातील नागरिकांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करून प्रशासनास सहकार्य करावे. कोणीही कायदा हातात घेऊ नये, गुन्हेगारी कृत्य करू नये अन्यथा गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.

# महाराजा श्री अग्रसेन यांच्या विरूध्द अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्याविरोधात कारवाई करा

## हिंगोली अग्रवाल समाजाची राष्ट्रपतींकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

छत्तीसगड राज्यातील जेसीपी प्रमुख अमित बघेत यांनी महाराजा श्री अग्रसेन तसेच महापुरूषांविरोधात केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा हिंगोलीतील अग्रवाल समाजाने तीव्र निषेध करीत संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेमार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

छत्तीसगडचे जेसीपी प्रमुख अमित बघेल यांनी मिडीया आणि सोशल मिडीयांमध्ये महाराजा श्री अग्रसेन यांच्याविरोधात अपमानास्पद टिका केली आहे. या विरोधात हिंगोलीतील अग्रवाल समाज आक्रमक झाला असून त्यांनी या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. श्री अग्रवाल समाज, अग्रवंश सेवा मंडळ, श्री महाराजा अग्रसेन सेवा समितीच्यावतीने दि १० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर करण्यात आले. महाराजा श्री अग्रसेन हे अग्रवाल समाजाचे दिपस्तंभ आहेत. त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केली आहेत. त्यांच्याबद्दल अशाप्रकारचे अपमानास्पद वक्तव्य केल्यामुळे अग्रवाल समाज दुखावला आहे. अहिंसक, शांतीप्रिय व व्यवसाय, सामाजिक सेवेमध्ये समर्पण करणारा हा समाज आहे. परंतु अमित बघेल सारख्या अपराधी वृत्तीच्या माणसाने राष्ट्रद्रोह केला आहे. धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकताला ठेच पोहोचवली आहे. त्यामुळे त्यांच्याविरूध्द राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर गोपाल लदनिया, आशिष कागलीवाल, सपन बगडीया, कृष्णा अग्रवाल, अंकुश पित्ती, नरेंद्र अग्रवाल, दिपक निमोदीया, निलेश अग्रवाल, सुरेश अग्रवाल, शिवम अग्रवाल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आदर्शमध्ये वंदे मातरम् गीताच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**



येथील आदर्श महाविद्यालयात वंदे मातरम गीताला १५० वर्षे पुर्ण झाल्यामुळे भारत सरकारकडून महाविद्यालयात सामूहिक राष्ट्रगान, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आदि कार्यक्रमाचे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनखाली सामूहिक वंदे मातरम गीत गायन आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. सचिन हाटकर, प्रा.ध्रुपद हारे, प्रा.आनंद बेले, प्रा.निलेश. उबाळे, प्रा. अरुण पांपटवार, प्रा. सुरेश व-हाड, प्रा. वर्षा सावतकर. प्रा. सपना पुपूलवाड, प्रा. वाकोडे, मेजर पंढरीनाथ घुगे प्रा. पंडित कुहाडे प्रा.विशाल गायकवाड, प्रा.अमरनाथ जाधव व विद्यार्थी तसेच विद्यार्थीनी उपस्थित होते.

आदर्श महाविद्यालयात वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.तसेच उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट व इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी या विभागाच्या वतीने मेजर पंढरीनाथ घुगे व प्रा.पी. बी. कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सामूहिक राष्ट्रगीत, वंदे मातरम गीत गायन यांच्या आयोजन केले. विद्यार्थ्यांनी वंदे मातरम गीता विषयी व देशभक्तीपर विचार व्यक्त केले. वंदे मातरम या गीतावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीसाठी आजपासून उमेदवारांना अर्ज दाखल करण्यास सुरूवात झाली असून निवडणुक विभाग सज्ज झाला आहे. यावेळी पाहणी करतांना उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### निवडणुक कार्यालयात चोख पोलिस बंदोबस्त



हिंगोली– आगामी नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथील उपविभागीय कार्यालयात निवडणुक कक्षाची स्थापना करण्यात आली असून दि १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाली आहे. या अनुषंगाने येथील कार्यालयाच्या गेटवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे

### फासे पारधी समाजाच्या महिलांचे उपोषण



हिंगोली– वसमत व हट्टा परिसरातील काही फासे पारधी समाजातील महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मागील चार दिवसांपासून लेकरांबाळासह उपोषण सुरू आहे. सदरील कुटुंब हे वसमत व हट्टा परिसरातील गायरानावर उदरनिर्वाह करीत आहे परंतु त्यांच्या कुटुंबियांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांच्या कुटुंबियांना विनाकारण गोवण्यात येत आहे. याप्रकरणी न्याय द्यावा अशी मागणी या महिलांनी केली आहे.

### हिंगोलीत कडाक्याची थंडी, शेकोट्या पेटल्या



हिंगोली– मागील तीन दिवसांपासून हिंगोली शहरासह परिसरात तापमानात अचानक घट झाली असून कडाक्याची थंडी पडत आहे. कडाक्याच्या थंडीमुळे स्वेटर, मफलर, रूमाल तसेच गरम कपडे वापरण्यास सुरूवात केल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी शेकोट्या पेटवून थंडीपासून बचाव करतांना नागरिक दिसत आहेत.

# खुराणा जिनींगमध्ये कापूस खरेदीला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

लिंबाळा परिसरातील औद्योगित वसाहतीत असलेल्या खुराणा जिनींगमध्ये सोमवारपासून कापूस खरेदी करण्यात सुरूवात झाली आहे.

मागील काही दिवसांपासून कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी होत होती. या मागणीची दखल घेत येथील खुराणा जिनींगमध्ये सोमवारी कापूस खरेदीला सुरूवात करण्यात आली. यावेळी चोंडी येथील शेतकरी यादवराव जाधव यांचा सत्कार करीत त्यांच्या कापसाची खरेदी करीत शुभारंभ करण्यात आला. यावेळी राजु खुराणा, उमेश डाकेवार, नारायण पाटील, संपत मुंडे, प्रल्हाद कोरडे, विकास डांगे, बबनराव ढेंगळे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कापूस खरेदी केंद्र सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# अवैध रेती वाहतुक करणारे तीन टिप्पर पोलिसांनी पकडले, ६० लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**



औंढा पोलिस ठाण्यांतर्गत अवैध रेती वातुक करणारे दोन तर हिंगोली शहर पोलिस ठाण्यांतर्गत एक, हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत एक असे चार टिप्पर पोलिसांनी पकडले असून ६० लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींविरूध्द संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

हिंगोली पोलिसांनी अवैध धंदे करण्याविरोधात जोरदार मोहीम उघडली असून जिल्ह्यात अचानकपणे नाकाबंदी करण्यात आली आहे. नाकाबंदी दरम्यान अवैध रेती वाहतुक करणारे औंढा पोलिस ठाण्यांतर्गत दोन टिप्पर तर हिंगोली शहर पोलिस ठाण्यांतर्गत एक तसेच हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत एक असे चार टिप्पर पोलिसांनी पकडून जप्त केले आहेत. याप्रकरणी आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जिल्ह्यात अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले असून सेनगाव, औंढा नागनाथ, कळमनुरी, आखाडा बाळापूर तसेच हिंगोली या भागात सर्रासपणे अवैध रेती उपसा करून भल्या पहाटे टिप्परच्या माध्यमातून अवैध रेती वाहतुक करण्यात येत आहे. मागील अनेक महिन्यांपासून रेती माफीया बिनदिक्कतपणे अवैध रेती वाहतुक करीत आहे. या सर्वांवर कारवाईसाठी पोलिस प्रशासन सज्ज झाले असून एकाच दिवशी सुमारे चार टिप्पर पोलिसांनी पकडल्यामुळे रेती माफीयांमध्ये खळबळ उडाली आहे.

तसेच जिल्ह्यात लपून अवैधधंदे करणाऱ्याविरोधातही पोलिस कारवाई करीत असून वारंवार अवैधधंदे प्रकरणात आढळून आलेल्या आरोपींवर हद्दपार व एमपीडीएस सारखी सुध्दा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलिस विभागाने सांगितले आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकृष्य कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलिस अधिकारी, अंमलदार यांनी केली आहे.

# शिवसेना उबाठाच्या तालुका प्रमुखपदी अनिल शिंदे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**



शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची औंढा नागनाथ येथील यजमान निवास या ठिकाणी सोमवार( ता.१०) रोजी दुपारी दोन वाजता बैठक संपन्न झाली. शिवसेना जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. औंढा नागनाथ तालुकाप्रमुख गणेश देशमुख यांनी पदाचा राजीनामा दिल्याने शिवसेनेचे औंढा नागनाथ तालुकाप्रमुख पद रिक्त झाले होते. औंढा नागनाथ तालुकाप्रमुख निवडण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तालुकाप्रमुख पदी अनिल दादाराव शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. त्यानंतर नवनिर्वाचित तालुकाप्रमुख अनिल दादाराव शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील, उपजिल्हाप्रमुख जी डी मुळे, शहरप्रमुख संजय भामीरगे, सुदामराव खोकले, अलीम खतीब, सुनील खंडागळे, चंद्रमणी पाईकराव, बालाजी करडीले, गजानन सोळंके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पवित्रेश्वर विद्यालयात २४९ विद्यार्थ्यांची दंत तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**



तालुक्यातील कारवाडी परिसरात असलेल्या पवित्रेश्वर विद्यालयात सोमवारी (ता.१०) डॉ. हेडगेवार दंत महाविद्यालयातील इंटर्नशिप करणाऱ्या डॉक्टरांच्या पथकाने शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावी मधील जवळपास २४९ मुलामुलींची दंत तपासणी करण्यात आली.

डॉ. हेडगेवार दंत महाविद्यालयांच्या इंटरशिप करण्याऱ्या डॉक्टरांच्या पथकाने शाळेला भेट देऊन २४९ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून दात स्वच्छ धुणे, दात स्वच्छ न केल्यास अनेक आजार उद्भवू शकतात. त्यासाठी दिवसातून दोन वेळा दात साफ करण्याचे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक सिताराम इचनर, भागोराव नरवाडे, अमीर शेख, गजानन वाकडे, साईनाथ सरकटे, लक्ष्मीकांत बडवने, सनशाईन शेख, कमलाकर ठोंबरे, यांच्यासह विद्यालयातील शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.स्नेहा भोपळे, नागेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली फैजन शेख, ऋतुजा शेटे, स्नेहल सिरसाट, आकांक्षा शिरसाठ, बिस्मा सिद्धिकी, प्रीती केंद्रे, वैष्णवी कोंडावार, येशश्री केने, जानवी पाटील, राजनंदिनी शेळके या पथकाने सर्व विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांचे दात किडके आढळून आले तेंव्हा त्यांना डेंटल कॉलेज येथे बोलावण्यात येईल त्यानंतर त्यांच्यावर उपचार केले जातील असे डॉ. स्नेहा भोपळे यांनी सांगितले.